भारतीय स्वातंत्र्यदिन चिरायू होवो!

भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा. स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या लाखो ज्ञात, अज्ञात देशभक्तांना कृषीवल परिवारातर्फे विनम्र अभिवादन. तसेच वाचक, जाहिरातदार, हितचिंतकांनाही शुभेच्छा.

– मुख्य संपादक, कृषीवल

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल



पान ८

रायगड शनिवार । दि. १५ ऑगस्ट २०२६ । अंक ७० । पृष्ठे १० । किंमत ५ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


## वेधक

### दोन अपघातात दोघे ठार

**पनवेल :** कळंबोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवघ्या काही तासांच्या अंतराने घडलेल्या दोन भीषण रस्ते अपघातांमध्ये दोघांचा मृत्यू झाला आहे. या दोन्ही अपघातांनंतर संबंधित अज्ञात वाहनचालक घटनास्थळावरून फरार झाले असून, कळंबोली पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

पहिली घटना केंद्रीय वखार महामंडळ येथील स्टील मार्केट रोडवर घडली. कळंबोली येथे राहणारे अमित साईनाथ पवार (३७) हे दुचाकीवरून कळंबोली सर्कलकडे जात असताना मागून भरधाव वेगाने आलेल्या ट्रेलरने त्यांच्या दुचाकीला कट मारला. त्यामुळे अमित पवार यांचा तोल जाऊन ते थेट ट्रेलरच्या मागील चाकाखाली आले. पान २ वर

### माणगाव महामार्ग वाहनांसाठी खुला!

**माणगाव :** पुणे-रायगड जिल्हा हद्द माणगाव या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५३एफवरील वाहतूक आता मर्यादित स्वरूपात सुरू करण्यात आली आहे. महामार्गाच्या रुंदीकरण व मजबुतीकरणाचे काम सुरू असल्याने केवळ हलकी मोटार वाहने आणि शासकीय प्रवासी वाहनांना ताशी २० किलोमीटर वेगमर्यादेसह वाहतुकीची परवानगी देण्यात आली आहे. पुणे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डुडी यांनी संबंधित विभागांच्या पाहणी अहवालानंतर हा आदेश जारी केला. मात्र, अवजड वाहनांना परवानगी दिलेली नाही. रस्त्याचे काम सुरू असल्याने चालकांनी वेगमर्यादेचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे.

### राज्यातील ८२ पोलिसांचा सन्मान

**नवी दिल्ली :** भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला केंद्रीय गृह मंत्रालयाकडून देशातील पोलीस, अग्निशमन, नागरी संरक्षण व होमगार्ड तसेच सुधारात्मक सेवांमध्ये उल्लेखनीय कार्य बजावणाऱ्या एकूण १,०५७ अधिकारी व कर्मचाऱ्यांना शौर्य आणि सेवा पदके जाहीर करण्यात आली आहेत. यामध्ये महाराष्ट्रातील ८२ अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश असून, विविध क्षेत्रांत बजावलेल्या उल्लेखनीय सेवेसाठी त्यांचा गौरव करण्यात आला आहे. कर्तव्य बजावताना जीवित व मालमत्तेचे रक्षण करणे, गुन्हे रोखणे अथवा गुन्हेगारांना अटक करणे यासाठी केलेल्या उल्लेखनीय शौर्यपूर्ण कार्याबद्दल शौर्य पदक प्रदान केले जाते. यंदा देशभरात एकूण ३०१ शौर्य पदके जाहीर करण्यात आली आहेत.

### आक्षेपार्ह चित्रफिती तात्काळ हटवा!

**शिर्डी :** साईबाबा आणि साईबाबा संस्थानविषयी समाजमाध्यमांवर प्रसारित होत असलेला बदनामीकारक मजकूर हटविण्याचे निर्देश भारत सरकारच्या ग्रीव्हन्स अपिलेट कमिटीने (जीएसी) दिले आहेत. आक्षेपार्ह चित्रफीत २४ तासांत हटविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी ही माहिती दिली. यूट्यूबसह विविध मंचांवर साईबाबांविषयी चुकीची विधाने तथ्य म्हणून मांडणाऱ्या सुमारे ३५ चित्रफितींविरोधात संस्थानने जुलै २०२६ मध्ये तक्रारी दाखल केल्या होत्या. अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठेचा अधिकार यामध्ये संतुलन राखण्याची गरज अधोरेखित करत जीएसीने हा आदेश दिला आहे.

# भाजपचं लोका सांगे...

## आमदारांसह भाजप पदाधिकाऱ्यांचे फोटोसेशन

## तिरंग्याबद्दल बेगडी प्रेम; पनवेल काँग्रेसचा आरोप

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

भाजपची ''लोका सांगे ब्रह्मज्ञान...'' अशीच काहीशी अवस्था पनवेलमध्ये राष्ट्रप्रेमाचा संदेश देण्यासाठी आयोजित केलेल्या प्रदर्शनात पाहायला मिळाल्याचा आरोप आहे. एकीकडे 'हर घर तिरंगा'च्या माध्यमातून नागरिकांना राष्ट्रध्वजाचा सन्मान करण्याचे आवाहन करायचे आणि दुसरीकडे जमिनीवर साकारलेल्या तिरंग्याच्या प्रतिकृतीभोवती बूट-चपलांसह उभे राहून छायाचित्रे काढायची, हा विरोधाभास संतापजनक असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

पनवेलच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात झालेल्या प्रदर्शनातील हे छायाचित्र समोर आल्यानंतर ''राष्ट्रध्वजाच्या सन्मानाचा उपदेश करण्यापूर्वी त्याचा सन्मान कृतीतून दाखवणार का?'' असा थेट सवाल काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष सुदाम पाटील यांनी उपस्थित केला आहे.



### तिरंगा फोटोचे की सन्मानाचे प्रतीक?

राष्ट्रध्वजाच्या सन्मानाचे धडे नागरिकांना देणाऱ्यांनीच राष्ट्रीय प्रतीकांबाबत अधिक काळजी घेणे अपेक्षित असते. तिरंगा रांगोळी जमिनीवर साकारण्यापूर्वी तिची मांडणी आणि त्याभोवतीचे नियोजन योग्य पद्धतीने करता आले असते. फोटोसेशनसाठी तिरंग्यापासून अंतर ठेवण्याची साधी खबरदारीही घेता आली असती. तिरंग्याच्या भोवती चपला, बूट घालून मिरवणाऱ्यांना राष्ट्रभक्तीची जाणीव नसावी, याबाबत संताप व्यक्त होत आहे.

वंदे मातरम् गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने 'वंदे मातरम् भारताच्या स्वातंत्र्यलढ्याची हाक' या विशेष माहिती प्रदर्शनाचे उद्घाटन गुरुवारी पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले. यावेळी रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापालिका पान २ वर

### 'तिरंग्याचा सन्मान' कृतीतून दिसावा

दरम्यान, या छायाचित्राबाबत पनवेल महानगरपालिका प्रशासन आणि संबंधित मान्यवरांची भूमिका काय आहे, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. राष्ट्रप्रेमाचा संदेश देणाऱ्या कार्यक्रमातच तिरंग्याच्या प्रतिकृतीच्या सन्मानाबाबत प्रश्न निर्माण झाल्याने आयोजकांनी याचे गांभीर्याने स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी होत आहे.

# आज स्वातंत्र्य दिन

- देशभक्तीच्या जल्लोषाने रायगड दुमदुमणार
- ध्वजारोहणासह सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन शनिवारी (दि. १५) जिल्ह्यात विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा होणार आहे. शासकीय कार्यालये, शाळा-महाविद्यालये, स्थानिक स्वराज्य संस्थांसह विविध सामाजिक व सांस्कृतिक संस्थांच्या वतीने ध्वजारोहण, देशभक्तीपर गीतांचे कार्यक्रम आणि विविध सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यात सकाळी साडेसातपासून नऊ वाजेपर्यंत विविध ठिकाणी ध्वजारोहणाचे कार्यक्रम पार पडणार आहेत. अलिबाग पोलीस मुख्यालयात सकाळी ९.०५ वाजता रोजगार हमी, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते जिल्हास्तरीय मुख्य ध्वजारोहण होणार आहे. यावेळी पोलिसांकडून मानवंदना देण्यात येणार असून, देशभक्तीपर कार्यक्रमही सादर केले जाणार आहेत.

या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक आंचल दलाल, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी पान २ वर

### बलिदानाची गाथा नव्या पिढीपर्यंत

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने विविध सामाजिक व सांस्कृतिक संस्था, संघटनांकडून देशभक्तीपर गीतांचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाची गाथा आणि देशाच्या स्वातंत्र्याचे महत्त्व नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संदेश या कार्यक्रमांतून दिला जाणार आहे.

## रोषणाईत देशभक्तीचा उत्साह...



● स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला आकर्षक तिरंगा रोषणाईने अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालय उजळून निघाले असून, देशभक्तीचा उत्साह आणि स्वातंत्र्यदिनाचे वातावरण अधिक खुलून दिसत आहे. (छायाचित्र : समीर मालोदे)

# तिरंग्याच्या साक्षीने अलिबाग दुमदुमले!

- तिरंगा बाईक रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद
- देशभक्तीच्या घोषणांनी शहर निनादले

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

हातात तिरंगा... दुचाकींवर डौलाने फडकणारा राष्ट्रध्वज... 'भारत माता की जय'च्या गगनभेदी घोषणा आणि देशभक्तीपर गीतांनी अलिबागचे रस्ते दुमदुमलेले.. निमित्त होते शुक्रवारी (दि.१४) स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला अलिबाग नगरपरिषदेच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या तिरंगा बाईक रॅलीचे. संपूर्ण शहरातून काढण्यात आलेल्या रॅलीमुळे अलिबाग तिरंगामय झाल्याचे दिसून आले. घराघरात देशभक्तीची भावना जागृत करण्याबरोबरच स्वातंत्र्य दिनाचे महत्त्वदेखील या तिरंगा बाईक रॅलीच्या माध्यमातून पान २ वर



(छायाचित्र : समीर मालोदे)

> अलिबागकरांच्या मनात देशभक्तीची ज्योत कायम प्रज्वलित आहे. 'हर घर तिरंगा'च्या माध्यमातून या भावनेला व्यापक लोकसहभाग मिळावा, हा आमचा उद्देश होता. तिरंगा बाईक रॅलीने अलिबागला एका राष्ट्रध्वजाखाली एकत्र आणत राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक सलोख्याचा प्रेरणादायी संदेश दिला.
> – अक्षया प्रशांत नाईक, नगराध्यक्षा

> तिरंगा बाईक रॅली ही केवळ स्वातंत्र्यदिनाची मिरवणूक नव्हती, तर अलिबागच्या सामाजिक ऐक्याची आणि नागरिकांच्या राष्ट्रप्रेमाची अभिव्यक्ती होती. युवक, महिला आणि प्रत्येक समाजघटकाने उत्स्फूर्त सहभाग घेतल्याने 'हर घर तिरंगा'चा संदेश खऱ्या अर्थाने जनतेपर्यंत पोहोचला.
> – ॲड. मानसी म्हात्रे, उपनगराध्यक्षा

# ९८ रुपयांचे डिझेल १३० रुपयांना!

## ३२ रुपयांच्या फरकाने मच्छिमार संस्थांची आर्थिक कोंडी

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

एकीकडे मच्छिमारांना मदतीच्या घोषणा, तर दुसरीकडे डिझेलच्या दरातून आर्थिक कोंडी करायची. केंद्र सरकारच्या 'बल्क कन्झ्युमर' धोरणाचा फटका राज्यातील मच्छिमार सहकारी संस्थांना बसला असून, खुल्या बाजारात सुमारे ९८.१३ रुपये लीटरला मिळणारे डिझेल संस्थांना तब्बल १३० रुपयांना खरेदी करावे लागत आहे. तब्बल ३२ रुपयांच्या फरकामुळे मच्छिमारांनी संस्थांच्या पंपांकडे पाठ फिरवल्याने राज्यातील १३७ मच्छिमार सहकारी संस्था आर्थिक संकटात सापडल्या आहेत.

मच्छिमार संस्थांना 'बल्क कन्झ्युमर'मधून वगळून किरकोळ श्रेणीत समाविष्ट करण्याच्या मागणीसाठी गेल्या सहा महिन्यांपासून संघर्ष सुरू आहे. मात्र, अद्याप निर्णय झालेला नसल्याने संस्थांनी डिझेल खरेदी-विक्री बंद करण्याची वेळ आली आहे. संस्थांच्या डिझेल विक्रीतून मिळणाऱ्या उत्पन्नावर कर्मचाऱ्यांचे वेतन आणि दैनंदिन खर्च भागवला जात असल्याने आता हजारो कर्मचाऱ्यांच्या वेतनाचाही प्रश्न निर्माण झाला आहे.

कोट्यवधींच्या पान २ वर

# अन्यथा 'सांबरकुंड'ला विरोध

## बाधित शेतकऱ्यांचा मागण्यांसाठी संघर्ष

- रामराज ग्रामपंचायतीत बहुमताने ठराव मंजूर
- ग्रामपंचायत शासनाला करणार पत्रव्यवहार

**। रायगड । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील बहुचर्चित आणि बहुप्रतिक्षीत असणाऱ्या सांबरकुंड माध्यम प्रकल्प गतीने पूर्ण करण्यासाठी शासनाने कंबर कसली असली तरी बाधितांनी या धरण प्रकल्पाला विरोध दर्शविण्यासाठी संघर्षात्मक पवित्रा घेतला आहे. धरणनिर्मितीच्या घोषणेनंतर आजपोवेतो धरणाला आमचा विरोध नाही; परंतु आमच्या मागण्या मान्य करा आणि खुशाल धरण उभारा, अशी भूमिका बाधित शेतकऱ्यांनी शासनाला कळविली आहे. परंतु, शासनाने शेतकऱ्यांना गृहीत धरून धरणाच्या निर्मितीला वेग दिल्याने संतप्त बाधितांनी स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला रामराज ग्रामपंचायतीच्या विशेष ग्रामसभेत धडक दिली. आयत्या वेळच्या विषयात ग्रामसभेसमोर लेखी मागणी सादर करून शासनाने मागण्या मान्य केल्या नाहीतर धरणाला आमचा विरोध राहील, आम्ही आमच्या जमिनी देणार नाही, असा इशारा ग्रामसभेमार्फत शासनाला दिला आहे.



ग्रामसभेसमोर सादर केलेल्या मागण्यांचा ठराव मंजूर करा, अशी मागणी बाधितांनी ग्रामसभेचे अध्यक्ष मोहन दत्तात्रेय धुमाळ यांच्याकडे केली. बाधित शेतकऱ्यांच्या या मागण्या रास्त आहेत. ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या या धरणामुळे ग्रामपंचायत परिसरासह अलिबाग तालुक्याचा फायदा होणार आहे. यामुळे ग्रामपंचायत हद्दीतील सर्व नागरिक बाधितांच्या सोबत राहून हा लढा यशस्वी पान २ वर

### मराठी शिकण्यासाठी महिनाभराची मुदतवाढ

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्रातील रिक्षा, टॅक्सी आणि ॲपवरील प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांना मराठी भाषेचे व्यवहारिक ज्ञान असणे अनिवार्य करण्यात आले आहे. यापूर्वी मराठी शिकण्यासाठी १५ ऑगस्टपर्यंतची मुदत देण्यात आली होती. मात्र, अद्याप अनेक चालकांना मराठीत संवाद साधता येत नसल्याने शासनाने आणखी एक महिन्याची मुदतवाढ दिली आहे. मोटार वाहन नियमांमध्ये सुधारणा करून प्रवाशांशी संवाद साधण्यासाठी चालकांना मराठी बोलता येणे बंधनकारक केले आहे. वाढीव मुदतीतही मराठीचे आवश्यक ज्ञान प्राप्त केले नाही, तर चालकाची अनुज्ञप्ती तीन महिन्यांपर्यंत निलंबित करण्यासह परवाना रद्द करण्याची कारवाई होऊ शकते.

## हातात पुस्तकांऐवजी आयुष्याची चिंता | विकासाच्या बढाया मारणाऱ्यांना वास्तवाचे दर्शन

# स्वातंत्र्याच्या ७९ वर्षांनंतरही पोटासाठी धडपड!

**घनश्याम कडू**

**। उरण ।**

उद्या देशभर तिरंगा डौलाने फडकेल... राष्ट्रगीताने आसमंत भारून जाईल... स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाची गाथा सांगितली जाईल. पण, याच स्वातंत्र्याच्या उत्सवापासून काही हात अजूनही दूर आहेत. कारण, ज्या वयात हातात दप्तर असायला हवे, त्या हातात पोटाची भूक भागवण्यासाठी धडपड आहे; ज्या डोळ्यांत खेळण्यांची स्वप्ने असायला हवीत, त्या डोळ्यांत 'आज किती विक्री होईल?' ही चिंता आहे. स्वातंत्र्याच्या ७९ वर्षांनंतरही रायगडसह उरणच्या रस्त्या-रस्त्यावर दिसणारे हे चित्र देशाच्या विकासाच्या बढाया मारणाऱ्यांसाठी अंतर्मुख करणारे आहे.

भारत स्वतंत्र झाला; देशाने विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग, शिक्षण आणि पायाभूत सुविधांमध्ये मोठी प्रगती केली. महासत्ता होण्याची स्वप्ने पाहिली जात आहेत. मात्र, या विकासाच्या झगमगाटाच्या सावलीत पोटासाठी रस्त्यावर उभे असलेली लहान मुले आजही आपल्या व्यवस्थेला प्रश्न विचारत आहे. रायगड जिल्ह्यासह उरण तालुक्यात अनेक ठिकाणी लहान मुले विविध वस्तू विकताना, ग्राहकांच्या मागे फिरताना दिसतात. एखादा ग्राहक वस्तू घेतो तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर क्षणभर समाधान उमटते; पुढच्याच क्षणी पुन्हा दुसऱ्या ग्राहकाच्या शोधात त्यांची धावपळ सुरू होते. त्यांच्या या धावपळीत शाळा कुठे आहे? खेळ कुठे आहे? बालपण कुठे आहे? ज्या वयात मुलांनी शाळेची घंटा ऐकावी, शिक्षकांचे शब्द ऐकावे, मित्रांसोबत खेळावे आणि उद्याची स्वप्ने रंगवावीत, त्या वयात त्यांना भुकेशी दोन हात करण्यासाठी रस्त्यावर उतरावे लागते, ही वस्तुस्थिती केवळ त्या कुटुंबाची शोकांतिका नाही; ती संपूर्ण समाजाच्या संवेदनशीलतेची परीक्षा आहे. परंतु, पान २ वर



### चिमुकल्यांना स्वातंत्र्य कधी?

देशाचा तिरंगा उंच फडकेल; पण त्याच तिरंग्याखाली एखादे बालपण भुकेने वाकलेले असेल, तर आपली मान अभिमानाने किती उंच राहणार? रस्त्यावरील चिमुकल्यांच्या हातात उद्या विक्रीचा माल नव्हे, तर पुस्तक असावे... पोटाची चिंता नव्हे, तर भविष्याचे स्वप्न असावे... कारण, तिरंग्याला खरी मानवंदना तेव्हाच मिळेल, जेव्हा देशातील एकही मूल भुकेसाठी आपले बालपण विकायला रस्त्यावर उतरणार नाही! परंतु, विकासाचे प्राधान्यक्रम बदलणाऱ्यांना याचे गांभीर्य कधी कळणार, हाच खरा सवाल आहे.

# 'टीन कॅम्प'साठी विद्यार्थ्यांवर सक्ती नको!

## शिक्षण विभागाचा रायन स्कूलला दणका

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

नववी उत्तीर्ण होऊन दहावीत गेलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच 'टीन कॅम्प'च्या नावाखाली शुल्क भरण्यासाठी सक्ती केली जात असल्याच्या तक्रारीची पंचायत समिती पनवेलच्या शिक्षण विभागाने गंभीर दखल घेतली आहे. खांदा कॉलनी येथील रायन इंटरनॅशनल स्कूलला पत्र पाठवून विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहल, टीन कॅम्प अथवा तत्सम उपक्रमात सहभागी होण्यासाठी कोणत्याही प्रकारची सक्ती करू नये, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत.

### गुणांशी संबंध जोडल्याचा आरोप

तक्रारीत दहावीच्या गुणांशी संबंधित गंभीर आरोपही करण्यात आला आहे. 'टीन कॅम्प'मध्ये सहभागी न झाल्यास विद्यार्थ्यांना शाळेकडून मिळणारे २० गुण मिळणार नाहीत, अशा प्रकारची सक्ती केली जात असल्याचा आरोप आहे. शैक्षणिक गुणांचा आधार घेऊन विद्यार्थ्यांना सहलीसाठी प्रवृत्त करणे योग्य आहे का, असा प्रश्न यामुळे उपस्थित झाला आहे.

परिवर्तन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष महादेव पान २ वर

# १५ दिवस उलटूनही आरोपी पोलिसांच्या हाती नाहीत

**पेण** : उद्योजक मयूर वनगे मारहाण प्रकरणातील मुख्य आरोपी भाजपचे उपजिल्हाध्यक्ष मंगेश रघुनाथ दळवी, हरेश कृष्णा दळवी, रूपेश कृष्णा दळवी आणि रंजीत दळवी हे गुन्हा दाखल होऊन १५ दिवस उलटूनही पोलिसांच्या हाती लागलेले नाहीत. आरोपी अद्याप पोलिसांच्या नजरेआड असल्याने पोलिसांच्या कार्यपद्धतीवर सर्वसामान्यांकडून प्रश्न उपस्थित केले जात असून, या प्रकरणात राजकीय हस्तक्षेपाचा संशयही व्यक्त केला जात आहे.

दरम्यान, चार आरोपींपैकी आरोपी क्रमांक चार रंजीत दळवी याने जामिनासाठी जिल्हा सत्र न्यायालयात अर्ज दाखल केला असून, या अर्जावर सोमवारी सुनावणी होणार आहे. त्यामुळे न्यायालय या अर्जावर काय निर्णय घेते, याकडे पेणसह संपूर्ण रायगडचे लक्ष लागले आहे.

रंजीत दळवी याचे नाव यापूर्वी पेण-हेटवणे कालव्यातील पूल अपहार प्रकरणातही चर्चेत आले होते. या प्रकरणात एकूण ११ पूल गायब झाल्याचे समोर आले होते. त्यापैकी दोन पुलांबाबत रंजीत दळवी याच्यावर जबाबदारी निश्चित झाल्याचे सांगितले जात असून, उर्वरित पुलांचे साहित्य चोरीस गेल्याचे तपासात निष्पन्न झाल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले होते. या प्रकरणात पोलिसांनी सुमारे ५६ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केल्याची माहिती आहे. मयुर वनगे मारहाण प्रकरणात चोरीसह विविध कलमांनुसार गुन्हा दाखल असल्याने रंजीत दळवीच्या जामीन अर्जावर न्यायालय काय भूमिका घेते, याकडे विशेष लक्ष लागले आहे.

## पान १ वरून

### भाजपचं लोका सांगे...

सदस्य, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. प्रदर्शनाच्या ठिकाणी तिरंग्याची प्रतिकृती रांगोळीच्या माध्यमातून साकारण्यात आली होती. स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर देशभक्तीचा संदेश देण्यासाठी केलेली ही रांगोळी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली. मात्र, याच तिरंगा रांगोळीभोवती बूट-चपला घालून मान्यवर उभे राहिल्याचे छायाचित्र समोर आल्याने कार्यक्रमाच्या उद्देशालाच छेद गेल्याची टीका सुरू झाली आहे. राष्ट्रध्वजाचा सन्मान हा केवळ घोषणा, भाषणे आणि अभियानांपुरता मर्यादित नसतो. राष्ट्रध्वजाची प्रतिकृती साकारताना तिची प्रतिष्ठा आणि सन्मान यांचीही काळजी घेणे अपेक्षित असते. मग फोटो काढण्यासाठी तिरंग्याच्या प्रतिकृतीपासून दोन पावले दूर उभे राहणे एवढेही अवघड होते का, असा सवाल आता उपस्थित होत आहे. विशेष म्हणजे, हा एखादा सामान्य सार्वजनिक कार्यक्रम नव्हता. स्वातंत्र्यलढ्याची माहिती, वंदे मातरम् आणि राष्ट्रप्रेमाचा संदेश देण्यासाठी आयोजित केलेले प्रदर्शन होते. अशा कार्यक्रमातून नागरिकांना राष्ट्रीय प्रतीकांचा सन्मान करण्याचा आदर्श घालून देणे अपेक्षित असताना, त्याच ठिकाणी झालेल्या या फोटोसेशनमुळे आयोजकांची संवेदनशीलता कुठे होती, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

एकीकडे नागरिकांनी घराघरांत तिरंगा फडकवावा, राष्ट्रध्वजाचा सन्मान करावा, देशभक्तीची भावना जागवावी, अशी आवाहने केली जातात. मात्र, त्याच तिरंग्याची प्रतिकृती जमिनीवर साकारून तिच्याभोवती बूट-चपलांसह उभे राहून छायाचित्रे काढली जात असतील, तर नागरिकांनी नेमका कोणता आदर्श घ्यायचा? असा सवाल सुदाम पाटील यांनी केला. राष्ट्रप्रेमाचा आव आणणे सोपे; पण राष्ट्रध्वजाबद्दलची संवेदनशीलता प्रत्यक्ष कृतीतून दाखवणे महत्त्वाचे आहे. देशभक्ती ही फक्त घोषणांमध्ये आणि फलकांवर नको, ती वर्तनातूनही दिसली पाहिजे, अशी टीकाही यानिमित्ताने होत आहे.

### आज स्वातंत्र्य दिन

व कर्मचारी उपस्थित राहणार आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते, तर जिल्हा परिषद कार्यालयात मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे. पोलीस अधीक्षक कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, तहसीलदार कार्यालय, जिल्हा सामान्य रुग्णालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पंचायत समित्या, ग्रामपंचायती तसेच विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यालयांमध्येही ध्वजारोहण केले जाणार आहे. शाळा-महाविद्यालयांमध्येही स्वातंत्र्य दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. देशभक्तीपर गीत, भाषणे, सांस्कृतिक कार्यक्रम, निबंध व वक्तृत्व स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेमाची भावना जागविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

### सांबरकुंड धरणाला विरोध

करू, असे अनुमोदन बाधितांनी मांडलेल्या मागण्याच्या ठरावाला रामराज येथील आप्पा पालकर यांनी दिले. त्यानुसार सांबरकुंड प्रकल्प बाधितांच्या मागण्यांचा गांभीर्यपूर्वक विचार करून बहुमताने ग्रामसभेसमोर बहुमताने ठराव मंजूर करण्यात आला. हा ठराव ग्रामपंचायतीने शासनाला पत्रव्यवहार करून कळवावा या मागणीवरदेखील शिक्कामोर्तब करण्यात आले. संपादित होणाऱ्या जमिनीला प्रतिगुंठा १० लाख रुपये दर द्यावा, धरणाच्या कालवा परिसरात बाधित शेतकऱ्यांना जमिनीच्या बदल्यात शेतजमीन द्यावी, पुनर्वसन करताना साडेबावीस टक्क्यांचा निर्णय लागू करावा, पुनर्वसन वसाहत उभारणीमध्ये शासकीय योजनांची अंमलबजावणी करावी, बाधित शेतकऱ्यांना सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे पेन्शन योजना लागू करण्यात यावी, सांबरकुंड धरण प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना प्रकल्पात भागीदारी मिळावी, प्रकल्पग्रस्तांना शासकीय सेवेत नोकरी द्यावी, धरणाच्या भिंतीसमोर येणाऱ्या महान आणि महानवाडी गावांचे पुनर्वसन करण्यात यावे, सांबरकुंड धरण प्रकल्पग्रस्तांना नोकरीसाठी जिल्ह्यातील एमआयडीसी क्षेत्रात प्राधान्य मिळावे, प्रकल्प उभारणी करताना कंत्राटदाराने बेरोजगारांना रोजगार देण्यासाठी प्राधान्य द्यावे, औद्योगिक वापरासाठी धरणाचे पाणी जाणार असेलतर संबंधित प्रकल्पांमध्ये नोकरी देण्यात यावी, धरण उभारण्यापूर्वी धरणाच्या भिंतीसमोरील दोन किलोमीटर परिसराचा भू वैज्ञानिक सर्वे करावा, धरणाचा केलेला अंतिम निवड रद्द करून नव्याने अंतिम निवड करावा, विहित वेळेत प्रकल्प उभारला नसल्याने शेतकऱ्यांचा भूसंपादन समाविष्ट आणि सातबारा सदरी असणारी नोंद रद्द करून सातबारा कोरा करून द्यावा, अशा अनेक मागण्यांचे निवेदन बाधित शेतकऱ्यांच्या वतीने सांबरकुंड पाचगाव प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीने ग्रामसभेसमोर सादर करण्यात आले.

भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर १४ ऑगस्ट रोजी रामराज ग्रामपंचायतीमध्ये सकाळी साडेनऊ वाजता विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. सभेचा कोरम पूर्ण झाल्यानंतर साडेदहा वाजता सभेला सुरुवात झाली. प्रथम ग्रामसेवक चव्हाण यांनी ग्रामसभेच्या पटलावर असणारे विषय सभेसमोर मांडून त्याबाबतचे ठराव घेण्यात आले. शासकीय योजना आणि स्वातंत्र्यदिनाची माहिती ग्रामसभेसमोर विशद करण्यात आली. त्यानंतर सांबरकुंडबाधितांच्या न्यायासाठी दोन अर्ज सादर करण्यात आले होते. ते अर्ज सभेसमोर आयत्या वेळच्या विषयात मांडण्यात आले. बाधितांकडून रमेश धनावडे यांनी ग्रामसभेसमोर प्रकल्प बाधितांच्या वेदना शाब्दिक स्वरूपात मांडल्या. बाधितांनी सादर केलेल्या मागण्यांवर ग्रामसभेत कोणाचा आक्षेप आहे का, हे ग्रामसेवकांनी विचारताच उपस्थितांनी बाधितांच्या मागण्या ठराव मंजूर करण्यासाठी तातडीने घ्या आणि शासनाला कळवा, असा सूर आळवला.

### तिरंग्याच्या साक्षीने अलिबाग दुमदुमले!

पटवून देण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, या रॅलीत अलिबागकरांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत राष्ट्रप्रेमाचा जल्लोष केला.

'हर घर तिरंगा' अभियानाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये राष्ट्रध्वजाबद्दल आदर, अभिमान आणि देशप्रेमाची भावना अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हाधिकारी किशन जावळे, नगराध्यक्षा अक्षया नाईक, उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, बांधकाम सभापती प्रशांत नाईक आणि मुख्याधिकारी सागर साळुंखे यांच्या प्रमुख उपस्थितीत रॅलीला सुरुवात झाली. यावेळी नगरपरिषदेचे पदाधिकारी, सदस्य, अधिकारी-कर्मचारी तसेच शहरातील नागरिक मोठ्या संख्येने रॅलीत सहभागी झाले. दुचाकींवर तिरंगा फडकवत आणि देशभक्तीच्या घोषणा देत नागरिकांनी शहरातून मार्गक्रमण केले. त्यामुळे अलिबागच्या रस्त्यांवर उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

नगरपरिषद कार्यालयाच्या आवारातून सुरू झालेली रॅली एसटी स्थानक, महावीर चौक, ब्राह्मण आळीतील श्रीराम मंदिर, नेने यांचे घर, जुने नगरपरिषद कार्यालय, बालाजी नाका, छत्रपती शिवाजी महाराज चौक, जुनी बाजारपेठ, जामा मशिद, मारुती नाका मार्गे अलिबाग समुद्रकिनारी पोहोचली. समुद्रकिनारी देशभक्तीच्या जल्लोषात रॅलीचा समारोप झाला. रॅलीदरम्यान नागरिकांना प्रत्येक घरावर अभिमानाने राष्ट्रध्वज फडकवून स्वातंत्र्यदिन साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले. अलिबागकरांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे तिरंगा बाईक रॅली स्वातंत्र्यदिनाच्या उत्सवातील आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली.

**तिरंग्याखाली एकवटले अलिबाग!**

धर्म, इतिहास, व्यापार आणि समुद्रकिनाऱ्याची ओळख असलेल्या अलिबागला तिरंगा बाईक रॅलीने एका राष्ट्रध्वजाखाली एकत्र आणले. युवक, महिला आणि विविध समाजघटकांचा सहभाग हे या रॅलीचे वैशिष्ट्य ठरले. देशभक्ती केवळ स्वातंत्र्यदिनापुरती मर्यादित न राहता ती नागरिकांच्या आचरणातही दिसावी, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

### 'टीन कॅम्प'साठी विद्यार्थ्यांवर सक्ती नको!

वाघमारे यांनी ६ एप्रिल २०२६ रोजी याबाबत तक्रार केली होती. त्यानंतर शिक्षण विभागाने शाळेला पत्र देत संबंधित शासन निर्णयातील तरतुदींची आठवण करून दिली. शैक्षणिक सहल किंवा कॅम्प आयोजित करता येतो; मात्र विद्यार्थ्यांना त्यात सहभागी होण्यासाठी सक्ती करता येत नाही, अशी भूमिका शिक्षण विभागाने स्पष्ट केली आहे.

तक्रारीनुसार, दहावीत गेलेल्या विद्यार्थ्यांना 'टीन कॅम्प'मध्ये सहभागी होण्यासाठी शुल्क भरण्यास सांगितले जात असून, काही विद्यार्थ्यांवर व पालकांवर दबाव आणला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. आर्थिक परिस्थितीमुळे शुल्क भरणे शक्य नसलेल्या पालकांसमोर त्यामुळे अडचणी निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

गटशिक्षणाधिकारी शाहू सतपाल यांनी पाठवलेल्या पत्रात शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या २० मे २०१७ रोजीच्या शासन निर्णयाचा संदर्भ देण्यात आला आहे. सहलीसाठी विद्यार्थी व पालकांची संमती आवश्यक असून, कोणत्याही विद्यार्थ्यावर सक्ती करता येणार नसल्याचे या निर्णयातील तरतुदींवरून स्पष्ट होते. शुल्क भरणे किंवा कॅम्पमध्ये सहभागी होणे यासाठी विद्यार्थ्यांवर अथवा पालकांवर आर्थिक किंवा शैक्षणिक दबाव टाकू नये, असेही शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे परिवर्तन सामाजिक संस्थेच्या पाठपुराव्यामुळे विद्यार्थ्यांना दिलासा मिळण्याची शक्यता असून, रायन इंटरनॅशनल स्कूल प्रशासन आता कोणती भूमिका घेते, याकडे पालकांचे लक्ष लागले आहे.

### ९८ रुपयांचे डिझेल १३० रुपयांना!

गाड्या वापरणाऱ्यांना स्वस्त दरात डिझेल मिळते; मग गरीब मच्छिमारांनाच महाग डिझेल का? असा सवाल करंजा मच्छीमार संस्थेचे अध्यक्ष प्रदीप नाखवा यांनी केला. मत्स्यव्यवसायाला कृषीचा दर्जा दिला, मात्र सुविधा देताना सरकारच्या घोषणा 'बोलाचाच भात आणि बोलाचीच कढी' ठरत आहेत, अशी टीका वेस्ट कोस्ट पर्ससीन नेट फिशिंग असोसिएशनचे सचिव रमेश नाखवा यांनी केली.दरम्यान, केंद्रीय मंत्र्यांच्या भेटी, बैठका आणि निवेदनांनंतरही प्रश्न सुटलेला नसल्याने मच्छिमारांच्या समस्यांकडे केंद्र व राज्य सरकारचे दुर्लक्ष होत आहे, अशी टीका महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीचे सरचिटणीस किरण कोळी यांनी केली.

### ...पोटासाठी धडपड!

राजकीय फोडाफोडीच्या उद्योगात मग्न असणाऱ्या सत्ताधाऱ्यांना अशा मुलांकडे पाहण्यासाठी, त्यांच्या व्यथा जाणून घेण्यासाठी वेळ मिळेल का? गरिबी निर्मूलनाच्या घोषणा झाल्या. बालकल्याणासाठी योजना आल्या. शिक्षणाचा अधिकार मिळाला. मुलांच्या पोषणासाठी कोट्यवधी रुपये खर्च झाल्याचे सांगितले जाते. मग या चिमुकल्यांच्या आयुष्यात या योजनांचा प्रकाश पोहोचत का नाही, हाच गंभीर सवाल आहे. कागदावर बालकांचे भविष्य उज्ज्वल आणि प्रत्यक्षात त्यांना दोन वेळच्या भुकेसाठी काबाड कष्ट करावे लागतात, हा विरोधाभास प्रशासनाच्या नजरेतून कसा सुटतो? उद्या स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमांत देशाच्या प्रगतीचे पोवाडे गायले जातील. तिरंग्याला सलामी दिली जाईल. पण, रस्त्याच्या कडेला पोटासाठी वस्तू विकणाऱ्या त्या मुलाच्या डोळ्यांतील प्रश्नाकडे कोण पाहणार?

### दोन अपघातात दोघे ठार

या भीषण अपघातात ते गंभीर जखमी झाले. घटनेनंतर त्यांना तातडीने पनवेल उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचार सुरू होण्यापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. अपघातानंतर ट्रेलरचालक वाहनासह घटनास्थळावरून पसार झाला. याच रात्री सुमारे १ वाजण्याच्या सुमारास दुसरी घटना एक्स्प्रेस-वेकडे जाणाऱ्या मार्गावर देवांशी इन हॉटेलसमोर घडली. अंदाजे ४० ते ४५ वर्षे वयोगटातील एका अनोळखी व्यक्तीला अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. धडकेनंतर संबंधित व्यक्ती वाहनाच्या चाकाखाली आल्याने गंभीर जखमी झाली.

घटनेची माहिती मिळताच कळंबोली पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत जखमी व्यक्तीला पनवेल उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले. मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नसून त्याबाबत पोलीस तपास करीत आहेत. या दोन्ही अपघातांप्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले असून फरार वाहनचालकांचा शोध सुरू आहे. तसेच दुसऱ्या अपघातातील मृत व्यक्तीची ओळख पटविण्याचे प्रयत्नही पोलीस करीत आहेत.

**कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड**
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

**शुद्धिपत्र**

14.08.2026 रोजीच्या खुल्या ई-निविदा आमंत्रण सूचनेच्या संदर्भात, कृपया खालील सुधारणा लक्षात घ्यावी: **अ.क्र.: 1. निविदा सूचना क्र.: केआर/आरएन/ईएल/टी/16ए/2026.** ऑनलाइन निविदा जमा करण्याची अंतिम तारीख व वेळ 24.09.2026 ऐवजी **04.09.2026** आहे. **अ.क्र.: 2. निविदा सूचना क्र.: केआर/आरएन/ईएल/टी/24/2026.** ऑनलाइन निविदा जमा करण्याची अंतिम तारीख व वेळ 24.09.2026 ऐवजी **04.09.2026** आहे. इतर सर्व नियम व अटी अपरिवर्तित राहतील.

### जाहीर नोटीस

आमचे अशिल श्री.तुकाराम रामा घवाली रा.वांदेली, ता.मुरुड, जि. रायगड यांनी दिलेल्या माहितीवरुन व त्यांचे सुचनेवरुन सर्व लोकांस कळविण्यात येते की,

मौजे वांदेली, ता. मुरुड येथील गट क्र. उपविभाग १११ क्षेत्र १-३७-०० हे. आर आकार १८-१२ रु. पैसे ही मिळकत आमचे अशिलांचे कुटूंबाचे मालकीची व खुद्द ताबेकब्जा वहिवाटीची मिळकत असून सदर मिळकतीचे ७/१२ सदरी चुकीने दत्तात्रेय रामजी घडशी या इसमाचे नाव लागलेले आहे. सदर इसमाचा सदर मिळकतीशी वा आमचे अशिलांचे कुटूंबाशी कोणताही संबंध नाही. सदर इसमाची नोंद चुकीने ७/१२ सदरी झालेली आहे त्याबाबत आमचे अशिलांनी सर्व ठिकाणी शोध घेतला तसेच महसुल दप्तरातील ही शोध घेतलेला आहे. परंतु सदर इसम आमचे अशिलांचे गावचे कार्यक्षेत्रामध्ये व आजुबाजुच्या गावातही कुठेही आढळून आलेला नाही. तरी सदर इसम हयात असल्यास त्यांनी हि नोटीस मिळाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खाली सही करणार वकील वा आमचे अशिल यांना कागदोपत्री पुराव्यासह त्यांचे म्हणणे दाखल करावे अन्यथा सदर इसम हा अस्तित्वात नाही असे गृहित धरुन त्यांचे नाव सदर मिळकतीच्या ७/१२ सदरातून कमी करण्यात येईल.
हे कळावे.

अलिबाग,
दि. १४-०८-२०२६.

**ॲड.आर.बी.कोसमकर**
चिरायु, ब्राम्हणआळी, अलिबाग
ता.अलिबाग, जि.रायगड.

### Change in Name

Declaration

I hereby declare by this paper notice that I'm changing my name from JAIVANT PANDURANG PATIL to JAYWANT PANDURANG PATIL for passport issuance.
Jaywant Pandurang Patil,
At:- Horale, Po:- Vavoshi, Tal:- Khalapur,
Dist:- Raigad- 410203

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांना मौजे शिरढोण, ता. पनवेल, जि. रायगड येथील खाली वर्णन केलेली संपूर्ण मिळकत विद्यमान मालक पुजा प्रसन्न अंबुलकर, जगदीश जयवंत पाटील, सुजाता अनिल भाटकर यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे. विद्यमान मालकांनी मिळकतीवरील त्यांचा मालकीहक्क निर्वेध असल्याचा भरवसा दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे शिरढोण, ता. पनवेल, जि. रायगड येथील**

| भुमापन व उपविभाग क्र. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|
| २०/२/३ | १-२७-०० | ५.०० |

वर नमूद मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल मिळकत खरेदी घेण्याचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : १५/०८/२०२६

**ॲड. रविंद्र विनायक ओक**
'गुरूकृपा' महर्षी कर्वे रोड,
ता.अलिबाग, जि. रायगड

### जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकती मिळकतींचे विद्यमान मालक १)तारामती हरिश्चंद्र चुणेकर, २) प्रशांत हरिश्चंद्र चुणेकर, ३) शमा रमेश पाटील यांचेकडून विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत. सदर मिळकती निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| नागांव ता.अलिबाग जि.रायगड | १५९१ | क्षेत्र ०.२९.८० पो. ख ०.००.०० एकुण ०.२९.८० | १.८२ |
| नागांव ता.अलिबाग जि.रायगड | १५७३ | क्षेत्र ०.१२.९० पो ख ०.०२.०० एकुण ०.१४.९० | ०.४७ |

तरी वरील मिळकतींच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस लिज, फरोक्त, साठेकरार कोर्टात दावा, मृत्यूपत्र अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध व विनजोखमी आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतींचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : १५/०८/२०२६

**ॲड. विजय अनंत पेढवी**
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा, पो. झिराड,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो.नं. ९८२२१८६७४०

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे झिराड, ता.अलिबाग जि.रायगड येथे खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिल १ श्री.सुनिल दत्तात्रय कुलकर्णी, २.राजेंद्र दत्तात्रय कुलकर्णी, ३.अनिल दत्तात्रय कुलकर्णी ४.आरती अनंत कोसबे, ५.साधना विकास खळे, ६.जोत्सना संदेश वैद्य, ७.उर्मिला उल्हास कुलकर्णी, ८.उर्वशी उल्हास कुलकर्णी पैकी अनु क्र.१ ते ३, व ७, ८ हे मौजे रमा निवास, नारायण पाखाडी, श्रीवर्धन ता.श्रीवर्धन, जि.रायगड, अनु क्र.४ या मौजे भाई प्रसाद, प्रभुआळी, श्रीवर्धन ता.श्रीवर्धन, जि.रायगड व अनु क्र.५ या ए-४०३, न्यु अवंतिका को ऑप. हाउसिंग सोसायटी, राजाजी पथ, म्हात्रे नगर, डोंबिवली पुर्व, अनु क्र.६ या ए-२७ स्नेह सदन, को ऑप हाउसिंग सोसायटी प्लॉट नं.४, गोराई वेस्ट मुंबई ०००९२ यांचे मालकीची व ताबेकब्जा वहिवाटीची आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १ | १०५ | ०-४५-०० ०-०३-०० एकूण क्षेत्र ०-४८-०० | ०-८० |

वरील मिळकतीवर आमचे अशिलांसह अशोक आमले व जयंत विठ्ठल सावंत वगैरे यांची नावे सातबाऱ्यावर आहेत. आमचे अशिलांचा वरील मिळकतीवर १/३ अविभाज्य हिस्सा आहे. अद्यापही आमचे अशिल अशोक आमले व जयंत सावंत वगैरे यांच्यामध्ये मिळकतीचे वाटप झालेले नाही.

अशाप्रकारची वस्तुस्थिती असतानाही अशोक आमले व सावंत सदरची मिळकत अन्य इसमास विकण्यास निघाले असल्याची माहिती आमचे अशिलांना नुकतीच मिळालेली आहे. सदर विक्री व्यवहारास आमचे अशिलांची सक्त हरकत आहे. आमचे अशिलांची सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास समंती नाही.

तरी या नोटीसीद्वारे सर्वांना कळविण्यात येत आहे की, वरील मिळकतीबाबत कोणीही कसल्याही प्रकारचा व्यवहार आमले अथवा सावंत यांचेसोबत अथवा त्यांचे नोकर चाकर एजंट यांच्यासोबत करू नये केल्यास तो व्यवहार बेकायदेशीर होईल व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दि.१४/०८/२०२६

सही/-
**ॲड.प्रविण मधुकर ठाकूर**
जिल्हा व सत्र न्यायालय
रायगड-अलिबाग

### जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी मौजे बामणोली, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक १) उषा वसंत शिंदे, २) मनोज वसंत शिंदे, ३) उज्वला दशरथ कदम, ४) सिद्धी विजय नावरे, ५) सत्यजित वसंत शिंदे यांचेकडून विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| बामणोली ता.अलिबाग जि.रायगड | २३० | क्षेत्र ०.२५.४० पो.ख.०.०३.३० एकूण क्षेत्र ०.२८.७० | ६.८२ |

तरी वरील मिळकतीच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व विनजोखमी आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीची खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : /०८/२०२६

**ॲड. विजय अनंत पेढवी**
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा, पो.झिराड,
ता.अलिबाग, जि.रायगड.
मो.नं. ९८२२१८६७४०

### अलिबाग नगरपरिषद

**निविदा सूचना**

अलिबाग नगरपरिषदेकरीता खालील प्रमाणे इच्छूक पुरवठादारांकडून ऑफलाईन पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | कामाचा तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १ | अलिबाग नगरपरिषद हद्दीतील मोकाट गुरांना पकडुन कोंडवाड्यात टाकणे व त्यांची देखभाल करणे तसेच कोंडवाड्याचे ठिकाणाहुन सुरक्षित वाहनांतून गाय, वासरु, बैल, इ. प्राण्यांची वाहतुक ता. पेण येथील गोशाळेत सुरक्षितपणे सुपुर्द करणेबाबत. | १७/०८/२०२६ ते २५/०८/२०२६ वेळ: सायं ०४.०० पर्यंत |

वरील प्रमाणे इच्छूक पुरवठादाराकडून विहित नमुन्यामध्ये ऑफलाईन पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे. निविदा सादर करताना प्रत्येकाचे स्वतंत्र निविदा सादर करणे आवश्यक आहे. निविदे संबंधित अधिक माहिती अलिबाग नगरपरिषद आरोग्य विभागत उपलब्ध आहे.

सही/-
**मुख्याधिकारी**
**अलिबाग नगरपरिषद**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल मिनी राजीव मेहरा व रूचिर राजीव मेहरा, जे खाली नमूद परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतींचे एकमेव व पुर्ण मालक आहेत, त्यांच्या मालकीची खाली परिशिष्टात नमूद केलेली मिळकत विक्री करू इच्छित आहेत.

तरी ज्या इसमांचा त्या मिळकतीमध्ये अथवा त्यातील कोणत्याही भागावर अथवा भागामध्ये करार, संमतीज्ञापन, भागीदारी, खरेदी, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, वारसा, बोजा, दान, गहाण, हस्तांतरण, अदलाबदल, विश्वस्त, ताबा, परवाना, वहिवाट, कसवणुक, पोटगी, मृत्यूपत्र, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, कोर्टाचा हुकुमनामा, वहिवाटीच्या रस्त्याचा करार या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असेल, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित रजिस्टर्ड पोस्ट ए.डी.द्वारे लेखी कळवावे. मुदतीत तसे कुणीही न कळविल्यास, सदर मिळकतीमध्ये आमचे अशिलांव्यतिरिक्त अन्य कुणाचाही कोणताही हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास तो कायम स्वरूपी आमचे अशिलांच्या लाभात सोडून देण्यात आला आहे, असे समजण्यात येईल व आमचे अशिल इच्छूक खरेदीदारांच्या लाभात विक्री व्यवहार पुर्ण करतील. नोटीस मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार, हरकत अथवा दावा विचारात घेतला जाणार नाही.

**परिशिष्ट**
**मौजे किहीम, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| गट नं./हि. नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार रू.पैसे |
|---|---|---|
| ४०२/१ | ला.यो. ३-९६-०० पो. ख. ०-२२-५० एकूण ४-१८-५० | १२०.७७ |

सदर मिळकतीपैकी मिनी राजीव मेहरा व रूचिर राजीव मेहरा यांच्या मालकीची ० हे. ५१.५० आर, आकार २३ रूपये ३५ पैसे एवढी मिळकत.
सदर मिळकतीस चतुः सिमा :
पुर्वेस : मौजे किहीम गट नं. ४०५ व ४०६ या मिळकतीच्या हद्दी.
पश्चिमेस : किहीम-नवगांव गावरस्ता.
दक्षिणेस : मौजे किहीम गट नं. ४०२/१ पैकी उर्वरित मिळकत
उत्तरेस : मौजे किहीम गट नं. ४२१/२ व ४२१/३ या मिळकतींच्या हद्दी.

अलिबाग
तारीख : १५/८/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
अे /१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. शिलार, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती जमीन मिळकत तिचे मालक श्री. लॅन्सी जेम्स नाझरत यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे क्र | प्लॉट क्र. | क्षेत्र ( चौ.मी) | आकार (रू. पै ) |
|---|---|---|---|
| १०३ | १ | ३४८ | ३४-८० |
| १०३ | ७ | ३६३ | ३६-३० |
| १०३ | ८ | २८० | २८-०० |
| १०३ | ९ | ५४६ | ५४-६० |
| १०३ | १० | ४०६ | ४०-६० |
| १०३ | १३ | ४७० | ४७-०० |
| १०३ | १५ | ५२८ | ५२-८० |
| १०३ | १६ | ५४४ | ५४-४० |
| १०३ | १७ | ५४४ | ५४-४० |
| १०३ | १८ | ३४७ | ३४-७० |
| १०३ | १९ | ३४३ | ३४-३० |
| १०३ | २० | ३५४ | ३५-४० |
| १०३ | २१ | ३८४ | ३८-४० |
| १०३ | २४ | ५२६ | ५२-६० |
| १०३ | २५ | ५५१ | ५५-१० |
| १०३ | २६ | ५३७ | ५३-७० |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हकहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक: १५/०८/२०२६

**ॲड संजय हरिश्चंद्र म्हसे**
ऑफीस- रा.बी -३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरल पश्चिम
ता. कर्जत, जि. रायगड.
मो. ९२६०२०९०९६

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे कोठींबे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक १) कुंदन दिनकर गरूडे व २) तेजस्विनी दिनकर गरूडे यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे क्र | हिस्सा क्र | क्षेत्र (हे. आर. पॉ) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|
| ९४ | १ | ०-१४-०० | ०-१० |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक १५/०८/२०२६

**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफीस-कशेळे, ता.कर्जत, जि.रायगड
मो. ८१४९९४१८५२

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे कवठेवाडी ता. कर्जत जिल्हा रायगड येथिल खालील वर्णनाची जमिन मिळकत आमचे आशील हुसेन अजीज कटलेरिवाला यांनी १) सुनील आप्पा खैरे २) मंगेश सुनील खैरे ३) ऊषा सुनील खैरे या विदयमान मालकाकडुन खरेदी घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नं हिस्सा नं | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| ३२/१/ब | १- २४-०० गुंठे पैकी लिहुण देणार यांच्या मालकीची ०-२०-०० गुंठे | ०-१५ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणाचाही विक्री, गहाण, भाडेपट्टा, बक्षीसपत्र, वारसहक्क, पोटगी, लीजचार्ज, ताबा, वहीवाट, अथवा कोणताही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास, सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचे कडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत नोंदवावी. सदर मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
१५/०८/२०२६
मो. नं ९२८४६७७५१६

आशीलातर्फे ॲडव्होकेट
**ॲड प्रफुल्ल विश्वनाथ देशमुख**
मु.पो कोंदीवडे ता कर्जत
जि. रायगड ४१०२०१

# निवडक

## महेश्वरी म्हात्रे जिल्ह्यात दहावी



**पेण :** रायगड जिल्हा परिषद शाळा नारवेल केंद्र वढाव येथील विद्यार्थिनी महेश्वरी म्हात्रे हिने इयत्ता चौथी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महेश्वरीने पेण तालुक्यात प्रथम क्रमांक, तर रायगड जिल्ह्यात दहावा क्रमांक मिळवत आपल्या शाळेचे तसेच पालकांचे नाव उज्ज्वल केले आहे. याशिवाय राज्यस्तरीय मंथन परीक्षेतही महेश्वरीने पेण तालुक्यात चौथा क्रमांक पटकावला आहे. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल नारवेल केंद्र शाळा वढाव तसेच पंचक्रोशीतील विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांकडून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. महेश्वरीच्या या यशाबद्दल तिचे पालक, शिक्षक आणि ग्रामस्थांनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन करून भविष्यातील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## एसटी स्टॅण्डमधील प्रसाधनगृह बंद



**रोहा :** रोहा एस.टी. स्टँडमधील प्रसाधनगृह (सार्वजनिक शौचालय व मुतारी) सेफ्टी टँक ओव्हरफ्लो झाल्याने अनेक दिवसांपासून बंद असल्याने येथील प्रवासी वर्ग, नागरिक, शाळकरी विद्यार्थी विद्यार्थिनींची गैरसोय होत आहे. विशेष म्हणजे सद्या उत्सवांचे दिवस सुरू असताना ही समस्या अधिक गंभीर बनली आहे. या विषयी शहरातील समाजसेवक बिलाल मोरबेकर यांनी आक्रमक भूमिका घेत संबधित प्रशासनाला लेखी निवेदन देत तातडीने प्रसाधनगृह तातडीने सुरू करण्याची मागणी केली आहे. एस. टी स्टँडमधील प्रसाधनगृह बंद असल्याबाबत प्रवाशी व नागरिकांनी एस.टी स्टँड येथील अधिकाऱ्यांकडे तक्रार केली. मात्र, या तक्रारीकडे संबधित अधिकाऱ्यांनी कानाडोळा केल्याने अखेर जनतेचा आवाज बनून समाजसेवक बिलाल मोर्बेकर यांनी आगार व्यवस्थापक प्रकाश शेलार यांना भेटून लेखी निवेदन देत शौचालय तातडीने सुरू करण्याची मागणी केली आहे. एस. टी स्टँडमधील प्रसाधनगृह बंद असल्याने प्रवाशी, नागरिकांची व दुरून येणाऱ्या शाळकरी मुला-मुलींची गैरसोय होत आहे. सार्वजनिक शौचालय हे सुविधा नसून नागरिकांची मूलभूत गरज आहे. नागरिकांनी तक्रार केल्यानंतरही दुरुस्ती होत नसेल तर शौचालय बांधलेच कशाला असा सवाल बिलाल मोरबेकर यांनी केला आहे.

## तीन बोकडांची चोरी

**नवीन पनवेल :** मोकळ्या प्लॉटमध्ये खुंट्याला बांधून ठेवलेल्या तीन बोकडांची चोरी केल्याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात ११ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. जकीरा शेख या तळोजा, फेस वन येथे राहत असून पाच ऑगस्ट रोजी त्यांनी मुस्कान कॉर्नर, तळोजा फेसवन येथील मोकळ्या प्लॉटमध्ये तीन बोकड खुंट्याला बांधून ठेवले होते. चोराने ते चोरून नेले. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

# कर्जत तालुक्याला क्रांतीचा इतिहास

**■ ४६ तरुणांचा लढ्यात सहभागी**
**■ दोन तरुण देशासाठी शहीद**

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्याला देशाच्या स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास आहे. कर्जत तालुक्यातील ४६ तरुण देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झाले होते आणि त्यातील दोन तरुण देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात शहीद देखील झाले आहेत. १९४२ मध्ये महात्मा गांधी यांनी पुकारलेल्या चले जाव आंदोलनापासून कर्जत तालुक्यात क्रांतीचा लढा माथेरानचे भाई कोतवाल यांच्या पुढाकाराने सुरू झाला होता.

देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात कर्जत तालुक्याचे योगदान मोठे आहे. कर्जत तालुक्याच्या लढाऊ बाण्याची नोंद ब्रिटिश सरकारला इंग्लंडमध्ये घ्यावी लागली होती. आपल्या देशात वेगवेगळी संस्थाने राज्य करीत असल्याने ब्रिटिशांनी आपल्यामधील भांडणाचा फायदा घेऊन ब्रिटिशांनी १८१८ मध्ये भारतावर राज्य करण्यास सुरुवात केली आणि शेवटी आपल्या देशातील देशप्रेमी जनतेने १९४२ मध्ये उठाव केला आणि १९४७ ला आपला भारत देश स्वातंत्र्य झाला अशी माहिती कोळंबे यांनी यावेळी दिली. त्यानंतर १९४२च्या चलेजाव आंदोलनाविषयी विद्यार्थी वर्गाशी संवाद साधताना माथेरान येथील भाऊसाहेब राऊत आणि विठ्ठलराव कोतवाल यांनी कर्जत तालुक्यातील तरुणांना एकत्र करून देशाच्या लढ्यात स्वतःला झोकून दिले. त्यावेळी गोमाजी पाटील, राघो भगत ही मंडळी सोबत आली आणि अख्ख्या कर्जत तालुक्यातून तब्बल ७० च्या आसपास क्रांतिकारक यांनी देशाच्या स्वातंत्र्याचा लढा कर्जत तालुक्यातून सुरु केला. या लढ्याने विजेचे खांब कोसळविणे, टेलिफोनच्या तारा तोंडाने, ट्रेन बंद करणे आदी क्रांतिकारी कामे करून ब्रिटिशांना सळो कि पळो करून सोडले होते. त्यामुळे तालुक्याचे योगदान देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात नोंद झाला आहे. त्यात ४६ स्वातंत्र्यसैनिकांची नोंद ब्रिटिशांनी आपल्या गॅझेटमध्ये केली आहे.







तालुक्याचा स्वातंत्र्य लढ्यातील सहभाग आणि त्यातून निर्माण झालेला इतिहास कोणीही विसरू शकत नाही आणि त्यामुळे हुतात्मा भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील हे तरुणाचे आदर्श बनले आहेत.

देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात गोमाजी पाटील आणि हिराजी पाटील असे पिता पुत्र लढले आणि हिराजी गोमाजी पाटील हा पुत्र देशासाठी शाहिद झाला असे उदाहरण देशाच्या इतिहासात नाही आणि त्यामुळे या दोन्ही हुतात्म्यांचा आदर्श तालुका घेत असून कोणत्याही मोठ्या कार्यक्रमात हुतात्मांना अभिवादन करूनच कार्यक्रम सुरू होत असतात. हुतात्मा भाई कोतवाल तसेच हिराजी पाटील यांचे बलिदान देशासाठी झाले असून कर्जत तालुक्याने देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात मोठा सहभाग दाखवला आहे. अनेक तरुण भाई कोतवाल यांच्या चळवळीत भूमिगत राहून मदत करीत राहिले तर काही तरुण लढ्यात थेट उतरले.

### ब्रिटिश गॅजेटमध्ये नोंद

गोमाजी पाटील, झिपरु गवळी, राघो भगत, धाऊ डुकरे, दगडू दळवी, हरि देशमुख, गणपत देशमुख, रघुनाथ देशमुख, काशिनाथ मसणे, परशुराम देशमुख, विठ्ठल देशमुख, तुकाराम कुंभार, दामू शेलार, भाऊ पाटील, लक्ष्या कातकरी, रामा कातकरी, धोंडू कातकरी, पांडू कातकरी, रूपा कातकरी, इका कातकरी, बाळ्या कातकरी, बाळू लोहार, पेंटण्णा कोतवाल, गोपाळराव शिंदे, सीताराम खांगटे, मणिराम चौधरी, धोंडीराम चौधरी, सखाराम कदम, धोंडू पवार, गोविंद शिंदे, बाबुराव शिंदे, हरीभाऊ भडसावळे, पांडुरंग जाधव, बाळकृष्ण जुन्नरकर, मालू पादीर, सर्वोत्तम महाले, रमाबाई महाले, चिमणा सोनवळे, शंकर म्हामुणकर, दत्तात्रय डोंबे, मनहर ठोसर, भालचंद्र क्षीरसागर, आदी स्वातंत्र्यसैनिक यांची नोंद ब्रिटिश गॅजेटमध्ये आहे.

## स्वरा पाटीलची अवकाश क्षेत्रातील भरारी

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

पीएनपी कनिष्ठ महाविद्यालयाची गुणवंत विद्यार्थीनी स्वरा अविनाश पाटील हिची भारतीय अंतराळ विज्ञान आणि तंत्रज्ञान संस्था (IIST), तिरुवनंतपुरम येथे बी. टेक. इन इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड कम्युनिकेशन इंजिनिअरिंग - एव्हिऑनिक्स (विमान व अंतराळ तंत्रज्ञानातील इलेक्ट्रॉनिक्स) या पुढील शिक्षणाकरिता निवड झाली आहे.



अवकाश संशोधन आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील देशातील नामांकित संस्थांपैकी एक असलेल्या IIST मध्ये उच्च शिक्षण घेण्याची संधी मिळाल्याने स्वराने आपल्या गुणवत्तेची आणि मेहनतीची यशस्वी छाप उमटवली आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीतही या यशाची अभिमानास्पद नोंद झाली आहे.

अवकाश तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात करिअर करण्याचे स्वप्न उराशी बाळगून अलिबागची स्वरा आता अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे शिक्षण घेणार असून, भविष्यात देशाच्या अवकाश संशोधन क्षेत्रात योगदान देण्याची तिची वाटचाल सुरू झाली आहे.स्वराच्या या उज्ज्वल यशाबद्दल पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य रवींद्र पाटील, संचालक विक्रांत वार्डे, उपप्राचार्य निशिकांत कोळसे तसेच प्राध्यापक व कर्मचारीवृंदाने तिचे अभिनंदन केले. तसेच तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी आणि अवकाश क्षेत्रातील उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. स्वराच्या या यशाने पीएनपी कनिष्ठ महाविद्यालयाची शैक्षणिक गुणवत्तेला नवी उंची मिळाली असून, तिची ही भरारी रायगडच्या शैक्षणिक क्षेत्रासाठी निश्चितच अभिमानाची बाब ठरली आहे.

## जेएसएममध्ये विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीचा संदेश

**| अलिबाग | प्रतिनिधी |**



जे.एस.एम. महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व रायगड पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने कॅम्पस कनेक्ट-ड्रग्स मुक्त रायगड या जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. युवकांमध्ये अमली पदार्थांच्या सेवनाचे दुष्परिणाम, व्यसनमुक्त जीवनाचे महत्त्व आणि व्यसनमुक्त समाजनिर्मितीबाबत जागरूकता निर्माण करणे हा कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

यावेळी जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. डॉ. गौतम पाटील यांनी शुभेच्छा संदेश देत व्यसनमुक्त समाजनिर्मितीत युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रमुख व्यख्याते पोलीस निरीक्षक प्रविण पांडे यांनी विद्यार्थ्यांना अमली पदार्थांचे सेवन, त्याचे शारीरिक व मानसिक दुष्परिणाम तसेच व्यसनामुळे निर्माण होणाऱ्या सामाजिक समस्यांबाबत मार्गदर्शन केले.

युवकांनी चुकीच्या संगतीपासून दूर राहून आपल्या उज्ज्वल भवितव्याला प्राधान्य द्यावे, असे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी अलिबाग पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रविण पांडे, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सोनाली पाटील, उपप्राचार्य व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रविण गायकवाड, प्रा. अश्विनी आठवले व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सोनाली पाटील यांनी केले, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रविण गायकवाड यांनी केले कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन डॉ. पंकज घरत यांनी केले.

## सलग सुट्ट्यांमुळे कळंबोलीत वाहतूक कोंडी

**■ सायन-पनवेल महामार्गावर वाहनांच्या रांगा**

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**



शनिवार, १५ ऑगस्टला स्वातंत्र्यदिनाची सुट्टी आणि त्यानंतर रविवार असल्याने सलग सुट्ट्यांचा आनंद घेण्यासाठी नागरिकांनी शुक्रवारीच घराबाहेर पडण्यास सुरुवात केली. यामुळे सायन-पनवेल महामार्गावर कळंबोली परिसरात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली. दुपारनंतर कळंबोलीतील विविध मार्गांवर वाहतूक संथ झाली.

महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले. मुंबई, नवी मुंबई, पनवेल आणि पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांची संख्या वाढल्याने वाहतुकीवर ताण आला. कळंबोली चौक परिसरात वाहनांची गर्दी अधिक जाणवत होती. सुट्टीच्या काळात पर्यटनस्थळी जाणाऱ्या वाहनांमुळे महामार्गावरील वाहतूक वाढण्याची शक्यता आहे.

शनिवार, रविवार या दोन्ही दिवशी नागरिक मोठ्या संख्येने बाहेर पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुढील दोन दिवस कळंबोली परिसरात वाहतूक कोंडीची समस्या आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे.

वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे काही ठिकाणी वाहनचालकांना संथ गतीने प्रवास करावा लागला. वाहतूक कोंडीमुळे काही प्रवाशांचा प्रवासाचा वेळही वाढला. सुट्टीच्या दिवशी मुंबई-पुणे तसेच कोकणाकडे जाणाऱ्या वाहनांची संख्या मोठी असते. त्यामुळे कळंबोली हा महत्त्वाचा वाहतूक केंद्रबिंदू असल्याने येथे विशेष नियोजनाची गरज आहे. सलग सुट्ट्यांच्या पार्श्वभूमीवर कळंबोलीतील वाहतुकीचे योग्य नियोजन करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

## भरण्यासाठी दिलेल्या पैशांचा अपहार

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी ||**

बँकेत भरणा करण्यासाठी दिलेली रक्कम बँकेत न भरता तिचा अपहार केल्याप्रकरणी लोकेश पवार (ओसवाल होम फायनान्स रिकव्हरी एजंट) याच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात ११ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. यातील फिर्यादी नारायण बाबा श्रीराम हे रोडपाली गाव, शिवशक्ती एंटरप्राइजेस, कळंबोली येथे राहत असून आरोपी लोकेश पवार हा मोतीलाल ओसवाल होम फायनान्स रिकव्हरी ऑफिसर म्हणून नोकरी करत असताना त्याने नारायण बाबा यांना विश्वासात घेतले आणि फिर्यादी यांच्या कर्जाची उर्वरित पाच लाख १२ हजार रुपये या रकमेची दोन लाख एक हजार रुपये एवढे रकमेमध्ये सेटलमेंट करून देतो असे सांगितले आणि नारायण बाबा यांच्याकडून तीन लाख ७१ हजार रुपये रक्कम घेऊन ते बँकेत भरणा करणे आवश्यक असताना बँकेत भरणा केली नाही आणि या रकमेचा स्वतःच्या फायद्यासाठी अपहर केला. या प्रकरणी कळंबोली पोलीस अधिक तपास करत आहेत.

## डेब्रिज पडल्याने महिला जखमी

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

इमारतीस बांधलेली जाळी तुटून त्यातील डेब्रिज महिलेच्या अंगावर पडले आणि तिच्या डोक्याला, खांद्याला आणि पायाला गंभीर दुखापती झाल्य. या प्रकरणी म्बेसी डेव्हलपमेंट अँड कन्स्ट्रक्शन कंपनी कोनगाव येथील संबंधित व्यक्ती विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात ११ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. यातील फिर्यादी विलास इलांदला त्यांची बहीण विनंती सुरेश सिंग ही म्बेसी डेव्हलपमेंट ॲण्ड कन्स्ट्रक्शन कंपनीच्या इमारतीच्या बांधकामाच्या ठिकाणी डेब्रीज उचलण्याचे काम करत होती. यावेळी इमारतीस बांधलेल्या सुरक्षा जाळीमध्ये पडलेले डेब्रिज हे कन्स्ट्रक्शन कंपनीकडून काढून घेणे गरजेचे होते. यावेळी इमारतीस बांधलेली जाळी तुटून त्यातील डेब्रिज विनंती सिंग हिच्या अंगावर पडल्याने तिला गंभीर दुखापती झाल्या.

**विद्यार्थी ये-जा करताना अडथळा** | **शाळेच्या ‘नो पार्किंग’ फलकालगतच वाहनांचे पार्किंग**

## श्रीवर्धन शहरात नियमांना केराची टोपली

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**



श्रीवर्धन शहरातील बाजारपेठेतील मुख्य रस्त्यावर वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवले जात असल्याचे चित्र दररोज पाहायला मिळत आहे. विशेषतः शाळेच्या लगतच किराणा माल घेऊन येणारे मालवाहू ट्रक ‘नो पार्किंग’ फलकालगतच चुकीच्या दिशेला उभे केले जात असल्याने शहरात वाहतूक कोंडी होत आहे.

शहरातील टिळक रस्त्यावर नगरपरिषद शाळा क्रमांक एक असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षीततेच्या दृष्टीने प्रशासनाने या परिसरात ‘पुढे शाळा आहे, वाहने सावकाश चालवा’ आणि ‘नो पार्किंग’असा फलक लावले आहेत. मात्र, या फलकाकडे दुर्लक्ष करून मालवाहतूक करणारे ट्रक आणि टेम्पो शाळेच्या लगत अरुंद रस्त्यावर चुकीच्या दिशेने उभे केले जात आहेत. अवैध पार्किंगमुळे रस्त्यावर अडथळा निर्माण होऊन वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होते. शाळा सुटण्याच्या किंवा भरण्याच्या वेळेत विद्यार्थी रस्त्यावरून ये-जा करीत असतात, या उभ्या वाहनांच्या बाजूने येणाऱ्या इतर वाहनांमुळे अपघाताची शक्यता वर्तवली जाते.

> “श्रीवर्धनमध्ये वाहतुकीची कोंडी रोखण्याकरिता नगरपालिका प्रशासन हे पोलीस प्रशासनाच्या सहकार्याने सकारात्मक पावले उचलीत आहे. त्या संदर्भात दोन्ही विभागाची बैठक होऊन ठोस निर्णय घेण्यात आलेला आहे. लवकरच शहरातील वाहतुकीची समस्या मार्गी लागेल.”
> -ॲड.अतुल चौगुले, नगराध्यक्ष

स्थानिक नागरिक आणि पालकांकडून तक्रारी होत असूनही परिस्थिती जैसे थे आहे. संबंधित व्यापारी आणि वाहन चालकांकडून नो पार्किंग फलकाचा अवमान होत आहे. पोलीस प्रशासनाने आणि नगरपालिकेने या गंभीर बाबीची दखल घेऊन, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करावी आणि शाळेसमोरील रस्ता रहदारीसाठी सुरक्षित करावा, अशी मागणी होत आहे.



# बिळात लपलेले सरकार

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात मोदी सरकारची पळता भुई थोडी झाली. एरवी टर्रेबाजी करणारे सरकारचे नेते यावेळी वीस दिवस गायब होते. वीस जुलैला जंतरमंतरवरून संसदेकडे विद्यार्थ्यांचा मोर्चा निघाला. त्यावर झालेल्या लाठीमाराने पुरा देश पेटला. नंतर या आंदोलकांवर छऱ्यांच्या बंदुकीने गोळ्या झाडल्याचे व त्यात दहा जण जखमी झाल्याचे सिध्द झाले. याचा जबाब विरोधकांनी सरकारकडे मागितला. पण तो देण्याची हिंमत नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्यामध्ये नव्हती. आपले चुकले आहे हे त्यांना ठाऊक होते. पण ते मान्य करण्याची, त्याबद्दल माफी मागण्याची हिंमतही त्यांच्यात नाही. त्यामुळे मग तोंड लपवत फिरण्याची वेळ आली. संसदेच्या शेवटच्या वीस दिवसांमध्ये हे दोघेही सभागृहात येऊ शकले नाहीत. कारण, काँग्रेस व इतर सर्व विरोधकांनी लाठीमार तसेच गोळीबाराचा मुद्दा लावून धरला होता. राहुल गांधी यांचे म्हणणे अगदी स्पष्ट होते. दिल्ली पोलिस हे थेट गृहमंत्री अमित शहा यांच्या अखत्यारीत येतात. लाठीमार व गोळीबाराचे आदेश कोणी व का दिले याचा खुलासा शहा यांनी करावा. ते जर त्यांनीच दिले असतील तर त्यांनी राजीनामा द्यावा. समजा हे त्यांच्या परस्पर अधिकाऱ्यांनी केले असेल व त्यांना गोळीबाराची कल्पनाच नसेल तर शहा या पदावर राहायला नालायक आहेत. त्यांना काढून टाकले जावे. मोदी यांनी माफी मागावी अशीही त्यांची मागणी होती. एरवी विश्वगुरु आणि चाणक्य म्हणून मिरवणारे मोदी आणि शहा या मागणीपायी सभागृहात पाऊल टाकू शकत नसतील तर तो विरोधकांचा मोठा विजय आहे. एरवी असा प्रकार काँग्रेसच्या काळात घडला असता तर तमाम मिडियाने संसदेत न येणाऱ्या मंत्र्यांबाबत काहूर उठवले असते व त्यांना राजीनामा द्यायला भाग पाडले असते. पण आजच्या टीव्ही वाहिन्या आणि राष्ट्रीय म्हणवली जाणारी अनेक वृत्तपत्रे सरकारला विकली गेली आहेत. त्यामुळे शहा यांनी राजीनामा द्यायलाच हवा असा दबाव निर्माण झाला नाही.

## केविलवाणे समर्थन

अनेक दिवस सभागृहात न आल्यानंतर अखेर अधिवेशन संपण्याच्या आदल्या दिवशी म्हणजे बुधवारी अमित शहा हे पीटीआय व एएनआय या दोन वृत्तसंस्थांशी बोलले. विरोधक संसदेत गोंधळ करीत असल्याने सभागृहात कशाला जायचे असा सवाल त्यांनी केला. एरवी ज्यांची तुलना आडून आडून वल्लभभाई पटेलांशी केली जाते त्या शहांचे हे उद्गार कीव करण्यासारखे आहेत. याच गृहस्थांनी प्रचंड गदारोळ असताना काश्मीरचे ३७० वे कलम हटवण्यासारखी किंवा अन्य अनेक धोरणे मांडली. कामकाज रेटून नेले. मणिपूरच्या प्रश्नावर विरोधकांनी चर्चेची मागणी केली असताना पंतप्रधान मोदी यांनी मणिपूरचा उल्लेखही न करता दीड तास भाषण केले होते. शेवटी विरोधकांनी सभात्याग केल्यावर ते मणिपूरकडे वळले होते. इतकी मुजोरी ज्यांनी दाखवली त्यांनी विरोधकांच्या गदारोळाचे कारण सांगून सभागृहात येऊ नये ही त्यांची हुशारी वगैरे नसून गुढघे टेकण्याचे केविलवाणे समर्थन आहे. विरोधकांनी गोंधळ केला त्याबद्दल काही लोक त्यांना बोल लावतील. सरकारने शेवटच्या दिवशी का होईना चर्चेची तयारी दर्शवली होती ती मान्य करायला हवी होती असे काहींना वाटेल. पण लोकसभेत भाजप आणि आघाडीचे बहुमत आहे. त्यामुळे भाजपच्या खासदारांना वाट्टेल ती टीका करणारी भाषणे करायची संधी त्यामुळे मिळाली असती. भाजपवाल्यांनी पंडित नेहरुंपासून ते झारखंडमधील आंदोलकांवर तेथील सरकारने केलेला लाठीमार यावरच भाषणबाजी केली असती. मिडियानेही त्यांनाच प्रसिध्दी दिली असती. दिल्लीतील लाठीमार व गोळीबार हा मागे पडला असता. जंतरमंतरवर गुन्हेगारी स्वरुपाचे लोक जमा झाले होते असा दावा दिल्ली पोलिसांनी केला होताच. लाठीमाराचे समर्थन करण्यासाठी अशा सबबी तयार केल्या जात होत्या व अजूनही आहेत. शहा यांनी आपल्या भाषणातही त्यावरच भर देऊन पॅलेट गनच्या वापराबाबत चौकशी करू वगैरे थातूरमातूर उत्तर दिले असते. शिवाय अशा स्थितीत एकदा गृहमंत्र्यांचे भाषण झाले की त्यांना प्रतिप्रश्न करण्याची संधी विरोधकांना मिळाली नसती. म्हणजे शहा यांचेच म्हणणे याबाबत अंतिम मानले गेले असते. ही सर्व फसवाफसवी विरोधकांनी नाकाम केली.

## लबाडी हाणून पाडली

दिल्लीतील लाठीमार किंवा गोळीबार याबाबत संसदेतच उत्तर द्यायला हवे असे नाही. केंद्र सरकार ते बाहेरही देऊ शकते. नव्हे ती मोदी व शहा यांची जबाबदारी आहे. दुसऱ्या कोणत्याही लोकशाहीमध्ये इतक्या दिवसांच्या काळात दिल्ली पोलिस, शहा यांची पत्रकार परिषद झाली असती. त्यात सरकारला उलटसुलट प्रश्न विचारले गेले असते. उत्तरे द्यायला भाग पाडले गेले असते. पण भारतात हे होत नाही. कारण आपण कसेही वागलो तरी आपल्याला सत्तेवरून कोणी खाली खेचू शकत नाही असा इथल्या सत्ताधीशांचा समज झाला आहे. राज्यसभेत बराच काळ गोंधळ चालू असल्याने अखेर सभापती राधाकृष्णन यांनाही राहवले नाही. त्यांनी शहा यांनी सभागृहात येऊन निवेदन करावे असे सरकारला सुचवले. पण मोदी सरकारने त्यांनाही जुमानले नाही. उलट अशी काही सूचना आलीच नाही असा खुलासा केला गेला. तृणमूल काँग्रेसमध्ये फूट पडलेली असल्याने आणि द्रमुक ही काँग्रेसपासून दुरावलेली असल्याने सध्या केंद्रातील विरोधकांची शक्ती कमी झालेली आहे. तरीही त्यांनी एकत्रितपणे लढाई केली व सरकारला वरचढ होण्याची संधी मिळू दिली नाही याबद्दल त्यांचे अभिनंदन करायला हवे. दिल्ली आंदोलनावर चर्चेच्या निमित्ताने समजा अमित शहा यांनी उत्तर दिले असतेच तर बहुदा काँग्रेसच्या काळातील आंदोलने व त्यावर झालेले लाठीमार, गोळीबार यांचा पाढा उगाळला गेला असता. तेव्हा कोणी व कसा राजीनामा दिला नव्हता हे सांगितले गेले असते. राहुल गांधी यांनी हे अचूक ओळखले व आम्हाला शहा यांची लेक्चरबाजी नको आहे, त्यांनी केवळ दिल्ली दंगलींबाबत बोलावे असे ठासून सांगितले. त्यामुळे मोदी सरकारवर डाव उलटला. गेल्या बारा वर्षात असे पहिल्यांदाच झाले असून ही नव्या बदलाची सुरुवात आहे. पावसाळी अधिवेशनामध्ये धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेण्यात अभिजीत दीपके व त्यांचे सहकारी यशस्वी झाले. त्यानंतर मोदी व शहा यांची कोंडी करण्यात विरोधकांना यश मिळाले. संसद न चालणे हे लोकशाहीसाठी चांगले लक्षण नसले तरी सध्याच्या काळात त्याचे स्वागत करावे लागते. याला सर्वस्वी मोदी सरकारची उद्दाम वागणूक जबाबदार आहे. संसद म्हणजे केवळ आपल्या प्रसिध्दीचे व पापे धुवून घेण्याचे आणखी एक साधन अशा रीतीने ते तिच्याकडे पाहतात. संसदेत बहुमत आहे म्हणजे आमच्या सर्व गुन्ह्यांनाही जनतेचा पाठिंबा आहे असे भासवायचे असते. पण ही लबाडी विरोधकांनी यावेळी यशस्वी होऊ दिली नाही. आता मोदी व शहा यांना बाहेरही विरोधक याच रीतीने पेचात पकडतील अशी अपेक्षा आहे.

**। विचार**

# स्वातंत्र्याचा उद्देश ; दडपशाही व मुक्तपण ?

***भारतीय स्वातंत्र्याचा उद्देश दडपशाही की मुक्तपण. आजचं स्वातंत्र्य पाहिलं तर असा मुक्तपणा दिसत नाही. केवळ दडपशाहीच दिसून येते. या काळात देशात दोन घटक आहेत. एक खालचा घटक की जो स्वतःला कमजोर समजतो. ज्यातून त्याचेवर रोजच अत्याचार होत असतांना दिसतात. तर दुसरा घटक आहे वरचा घटक की जो घटक आजच्या काळात खालच्या घटकांवर अत्याचार करीत असतात रोजच. मग विचार येतोय की भारतीय शहिदांनी याचसाठी स्वातंत्र्य मिळवित असतांना बलिदान दिलं की काय? स्वातंत्र्याचा उद्देश जर असा असेल तर याचसाठी विरांनी स्वातंत्र्य मिळविलं की काय? असा विचार प्रत्येकाला वारंवार येत असतो.***



**अंकुश शिंगाडे**

भारतीय स्वातंत्र्यानं काय दिलं व काय करायला हवं. आपल्याला काय करायला शिकवलं. भारतीय स्वातंत्र्यानं आपल्याला शिकवलं की स्वातंत्र्य मिळविणं ही काही सहज सोपी गोष्ट नव्हती. ते स्वातंत्र्य सहजासहजी मिळालं नाही. त्यासाठी शेकडो लोकांना प्राण गमवावे लागले. शेकडोंना काळ्या पाण्याच्या शिक्षा झाल्या आणि शेकडोंचे इंग्रजांनी हाल हाल केले. एवढंच नाही तर त्यांच्या राज्यात कोणाला काहीच म्हणायची ही परवानगी नव्हती. असे असतांना शेकडो हुतात्म्यांच्या रक्तातून भारतीय स्वातंत्र्य साकार झालं व ते आपल्याला मिळालं. त्यामुळं आपलं स्वातंत्र्य आपल्याला सांगतं की आपण असं हौतात्म्यातून मिळवलेलं स्वातंत्र्य टिकवून ठेवा. आमच्या हौतात्म्य पत्करलेल्या विरांची जाण नाही ठेवली तरी चालेल. देश अमन ठेवा. मग आम्हाला विसरलात तरी चालेल. देशांतर्गत गुन्हेगार बनू नका. गुन्हेगार कोणाला बनवू नका. असाच देश चालवा व अशाच कायद्याची अंमलबजावणी करा. हेच स्वातंत्र्याचं सांगणं.

स्वातंत्र्याबाबत विचार करतांना स्वातंत्र्यानं आपल्याला काय दिलं? याचाही विचार करणे गरजेचे आहे. भारतीय स्वातंत्र्यानं आपल्याला सुरक्षा प्रदान केली. विचारांचं स्वातंत्र्य दिलं. वागण्याचं स्वातंत्र्य दिलं. फिरण्याचं स्वातंत्र्य दिलं. खाण्याचं स्वातंत्र्य दिलं आणि कामाचंही स्वातंत्र्य दिलं. याचाच अर्थ असा की आजच्या कोणत्याच व्यक्तीला उष्ट्या पत्रावळी चाटाव्या लागत नाहीत. जे मनात येईल, ते जिनस खाता येतात. कुठंही खाता पिता येतं. कुठंही केव्हाही फिरायला जाता येतं. कोणतंही काम केव्हाही स्विकारता येतं, करताही येतं. तसाच वेगवेगळ्या प्रकारचा विचार करता येतो. अन् रात्री अपरात्री जरी फिरत असू. तरी सुरक्षा प्रदान केलेली आहे भारतीय स्वातंत्र्यानं. भारतीय स्वातंत्र्यानं केवळ एका विशिष्ट व्यक्तीवर्गालाच स्वातंत्र्य दिलं नाही तर पुर्णच महिलावर्ग, पुर्णच बालवर्ग, पुर्णच वृद्ध आणि पुर्णच व्यक्तीसमुदाय, या सर्वांनाच स्वातंत्र्य दिलं आहे. त्यासोबतच सर्वच प्रकारचे प्राणीमात्र, वृक्षवल्ली, साध्या किड्यामुंग्यांही, या सर्वांनाच स्वातंत्र्य प्रदान केलेलं आहे. साधी एक लहानशी मुंगीही कोणाच्या समोर मारता येत नाही. एवढी दुर्लभ गोष्टही भारतीय स्वातंत्र्यानं दिली आहे आपल्याला. शिवाय भारतीय स्वातंत्र्यानं आपल्याला धर्मनिरपेक्षता, जातनिरपेक्षता, पंतनिरपेक्षता, भेदभाव निरपेक्षता, पक्षनिरपेक्षता या सर्वच गोष्टी दिल्या. आता कोणी म्हणतील की ह्या सर्व गोष्टी प्रजासत्ताकानं दिल्या अर्थात संविधानात अंतर्भूत आहेत. परंतु त्यांनी हे लक्षात ठेवायला हवं की स्वातंत्र्यच नसतं तर स्वतंत्र संविधान कुठून आलं असतं? त्यामुळंच अर्थातच या सर्व गोष्टी स्वातंत्र्यानं दिलेल्या आहेत. अन् महत्वाचं तत्व दिलं आहे सुरक्षा. ज्यातून कुणावर अन्याय झाल्यास न्यायालयातून दाद मागता येतं.

स्वातंत्र्यानं सुरक्षा प्रदान केलेली आहे. ती सुरक्षा सर्वांनाच प्रदान केलेली आहे. याचा अर्थ बालक अगदी गर्भात असलेलाही. त्यालाही मारता येत नाही. अर्थात भ्रुणहत्या गुन्हाच आहे. स्त्रियांनाही सुरक्षा प्रदान केलेली आहे. कोणत्याही स्त्रीची अब्रू लुटता येत नाही. तिला अपशब्द म्हणता येत नाही. तसाच कोणत्याही व्यक्तीच्या स्वातंत्र्याचं आपल्याला हनन करता येत नाही. ना इथे गरीब, श्रीमंतीचा भेदभाव चालत ना जात व धर्मावरुन भेदभाव चालत. इथे ना शेतकऱ्यांना डिवचता येत, ना बेरोजगारांना काही म्हणता येत. कारण स्वातंत्र्य आहे व स्वातंत्र्यानं आपल्या तेवढी व तशा प्रकारची सुट दिलेली आहे. याचाच अर्थ असा की स्वातंत्र्य हा आपला बाप आहे आणि प्रजासत्ताक ही आपली आई आहे. असे असतांना या दोघांची लेकरं म्हणजे येथील प्रजा. येथील प्रजेला आज त्या बापाबद्दल आणि आईबद्दल आदरच नाही असं दिसतंय. आजची ही प्रजा भरदिवसा कुणाचेही कोणत्याही शुल्लक कारणावरुन मुडदे पाडते. आजची प्रजा, त्या देशातील बहिणीसारख्या कन्येवर लहानपणापासूनच कुनजर टाकते आणि आपल्या हव्यासाची शिकार करते. आजची प्रजा म्हाताऱ्या लोकांनाही वृद्धाश्रमात टाकते व त्याच्या मयतीला न जाता फक्त व्हिडीओवर अंत्यसंस्कार बघते. अन् आजची प्रजा शेतकरी, कामगार वर्गालाही आत्महत्या करायला भाग पाडते. याचं कारण आहे येथील शकुनी मामाची आपल्या कौरवरुपी भाच्यांना अर्थात येथील प्रजेला असलेली शिकवण. आमच्या प्रजासत्ताक व स्वातंत्र्य या आईवडीलांचे दोन सख्खे भाऊ आहेत. एक म्हणजे ज्यांना नेता संबोधलं जातं तो व दुसरा भाऊ आहे न्यायालय. हे दोनही भाऊ येथील प्रजेला गुन्हे करण्यापासून रोखत नाहीत. ते हवा देतात. याचाच अर्थ असा की आज सत्तेवर जी मंडळी बसलेली आहेत. ते सर्वचजण, कोणत्या ना कोणत्या गुन्ह्यानं लिप्त आहेत. तसंच न्यायालय. न्यायालयात जाणाऱ्या प्रत्येक खटल्यामध्ये पार्श्वभुमी जरी सत्य स्वरुपाची असली तरी आरोपींनाही आपली बाजू मांडण्याची सोय असल्यानं आरोपी बाइज्जत बरी होतात. त्यानंतर ते इतर सर्वच प्रकारचे गुन्हे करायला मोकळे होत असतात. ज्यातून आणखी बरेच गुन्हे घडत असतात नव्हे तर गुन्हे केले जातात. भारतीय स्वातंत्र्य व प्रजासत्ताक हे कोणत्याच व्यक्तीला गुन्ह्यांकडे वळवित नाहीत. कारण कोणत्याच आईवडीलांना आपली मुलं ही वाईट निघालेली चालत नाही. परंतु मामांना आपल्या बहिणींची मुलं ही वाईटच निघायला हवी असं वाटतंय. कारण हा कलियुगाचा काळ आहे. ज्यातून आजचे कौरव कोणत्याही स्त्रीवर बलात्कार करीत सुटलेय. ते येथील सर्व द्रौपदींच्या इज्जती लुटायला पाहतात. अन् येथील पांडव अर्थात पोलीसयंत्रणा तेवढी सक्षम नाही. ती फक्त गुन्हे घडायची वाट पाहात असते. लाचार असल्याचा दिखावा करून. खरं तर ते लाचार नाहीत. दुसरा मुद्दा आहे, आपल्याला एक खटला मिळावा. जसे पांडव द्युतातून हरल्यानंतर दुर्योधनाच्या कृत्याकडं फक्त पाहू शकत होते. काहीच करु वा बोलू शकत नव्हते. त्यातच येथील क्रिष्ण नावाचा विधाताही सक्षम नाही की जो येथील अब्रू लुटली जाणाऱ्या द्रौपदीला साडी पुरवेल? मात्र तो पदोपदी सांगतो की आपली सुरक्षा आपणच करावी. परंतु करणार कशी? कारण आजच्या काळात अब्रू लुटली जाणारी द्रौपदी एकच असते आणि तिच्या सभोवताली तिची अब्रू लुटणारे कौरव शंभर. कशी सुटणार ती या समशंभर कौरवांच्या तावडीतून.

भारतीय स्वातंत्र्य... भारतीय स्वातंत्र्यानं काय दिलं? याचा विचार करीत असतांना स्वातंत्र्य दिलं. हे उत्तर असेल. असं स्वातंत्र्य की कुणालाही सहज आणि चांगल्या पद्धतीनं जीवन जगता येतं. परंतु ना या काळात येथील महिला सुरक्षित वाटत. ना कोणता कामगार. ना येथील शेतकरी सुरक्षित वाटत, ना येथील लहान लहान बालकं. कोणाला केव्हाही धोका होत असतो आज. त्यातच आजचं आणखी एक चित्र म्हणजे येथील लोकांवर रोजच होत असलेला अत्याचार. रोजच वर्तमानपत्रातून बातम्या छापून येतात. अमूक अमूक ठिकाणी असं असं घडलंय. परंतु त्याचे खटले न्यायालयात गेल्यास ते टिकत नाहीत. शिवाय तारीखवर तारीख सतत चालत असते. ज्यातून आरोपीला गंमत वाटते आणि पक्षकाराची हिंमत खचते. मग आम जनता विचार करते की आपल्याला ना न्यायालयातून न्याय मिळत ना पोलीस स्टेशनमधून. त्यापेक्षा आपण कोणी आपल्या वाट्याला जरी गेला तरी चूप बसलेलं बरं. अन् सहन होत नसेल हा अन्याय तर आत्महत्या करुन मरुन गेलेलं बरं. हेच आजच्या भारतात घडत असलेलं चित्र आहे. खरंच याचं स्वातंत्र्य व प्रजासत्ताक सारख्या आईवडीलांना दुःख होत नसेल काय? त्यांच्या भावना काय म्हणत असतील? यासाठीच भारतातील ते शहीद लढले काय इंग्रजांशी. या सर्व बाबी विचार करणाऱ्या आहेत. महत्वपुर्ण बाब ही की भारतीय स्वातंत्र्य मिळविण्यापुर्वी जे शहीद झाले. त्यांना अतिशय त्रास झाला. हे विसरु नये आपण. तसंच हेही विसरु नये की स्वातंत्र्य मिळवीत असतांना त्यात पुरुषच नाही तर बालकांचाही बळी गेला. ज्या लोकांनी आमचं बलिदान झालं तरी चालेल. परंतु आपण काय करतो आज. आपण आज ते बलिदान विसरुन येथील द्रौपदींच्या इज्जती लुटतो. हे काही बरोबर नाही. ज्यात बलिदान देतांना महिलांचंही योगदान होतंच. विशेष म्हणजे आपल्याला मिळालेलं स्वातंत्र्य हे काही सहज सरळ पद्धतीनं मिळालेलं नाही. त्यासाठी बरंच काही करावं लागलं. हे विसरता येत नाही व विसरता कामा नये. तेव्हा हीच बाब लक्षात घेवून स्वातंत्र्य फक्त उत्सवापुरतं साजरं करु नये तर देशातील त्या तमाम नागरिकांना सुरक्षा मिळावी. असा स्वातंत्र्याचा हेतू असावा व तो हेतू साध्य करण्यासाठी देशातील सर्वच नागरिकांनी प्रयत्न करावे व तसं वागावं. तशाच पद्धतीनं वागावं, म्हणजे स्वातंत्र्याचा खरा उद्देश यशस्वी होईल. यात शंका नाही.

# स्वातंत्र्यानंतरही स्वतंत्रतेची गोष्ट

**बी.के.भारती दीदी**

भारताच्या बहुतेक सर्व नागरिकांना हे माहितच आहे की १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत मुक्त झाला. इंग्रज भारतातून वापस गेले आणि २६ जानेवारी १९५० रोजी भारत गणतंत्र राष्ट्राच्या नावाने संपूर्ण संविधान बनले. संविधानाची नियम प्रणाली याप्रकारे बनवली गेली की जेणेकरून भारताच्या सर्व नागरिकांनी सुख-शांती व आनंदपूर्वक जीवन जगावे. इथे स्वाधीनता याचा अर्थ असा आहे की कोणत्याही प्रकारची अधिनता किंवा बंधन नसावे. अर्थात स्वतःच्या स्थितीमध्ये मालकपणाची जाणीव असावी. सर्व प्रकारांनी स्वतंत्र असावी. अधीनतेने भय, चिंता, दुःख, अशांती निर्माण होते. आज भारताला स्वाधीन होऊन साठ वर्षे झाली आहेत. बाह्यरूपाने प्रगती वाढत गेली. आज महिला असो वा पुरूष ज्या वर्गात किंवा ज्या क्षेत्रात हवी त्या ठिकाणी हवी तेवढी प्रगती करू शकतात.

म्हटले जाते की पराधीन व्यक्ती कधीही सुखी होऊ शकत नाही. पण आज स्वाधीनता मिळूनही स्वाधीनतेचे जे खरे स्वरूप सदा सुख, शांती व आनंदमय जीवन यात कमी का आहे? अर्थात आजही दुःख, अशांती, चिंता, भय वगैरे घराघरातून समाप्ती का झाली नाही? आज प्रत्येकाचे मन काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार, स्वार्थ, हिंसा इ. विकारांनी घेतलेले आहे. राज्य प्रशासनामध्ये विकृती अर्थात स्वतंत्रतेच्या बळाने एक दुसऱ्याला सीट वरून उतरवून बसण्याच्या स्पर्धेत आहे. ऑफिस तसेच कोर्टामध्ये लाच घेण्याशिवाय काम होत नाही. कारभारामध्ये भेसळ, धोका, फसवणूक संबंधांमध्ये आपसात टकराव अर्थात एकमेकांचे संस्कार व आवडीनिवडी मध्ये भिन्नता असल्याने ताणतणाव. टी.व्ही. मोबाईल इ. साधनांच्या आकर्षणामुळे मुले सुद्धा प्रभावित होऊन अभ्यासात नाइलाजाचा अनुभव करत आहेत. हास्यास्पद गोष्ट आहे की आज अधिकांश लोक व्यसनाच्या आधीन आहेत. त्यामुळे बहुतेक लोकांकडून हेच ऐकायला मिळते की व्यसन तर सोडायची इच्छा आहे पण सोडू शकत नाही. असेही जी कुठली वस्तू किंवा पदार्थ बऱ्याच काळापर्यंत आपण वापरात आणतो त्याला आवश्यक समजून आपण त्याच्या अधीन होऊन जातो. प्राकृतिक दुर्घटना, आतंकवाद अशा गोष्टींपासून सर्व भयभीत आहेत. अनेक प्रकारचे दुःख व बंधनांपासून मुक्त होण्यासाठी सर्वांच्या मनात एकच आवाज आहे की शेवटी या सर्वांपासून मुक्ती कशी मिळेल?

आपल्याला माहित असावे की या पंचतत्वाद्वारे बनलेल्या या भौतिक शरीराला चालवणारी चैतन्यशाली जी आत्मा आहे तीच वास्तविक मुक्ती वा स्वतंत्रतेची इच्छा करते. आत्मा आपल्या स्वरूपाला विसरल्याने या दैहिक बंधनात बांधली जाऊन स्वतःच अधीनतेचे जाळे बनवून आपल्या जीवनाला कंटाळली आहे. सर्वात मोठे व कठीण बंधन आपल्याच देहाचे आहे. जे राजयोगाचे अभ्यासक आहे त्यांना याचा अनुभव आहे की हे शरीर पाच तत्वांचे जड आहे, शरीर अलग आहे. या शरीराच्या द्वारे कार्य करणारी मी एक चैतन्यशक्ती आत्मा आहे हे माहित असूनही आपल्याला देहापासून भिन्न आत्मिक स्वरूपात राहण्यासाठी खूप मेहनत करावी लागते.

आत्मिक विस्मृती होताच देहाच्या भानात येतात व त्याला हे ज्ञान नाही की मी देहापासून भिन्न एक आत्मा आहे तो तर देहापासून भिन्न असल्याचा विचारही करू शकत नाही. फक्त दुःखात ईश्वराला पुकारत राहतात की बस आम्हाला या दुःखातून सोडव. कोणी तर दुःख असह्य होऊन जीवाचा घात करतात. समजतात की या शरीराला संपवले तर दुःख संपून जाईल. आत्मा जशी काही या शरीररूपी पिंजऱ्यात फसलेली आहे.

सर्व मनुष्य आत्म्यांची पुकार ऐकून परमपिता शिव परमात्मा गीतेच्या वचन अनुसार ब्रह्मांच्या शरीरात अवतरीत होऊन मुक्ती आणि जीवनमुक्तीचा मार्ग दाखवत आहेत. परमात्मा शिव हेच सांगतात की मी व माझं हेच दुःख किंवा बंधनात आणणारे आहे. यामुळेच सर्व मनोविकार उत्पन्न होतात. उदा. जेव्हा आपण ऐकतो की एका बस ॲक्सिडेंट मध्ये ५० लोक मेले तेव्हा ऐकून आपल्याला तेवढ दुःख होत नाही. पण जर हे ऐकू की त्यामध्ये ५० मध्ये माझा कोणी नातेवाईक मेला तर जसे दुःखाचे पहाडच पडल्यासारखे वाटेल. याप्रकारे मी व माझे हेच सर्व दुःखांचे मूळ कारण आहे. माझंतुझं, स्वार्थ, नफा-नुकसान या विचारांमुळे इच्छेविरूद्ध काही झालं की दुःखाची जाणीव होते.

गीता उपदेशात अर्जुनाला हेच सांगितले होते की हे अर्जुन हे नाशवंत शरीर व शरीराच्या नात्यांना माझे समजून व्यर्थ का दुःखी होतो आहेस? तुला या सृष्टीत ना कोणी निर्माण केले. ना कोणी तुला मारू शकते. जे काही आज तुझ्याजवळ आहे ते उद्या दुसऱ्या कोणाच होईल. तू यात भटकू नकोस, फक्त माझी आठवण कर तू मुक्त होशील. शिव परमात्मा आपल्याला हीच शिकवण परत पक्की करत आहेत की मी व माझ्या शब्दाला परिवर्तन करा की मी परमात्म्याची संतान आहे, परमात्मा माझा पिता आहे व सर्व मनुष्यआत्मे एकाच परमात्म्याची संतान असल्याने आपसात आत्मा भाऊ-भाऊ आहोत. जर हे लक्षात आले तर आपल्यातून काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार हे आसुरी मनोविकार समाप्त होतील. सर्वांच्या प्रती अगाध प्रेम, शुभभावना, सहयोगाची भावना राहील. परमात्म्याशी खरा संबंध जोडल्याने त्यांची शिकवणही सहज अंमलात आणता येईल. जे झालं चांगलं झालं, जे होत आहे ते चांगलंच आहे व जे होईल तेही अजून चांगलं होईल. दृष्टीमध्ये ही समानता आल्यावर खऱ्या अर्थाने आपणास स्वतंत्रतेचा अनुभव होईल.

**लोकसंसद**

## या स्वातंत्र्य दिनी भारतीयत्वाची भावना अधिक दृढ करूया!

यंदा आपल्या देशाच्या स्वातंत्र्याला ७९ वर्षे पूर्ण झाली असून आपण ८० वा स्वातंत्र्यदिन साजरा करत आहोत. सुमारे दीडशे वर्ष ब्रिटीशांच्या गुलामगिरीच्या जोखडात असलेला आपला भारत देश १९४७ साली १५ ऑगस्टला स्वतंत्र झाल्यानंतर गेल्या ७९ वर्षात भारताने सामाजिक, आर्थिक आणि तांत्रिक क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. डिजिटल क्रांती, अंतराळ संशोधन, औद्योगिक विकास इत्यादी क्षेत्रात यशस्वी झेप घेतली आहे. भारतीय राज्य घटनेने दिलेल्या न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या सार्वकालीन लोकशाही मूल्यांमुळे भारताची एकता, सांस्कृतिक विविधता आणि अखंडता टिकून राहण्यासाठी बळ मिळाले आहे. यंदाच्या स्वातंत्र्य दिनाची थीम 'युवा शक्ती फॉर विकसित भारत ॲट २०४७' अशी असून देशाच्या प्रगतीत, विज्ञानात, नवनिर्मितीत आणि आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीत युवकांचे महत्त्व अधोरेखित करणे हा यामागचा उद्देश आहे. तसेच राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम' ला १५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल ते प्रथमच लाल किल्ल्यावर गायले जाणार आहे. स्वातंत्र्य दिन हा भारतीयांच्या गौरवाचा आणि राष्ट्रीय एकतेचा उत्सव आहे. या पवित्र दिवशी स्वातंत्र्यासाठी सर्वस्व आणि प्राण अर्पण केलेल्या सर्व स्वातंत्र्यसैनिकांचे स्मरण करूया आणि देशाच्या प्रगतीसाठी, उज्ज्वल भविष्यासाठी जात, धर्म, पंथ, भाषा आणि प्रांतीय भेद या सर्वांच्या पलिकडे जाऊन आपण सर्वजण अंतर्मनी भारतीयत्वाची भावना अधिकाधिक दृढ करूया! जय हिंद!

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

**। दिनविशेष**

# स्वातंत्र्याच्या प्रगतीसोबत राष्ट्रनिर्मितीचेही आत्मपरीक्षण



आज भारत आपल्या स्वातंत्र्याचा ८० वा स्वातंत्र्य दिन साजरा करीत आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताने ब्रिटिशांच्या दीर्घ गुलामगिरीतून मुक्त होऊन स्वातंत्र्याची नवी पहाट अनुभवली. या स्वातंत्र्यामागे असंख्य ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांचे त्याग, बलिदान, संघर्ष आणि देशप्रेम आहे. त्यामुळे स्वातंत्र्य दिन हा केवळ उत्सवाचा दिवस नसून त्या बलिदानाचे स्मरण करून राष्ट्रनिर्मितीच्या आपल्या जबाबदारीचे आत्मपरीक्षण करण्याचा दिवस आहे.

व्यापारी म्हणून भारतात आलेल्या ब्रिटिशांनी हळूहळू आपली सत्ता प्रस्थापित केली. दीर्घकाळ भारतीय जनतेवर अन्याय, शोषण आणि दडपशाही झाली. १८५७ चा उठाव असो किंवा त्यानंतरची स्वातंत्र्य चळवळ असो, भारतीयांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध सातत्याने संघर्ष केला. भगतसिंग, चंद्रशेखर आझाद, नेताजी सुभाषचंद्र बोस, महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर आणि असंख्य ज्ञात-अज्ञात क्रांतिकारकांच्या योगदानामुळे स्वातंत्र्याचा मार्ग प्रशस्त झाला. अनेकांनी तुरुंगवास भोगला, अनेकांनी सर्वस्वाचा त्याग केला. त्यांच्या बलिदानामुळेच आज आपण स्वतंत्र भारतात श्वास घेत आहोत. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला आणि त्यानंतर राष्ट्रनिर्मितीची खरी परीक्षा सुरू झाली. २६ जानेवारी १९५० रोजी संविधान लागू होऊन भारत प्रजासत्ताक बनला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान सभेतील सर्व सदस्यांनी भारताच्या लोकशाहीचा मजबूत पाया घातला. विविध भाषा, धर्म, जाती, पंथ आणि संस्कृती असलेल्या कोट्यवधी नागरिकांना संविधानाने समान नागरिकत्वाच्या सूत्रात बांधले. हीच भारताची सर्वात मोठी ताकद आहे.

गेल्या ७९ वर्षांत भारताने विज्ञान, तंत्रज्ञान, अंतराळ संशोधन, कृषी, उद्योग, शिक्षण, क्रीडा, संरक्षण आणि अर्थव्यवस्था अशा विविध क्षेत्रांत मोठी प्रगती केली आहे. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर पोहोचणाऱ्या देशांमध्ये भारताचा समावेश झाला आहे. जगातील प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये भारताचे स्थान निर्माण झाले आहे. आज भारत आत्मविश्वासाने जागतिक पटलावर आपली भूमिका मांडत आहे. मात्र प्रगतीचा वेग वाढला म्हणून आपली जबाबदारी संपत नाही. गरीबी, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या समस्या, शिक्षणातील विषमता, भ्रष्टाचार, सामाजिक भेदभाव, पर्यावरणाचा ऱ्हास आणि वाढती सामाजिक असहिष्णुता यांसारख्या प्रश्नांवर अजूनही गांभीर्याने काम करण्याची गरज आहे. स्वातंत्र्याचा खरा अर्थ प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याची संधी मिळणे हा आहे.

भारताला जागतिक महासत्ता बनवायचे असेल तर केवळ आर्थिक विकास पुरेसा नाही. सक्षम शिक्षणव्यवस्था, रोजगारनिर्मिती, वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक समता, पारदर्शक प्रशासन आणि संविधानिक मूल्यांवरील निष्ठा आवश्यक आहे. देशाच्या प्रगतीत प्रत्येक नागरिकाचा सहभाग महत्त्वाचा आहे. स्वातंत्र्याच्या ८० व्या वर्षात प्रवेश करताना आपण भूतकाळाचा अभिमान बाळगूया, वर्तमानातील आव्हानांना सामोरे जाऊया आणि विकसित, सक्षम, समतामूलक व आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीचा संकल्प करूया. स्वातंत्र्य हा अधिकार आहे; पण राष्ट्रनिर्मिती ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. सर्व देशवासीयांना ८० व्या स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**- श्याम ठाणेदार**

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१५ ऑगस्ट

१) श्री. श्रीरंग पांडुरंग घरत अलिबाग, १५-८-१९४३
२) श्री. धनंजय नारायण कवळे वरसोली, अलिबाग, १५-८-१९४८
३) श्रीम. प्रमोदिनी प्रतापराव सरनाईक पिंपळभाट, अलिबाग, १५-८-१९४७
४) श्री. शरद किसन कोरडे अलिबाग, १५-८-१९५१
५) श्री. विजयकुमार दत्तात्रेय पाटील अलिबाग, १५-८-१९५१
६) श्री. विजय पांडुरंग पाटील नवगाव, अलिबाग, १५-८-१९४७
७) श्रीम. शितल शरदचंद्र पाटील कुरूळ, अलिबाग, १५-८-१९५७
८) श्री. प्रभाकर कमलाकर पाटील शहापूर, १५-८-१९६१

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

**आजचे अन्नदाते**



कै. श्री. गुळेकर गुरुजी, सारळ, अलिबाग

लायन्स क्लब ऑफ, अलिबाग



## स्वयंपाकघर, पाणपोईचे उद्घाटन

**तळा :** रायगड जिल्हा परिषदेच्या तळा मराठी शाळेमध्ये भोजन कक्ष, स्वयंपाकघर, व पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले. तळा मराठी शाळेसाठी रायगड भूषण कृष्णा महाडिक यांच्या प्रयत्नाने व चंदुलाल सुखलाल मेहता ट्रस्ट मुंबई यांच्या सहकार्याने भोजन कक्ष, स्वयंपाकघर व पाणपोई बांधण्यात आली. त्याचे उद्घाटन मुंबईतील उद्योजक कमलेश मेहता यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते व रायगड भूषण कृष्णा महाडिक, शाळेच्या मुख्याध्यापिका सुप्रिया जामकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष भास्कर गोळे यांसह सर्व शिक्षक वर्ग व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विजयी विश्व तिरंगा प्यारा...

**मित्रहो, १५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला स्वातंत्र्य मिळालं अन्‌ १५0 वर्षांच्या गुलामगिरीतून भारत मुक्त झाला. हा दिवस भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरात लिहिला गेला. हा खऱ्या अर्थानं आपला राष्ट्रीय सण असून, समस्त भारतीय हा दिवस मोठ्या आनंदात व उत्साहात साजरा करत आहेत. भारतासाठी एका नवीन युगाचा प्रारंभ झाला, असे म्हणणे संयुक्तिक ठरेल.त्यामुळे ब्रिटिश राजवट भारतातून कायमची हद्दपार झाली. पारतंत्र्याचा काळोख नाहीसा होऊन, भारत मातेच्या उदरातून स्वराज्याचा उष:काल उदयास आला. परमपूज्य भारत मातेला त्रिवार वंदन...!**

**रणवीर राजपूत**



स्वातंत्र्य लढ्याचा सखोल अभ्यास केल्यास स्वातंत्र्यप्राप्तीसाठी शेकडो क्रांतिवीरांनी बलिदान दिलं. त्यामुळेच आज आपण स्वातंत्र्याचा मोकळा श्वास घेत आहोत. स्वातंत्र्याची फळे चाखत आहोत. खरं तर, ही क्रांतिकारकांची पुण्याईच म्हणावी. या शूर क्रांतिवीरांच्या गोड स्मृती आम्हा भारतीयांच्या हृदयात चिरकाल तेवत राहतीलच, ही काळ्या दगडावरची रेघ आहे. खरं तर, १५ ऑगस्ट हा क्रांतिकारकांच्या आठवणींना उजाळा देणारा दिवस आहे. चला तर, आपण सर्वजण एकसुराने बोलूया... जय हिंद, जय हिंद, जय हिंद!

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली कस्तुरबा गांधी, मादाम कामा, मोतीलाल नेहरू, डॉ. राजेंद्र प्रसाद, विजयालक्ष्मी पंडित, गोपाळ कृष्ण गोखले, जवाहरलाल नेहरू, कमला नेहरू, इंदिरा गांधी, लालबहादुर शास्त्री, सरोजिनी नायडू, साने गुरुजी, वल्लभभाई पटेल, जयप्रकाश नारायण, विनोबा भावे, अरुणा आसफअली, यशवंतराव चव्हाण, बाबू गेणू, ठाण्याचे दत्ताजी ताम्हणे, नंदुरबारचे बाल क्रांतिकारक शिरीषकुमार मेहता, पश्चिम खान्देशचे दादासाहेब रावल, दादुसिंग राजपूत, धनाजी नाना चौधरी, त्यांच्या पत्नी सरस्वतीबाई चौधरी आदी असंख्य स्वातंत्र्यसेनानींनी अहिंसा व सत्याग्रहाच्या मार्गाने लढा देऊन ब्रिटिशांना 'भारत छोडो' हा निर्वाणीचा इशारा दिला. त्याची परिणिती म्हणजे देशाला स्वातंत्र्य मिळून ब्रिटिश राजवट संपुष्टात आली. या सर्व थोर स्वातंत्र्यसेनानींना आम्हा भारतीयांचा त्रिवार मानाचा मुजरा!

फिरंग्यांना जशास तसे उत्तर देण्यासाठी दुसऱ्या बाजूने जहालवादी विचारसरणीचे क्रांतिवीर लोकमान्य टिळक, क्रांतिकारक भगतसिंग, सुखदेव, राजगुरू, चंद्रशेखर आझाद, सुभाषचंद्र बोस, बटुकेश्वर दत्त, लाला लजपतराय, वासुदेव बळवंत फडके, स्वातंत्र्यवीर सावरकर, क्रांतिवीर नाना पाटील, सेनापती बापट, बिरसा मुंडा, मदनलाल धिंग्रा, चाफेकर बंधू, अनंत कान्हेरे, उमाजी नाईक, ठाण्याचे मारुतीराव ठाणेकर आदी जहाल क्रांतिकारकांनी गोळीला गोळीने उत्तर देत फिरंग्यांना जेरीस आणलं. सरतेशेवटी इंग्रजांना भारत सोडून जावं लागलं. या लढ्यात काहींना वीरमरण आलं, तर काहींनी स्वातंत्र्यासाठी मोलाचं योगदान दिलं.अशाप्रकारे भगतसिंग व अन्य क्रांतिकारकांची जहालवादी विचारसरणी तर, गांधीजींची अहिंसा व सत्याग्रह चळवळ अशा या दोन्ही देशभक्त गटांच्या संयुक्त प्रयत्नांतून भारत देशाला अखेर १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळालं. या सर्व महान क्रांतिकारकांना आम्हा मराठी भूमिपुत्रांचा त्रिवार मानाचा मुजरा!

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'हर घर तिरंगा अभियान' देशभर राबविण्यात येत आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश म्हणजे देशाची एकात्मता, अखंडता व सार्वभौमत्व अबाधित ठेवणे, देशाप्रती राष्ट्रप्रेम व देशाभिमान वृद्धिंगत करणे आणि तिरंगा झेंड्याचे पावित्र्य व महत्त्व भारतीयांच्या मनात खोलवर रुजविणे हा आहे. महाराष्ट्रातही हा अभियान युद्धपातळीवर राबविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीही नागरिकांना, विद्यार्थ्यांना आजच्या दिनी 'घरोघरी तिरंगा' फडकवावा, असं आवाहन केलं आहे. कारण तिरंगा ही भारत देशाची आन-बान-शान आहे. क्रांतिकारकांच्या बलिदानाने मिळालेलं हे स्वातंत्र्य अधिक मजबूत करण्यासाठी देशातील युवकांनी पुढाकार घेऊन भारताला जगात सर्व क्षेत्रांमध्ये आघाडीवर आणण्यासाठी कटिबद्ध व्हावे, म्हणजे स्वातंत्र्य दिन साजरा करणं खऱ्या अर्थानं सार्थक होईल. भारतीय स्वातंत्र्य चिरायू होवो!

भारत माता की जय! वंदे मातरम्‌!

# एनसीएमसी स्मार्ट कार्डला उत्स्फूर्त प्रतिसाद

## राज्यात एक कोटींहून अधिक प्रवाशांची नोंदणी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) प्रवाशांना अधिक सुलभ, सुरक्षित आणि डिजिटल प्रवासाचा अनुभव देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या एनसीएमसी स्मार्ट कार्डला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. १२ ऑगस्टपर्यंत राज्यात तब्बल १ कोटी १ लाख ७३ हजार ८३८ प्रवाशांनी एनसी एमसी स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली आहे. त्यापैकी ६४ लाख ९१ हजार ६५ कार्डे सक्रिय झाली आहेत, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

एनसी एमसी स्मार्ट कार्डच्या माध्यमातून एसटी प्रवासातील तिकीट व्यवहार अधिक सुलभ आणि कॅशलेस करण्याच्या दिशेने महामंडळाने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. पहिल्या टप्प्यात महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिकांना एनसी एमसी स्मार्ट कार्डचे वाटप करण्यात येत आहे. येत्या १ सप्टेंबरपासून महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिकांसाठी एनसी एमसी स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्यात येणार आहे. त्यामुळे अद्याप नोंदणी न केलेल्या पात्र लाभार्थ्यांनी लवकरात लवकर एनसी एमसी स्मार्ट कार्डसाठी नोंदणी करावी, असे आवाहन एसटी महामंडळाने केले आहे.

### १५ ऑगस्टपासून विद्यार्थ्यांना कार्डचे वाटप

येत्या १५ ऑगस्टपासून राज्यभरातील सर्व शालेय विद्यार्थ्यांसाठी एनसीएमसी स्मार्ट कार्डच्या नोंदणीची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. प्रत्येक शाळेत जाऊन एसटीचे अधिकृत परवानाधारक प्रतिनिधी ही नोंदणी प्रक्रिया पूर्ण करणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी एनसीएमसी कार्डसाठी इतर कोणत्याही ठिकाणी नोंदणी करू नये, असे आवाहन एसटी महामंडळाने केले आहे.

## मोर्बा मॉर्डन स्कूलची तिरंगा रॅली

**माणगाव :** भारतीय स्वातंत्र्याच्या वर्धापनदिनानिमित्त तालुक्यातील मोर्बा मॉर्डन इंग्लिश स्कूलने 'हर घर तिरंगा' कार्यक्रमांतर्गत शुक्रवारी (दि.१४) सकाळी मोर्बा गावातून उत्साहात रॅली काढली. भारत माता की जय..., वंदे मातरम..., स्वतंत्र भारताचा विजय असो विद्यार्थ्यांच्या अशा घोषणांनी मोर्बा शहर दुमदुमले. या रॅलीत शाळेचे विद्यार्थी, मुख्याध्यपक, सर्व शिक्षकवर्ग व शिक्षकेतर कर्मचारीवृंद आदी मोठ्या संख्येने उत्साहात सहभागी झाले होते.

# निवडक



## तिरंगा खरेदीसाठी नागरिकांची गर्दी

**खांदा कॉलनी :** स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर पनवेलच्या छ. शिवाजी महाराज चौक परिसरात तिरंगा आणि राष्ट्रभक्तीपर साहित्य खरेदी करण्यासाठी नागरिकांची लगबग सुरू झाली आहे. शनिवार, १५ ऑगस्ट रोजी देशभरात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा होणार असल्याने नागरिकांमध्येही देशभक्तीचा उत्साह दिसून येत आहे. छ. शिवाजी महाराज चौक परिसरात विविध आकाराचे तिरंगे, लहान राष्ट्रध्वज तसेच तिरंग्याशी संबंधित साहित्य विक्रीसाठी उपलब्ध झाले आहे. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत अनेक जण तिरंगा खरेदी करण्यासाठी बाजारात येत आहेत. स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी घरांवर, दुकानांवर तसेच विविध ठिकाणी तिरंगा फडकवण्यासाठी नागरिकांकडून खरेदी केली जात आहे. चौक परिसरातील विक्रेत्यांनी स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात राष्ट्रध्वज उपलब्ध करून ठेवले आहेत. तिरंग्याच्या तीन रंगांनी बाजारपेठही सजल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. दरम्यान, राष्ट्रध्वजाचा सन्मान राखून त्याची योग्य पद्धतीने हाताळणी करावी, असे आवाहनही करण्यात येत आहे.



## विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप

**माणगाव :** द.ग.तटकरे महाविद्यालय माणगाव येथे ग्रंथालय विभागाच्या वतीने बुधवारी (दि.१२) ग्रंथालय व माहितीशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. ग्रंथालय विभाग प्रमुख डॉ. संगीता गंगाराम उतेकर यांनी प्रास्ताविकातून डॉ. रंगनाथन यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत आधुनिक ग्रंथालय व्यवस्थेच्या विकासातील त्यांच्या अमूल्य योगदानाची माहिती दिली. जयंतीचे औचित्य साधून मुंबई विद्यापीठाच्या बुक बँक (पुस्तकपेढी) योजनेंतर्गत प्राप्त अनुदानातून खरेदी करण्यात आलेल्या पुस्तकांचे संच अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/एनटी/डीटी प्रवर्गातील गरजू विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना हे पुस्तक संच वर्षभर अभ्यासासाठी वापरता येणार असून परीक्षा संपल्यानंतर ते ग्रंथालयात परत करावयाचे आहेत. आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी आवश्यक पुस्तके सहज उपलब्ध व्हावीत आणि त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला चालना मिळावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त राबविण्यात आलेला ''ज्ञानासाठी पुस्तक आणि गुणवत्तेसाठी वाचन'' हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरला.

# स्वातंत्र्यदिनानिमित्त शैक्षणिक उपक्रमाचे आयोजन

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावणारा सामाजिक व शैक्षणिक उपक्रम अलिबाग मुरुड मेडिकल असोसिएशन आणि जंजिरा मेडिकल असोसिएशन यांच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. धर्माज क्रॉप सायन्स व शेतकरीमित्र कृषिसेवा केंद्र, पेण यांच्या वतीने मुरूड तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा, शिघ्रे (मराठी माध्यम) येथील गरजू, विशेषतः आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत सुमारे १०० विद्यार्थ्यांना लेटर पॅड व कंपास बॉक्सचे वाटप करण्यात येणार आहे. शिघ्रे येथील शाळेत एकूण ७३ विद्यार्थी शिक्षण घेत असून, त्यामध्ये ३८ मुलगे व ३५ मुली आहेत. यापैकी ३८ विद्यार्थी आदिवासी समाजातील आहेत. या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मिळणार असल्याने त्यांच्या शिक्षणासाठी या उपक्रमाचा निश्चितच लाभ होणार आहे. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमास धर्माज क्रॉप सायन्सचे अधिकारी तसेच शेतकरीमित्र कृषिसेवा केंद्र, पेणचे संचालक उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती अलिबाग व मुरुड जंजिरा मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. संजय पाटील यांनी दिली.

## विविध स्पर्धांनी रंगली केंद्रशाळा कुडली

**सुतारवाडी :** केंद्रशाळा कुडली (रोहा) येथे विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये रांगोळी स्पर्धा, तिरंगा प्रभात फेरी तसेच घोषवाक्य स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आकर्षक रांगोळ्या, चित्रे व प्रभावी घोषवाक्ये साकारली.

मुख्याध्यापक मोहन राठोड तसेच शिक्षक अविनाश जाधवर व लालचंद सदगीर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व देशभक्तीच्या भावनेला व्यासपीठ देणाऱ्या या उपक्रमामुळे शाळेमध्ये वेगळेच वातावरण निर्माण झाले होते.

# माणगावात तिरंगा रॅलीचे यशस्वी आयोजन



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव शहरात ग्रामस्थांच्या वतीने शुक्रवारी (दि.१४) भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत नागरिक, विविध शाळा, अकॅडमी, संस्था संघटनांचे संचालक, शिक्षकवर्ग, विद्यार्थी आदी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या काय्रक्रमानिमित्त शहीद कुटुंबीय, माजी सैनिकांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला आयोजित करण्यात आलेली ही रॅली माणगाव शहरातील देशभक्तीचा जागर ठरली. बालाजी कॉम्प्लेक्स येथून सकाळी १० वाजता रॅलीला सुरुवात होऊन कचेरी रोडमार्गे शहीद वीर यशवंतराव घाडगे स्मारकापर्यंत रॅली काढण्यात आली. या रॅलीत सहभागी झालेल्या सर्वांच्याच हातात तिरंगा ध्वज होता. राष्ट्रध्वज आणि मनात देशप्रेम घेऊन नागरिकांनी, विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी या उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

### • विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान

शहीदांच्या कुटुंबीयांचा विशेष सन्मान देशाच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या वीर जवानांचे योगदान शब्दांत मावणारे नाही. त्यांच्या त्यागाची आणि शौर्याची आठवण पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या भावनेतून शहीद कुटुंबीय आणि माजी सैनिकांचा विशेष सन्मान या कार्यक्रमात करण्यात आले.

त्याचबरोबर पोलीस भरती अकादमीच्या संचालकांचा, विविध शैक्षणिक संस्थांचा आणि सोशल मीडिया क्षेत्रात देशप्रेमाचा संदेश पोहोचविणाऱ्या इन्फ्लुएन्सर्सचा सत्कार करण्यात आला. रॅलीदरम्यान देशप्रेमावर आधारित पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले.

# शेवाळलेल्या फूटपाथवर घसरण्याचा धोका



**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**

पनवेल महापालिका क्षेत्रात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे रस्ते व फुटपाथवर शेवाळे साचण्याचे प्रमाण वाढले आहे. कामोठे परिसरातील काही फूटपाथवर शेवाळे जमा झाल्याने पृष्ठभाग अत्यंत निसरडा झाला आहे. त्यामुळे पादचाऱ्यांना चालताना घसरण्याचा धोका निर्माण झाला असून नागरिकांना अत्यंत सावधगिरीने मार्गक्रमण करावे लागत आहे. सततच्या पावसामुळे फूटपाथवर पाणी साचत असल्याने शेवाळे वाढण्यास पोषक वातावरण निर्माण झाले आहे.

विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांना या निसरड्या फूटपाथवरून चालताना अधिक काळजी घ्यावी लागत आहे. संभाव्य अपघात टाळण्यासाठी पालिका प्रशासनाने तातडीने उपाययोजना सुरू केल्या आहेत. कामोठे परिसरात पालिका कर्मचाऱ्यांकडून शेवाळलेल्या फूटपाथवर विशेष पावडर टाकण्याचे काम हाती घेण्यात आले. या पावडरमुळे फूटपाथवरील निसरडेपणा काही प्रमाणात कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

दरम्यान, मुसळधार पाऊस सुरू असल्याने फूटपाथची स्वच्छता व देखभाल सातत्याने करणे आवश्यक ठरत आहे. पावसाळ्यात शहरातील विविध भागांमध्ये चिखल, शेवाळे आणि पाणी साचण्याच्या समस्या वारंवार उद्भवतात. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अशा ठिकाणी तातडीने व प्रभावी उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त होत आहे.

पालिका प्रशासनाने फूटपाथची नियमित पाहणी करून धोकादायक ठिकाणी त्वरित कारवाई करावी, अशीही मागणी नागरिकांकडून होत आहे.



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमूद मिळकतींपैकी अनुक्रमांक १ कडील स्थावर मिळकत शुभांगी बळीराम नाखवा मु.पो.ता.अलिबाग, पी.एन.पी.नगर, जि.रायगड, यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची मिळकत आहे. तसेच अनुक्रमांक २ मध्ये नमुद केलेली स्थावर मिळकत किरण दत्तात्रेय मोडखरकर, रा.मु.शहाबाज, पो.पोयनाड, ता.अलिबाग, जि.रायगड यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची मिळकत आहे. खाली नमुद मिळकतींपैकी अनुक्रमांक १ कडील संपुर्ण मिळकत व अनुक्रमांक २ कडील मिळकतीपैकी ०-१५-०० हे.आर.पॉ. ही मिळकत आमचे अशिलांनी विद्यमान मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणेः-

| अ. क्र. | मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|---|
| १ | तळाशेत | १६/१ | जिरायत ०-४१-७० पो.ख.०-०१-५० एकूण ०-४३-२० | ९.७२ |
| २ | तळाशेत | १५ | जिरायत ०-१६-२० वरकस २-६६-०० पो.ख.०-१८-५० एकूण क्षेत्र ३-००-७० हे.आर.पॉ. | १.४१ |

वर अनुक्रमांक २ कडील मिळकतीपैकी खाते क्रमांक २२० किरण दत्तात्रेय मोडखरकर यांच्या मालकीचे क्षेत्र ०-६५-०० हे.आर.पॉ.अधिक पो.ख.०-०५-०० हे.आर.पॉ.एकूण क्षेत्र ०-७०-०० हे.आर.पॉ.या मिळकती पैकी ०-१५-०० हे.आर.पॉ. ही मिळकत.

वर नमुद मिळकतींच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट, ताबा, बयाणा पावती, रजिस्टर्ड अगर अनरजिस्टर्ड साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बोजा, बक्षीस, मृत्यूपत्र, भाडेपट्टा, जप्ती, लीज, लियन, अन्नवस्त्र-पोटगी, जाणे-येणेचा मार्ग अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास अगर सदर मिळकतींसंदर्भात कोणत्याही न्यायालयात कोणत्याही प्रकारचा वाद प्रलंबित अगर न्यायप्रविष्ट असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांच्या आत त्यासंबंधातील लेखी हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे त्यांचे नमुद पत्त्यावर कळवावी.

या नोटीसमध्ये नमुद केलेल्या मुदतीत कोणीही कसल्याही प्रकारची हरकत लेखी स्वरूपात न कळविण्यास सदर मिळकती निर्वेध आहेत असे समजून तसेच सदर मिळकतींशी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी सोडून दिला आहे, असे समजून आमचे अशिल वरील वर्णनाच्या मिळकतींचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व सदरच्या व्यवहारानंतर कोणीही कोणत्याही प्रकारची हरकत घेतल्यास ती आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : १४/०८/२०२६

सही/-
**अॅड.जयवंत ह.घरत**
**एम.ए.,एल.एल.एम.**
बी/१०२, ''चित्रा-तारांगण'' महर्षी कर्वे रोड, बँक ऑफ महाराष्ट्र समोर, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकती त्या मिळकतींचे विद्यमान मालक १) अनिल सदानंद डेव्हिड २) सुजाता अनिल डेव्हिड यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पै) |
|---|---|---|---|
| नागांव, ता.अलिबाग | २५५४ | ०-१४-२० जिरायत ०-००-७० पो.ख. ०-१४-९० एकुण | ४.१२ |
| नागांव, ता.अलिबाग | २५५५/२ | ०-१९-०० जिरायत ०-००-०० पो.ख. ०-१९-०० एकुण | ५.०२ |

वर वर्णन केलेल्या जमिन मिळकती या नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे

ठिकाण - अलिबाग
दिनांक- १४/०८/२०२६

**अॅड. राहूल रमेश नाईक**
मु. पो. नागांव, ता.अलिबाग,
जि. रायगड मोबा. क्र. ९९२२७९८५२८

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग यांचे कार्यालय**
काँग्रेस भुवन ट्रस्ट, तळमजला, महर्षी कर्वे, अलिबाग जि. रायगड
दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३ ई-मेल ddrrgd@rediffmail.com

जा.क्र. जिउनि/गृह/मोफा क. ११/मा.अभि./जाहीर नोटीस/ /सन २०२६ १५७२
दिनांक :- १३/०८/२०२६

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस**

प्रसन्न हाईटस सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., सर्व्हे नं. ८८, प्लॉट नं. १ व ६, मौजे धामोते-नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड तर्फे सचिव श्री नंदकुमार गंगाराम भांबेडकर यांनी १. रुखमिणी विठ्ठल मोरे, जागामालक, रा. पार्वती निवास, नेरळ बसस्टँडजवळ, नेरळ पूर्व, ता. कर्जत, जि. रायगड- ४१०१०१, २. श्री शेगाव गजानन प्रसन्न बिल्डर्स अँड डेव्हलपर्स तर्फे, प्रफुल्ल अशोक मोरे, रा. पार्वती निवास, नेरळ बसस्टँडजवळ, नेरळ पूर्व, ता. कर्जत, जि. रायगड- ४१०१०१ यांचे विरुध्द महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११(३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करुन मिळणे बाबत अर्ज केला आहे.

**मालमतेचे वर्णन**

रायगड जिल्ह्यातील ता. कर्जत, धामोते येथील भूमापन क्रमांक व उपविभाग- ८८/१, क्षेत्र ३२२ चौ.मी., भूमापन क्रमांक व उपविभाग- ८८/६, क्षेत्र ३७६.३७ चौ. मी. असे एकूण क्षेत्र ६९८.३७ चौ.मी.

अर्जदाराचे अर्जाबाबत प्रतिवादी यांना नोटीस पाठविण्यांत येवून सदरची नोटीस त्यांना प्राप्त झालेली आहे. तरीही प्रतिवादी यांचेवतीने किंवा ते स्वतः सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. सबब अर्जदाराने जाहीर पेपर नोटीस मागणी केली आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतीम संधी देण्यांत येत असून त्यांनी वरील मिळकती बाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावीत कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक ०१/०९/२०२६ रोजी दुपारी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक- १३/०८/२०२६

सही/-
**(त.सं.पाटील)**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, रायगड अलिबाग**

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री केदार विश्वास म्हात्रे, श्री. प्रथम विश्वास म्हात्रे, श्रीमती लता विश्वास म्हात्रे, श्री. सुमित विश्वास म्हात्रे यांच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे मोग्रज, ता. कर्जत जि. रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं १३/२/ब/१ ज्याचे क्षेत्रफळ ३.४७.०० गुंठे पैकी लिहून देण-ार यांचे हिश्याचे क्षेत्र ०.२०.०० गुंठे क्षेत्र जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हित संबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक १५/०८/२०२६

**अॅड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता मु.पो. कडाव ता. कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नागाव, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जिरायत व बागायत जमीन मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| नागाव ता.अलिबाग | ५३ | जिरायत ०-२६-५० बागायत ०-०७-३० एकुण ०-३३-८० | ३.८० |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत हि विद्यमान मालक १) अवधुत श्रीधर नाख्ये, २) योगेश श्रीधर नाख्ये यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही हे सर्वांस कळावे.

ठिकाण- अलिबाग
दिनांक- १४/०८/२०२६
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**अॅड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
ऑफिस - लक्ष्मी नारायण, पहिला मजला, गाळा नं.७ व ८, ब्राम्हण आळी, राम मंदिर समोर, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२२०१

दिवाणी अ ५३ म
बजावणीचा हुकूम का करु नये याची कारणे दाखविण्याविषयी नोटीस.
(नियमक्रम २१ नियम १६ )
(नमुना क्रमांक ७,
परिशिष्ट ई, अनुसूची १)

## जाहीर नोटीस

दरखास्तदार तर्फे वकील संपदा पाटील,
अलिबाग येथील मा. एस. ए. आर. सय्यद, सह दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर यांच्या न्यायालयात
विशेष दरखास्त नं. ४८/२०२५
निशाणी क्रमांक १२/ड

ने. ता. २८/०८/२०२६

पूजा प्रमोद सावंत ...दरखास्तदार
विरुध्द
मधुकर नथू बेणारे तर्फे वारस ...सामनेवाला

प्रति,
सा.वाला - ३. संजय मधुकर बेणारे,
रा.मु.आमली, पो.वळके, घर क्र. १६२,
ता. मुरूड, जि. रायगड

ज्याअर्थी, उपरिनामित दरखास्तदार यांने, समरी सिव्हील सुट क्र. १/२०१६ यातील हुकूमनामा आपणास लेखी हस्तांतरित करुन देण्यात आलेला आहे. या प्रतिपादनावर सदर हुकूमनाम्याच्या बजावणीसाठी या न्यायालयात दरखास्त केली आहे. त्याअर्थी, या लेखावरुन तुम्हास नोटीस देण्यात येत आहे की, बजावणीचा हुकूम का देऊ नये याचे कारण दाखविण्यासाठी दिनांक २८/०८/२०२६ रोजी सकाळी १०-३० वाजता या न्यायालयासमोर तुम्ही हजर व्हावे.

आज दिनांक २०/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

सही/-
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय, व स्तर अलिबाग

दिवाणी अ ५३ म
बजावणीचा हुकूम का करु नये याची कारणे दाखविण्याविषयी नोटीस.
(नियमक्रम २१ नियम १६ )
(नमुना क्रमांक ७,
परिशिष्ट ई, अनुसूची १)

## जाहीर नोटीस

दरखास्तदार तर्फे वकील संपदा पाटील,
अलिबाग येथील मा. एस. ए. आर. सय्यद, सह दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर यांच्या न्यायालयात
विशेष दरखास्त नं. ४८/२०२५
निशाणी क्रमांक १३/ड

ने. ता. २८/०८/२०२६

पूजा प्रमोद सावंत ...दरखास्तदार
विरुद्ध
मधुकर नथू बेणारे तर्फे वारस ...सामनेवाला

प्रति,
सा.वाला - ४. संपदा मंगेश जाधव,
रा. एकता नगर, भुवनेश्वर, अलिबाग, जि. रायगड

ज्याअर्थी, उपरिनामित दरखास्तदार यांने, समरी सिव्हील सुट क्र. १/२०१६ यातील हुकूमनामा आपणास लेखी हस्तांतरित करुन देण्यात आलेला आहे. या प्रतिपादनावर सदर हुकूमनाम्याच्या बजावणीसाठी या न्यायालयात दरखास्त केली आहे. त्याअर्थी, या लेखावरुन तुम्हास नोटीस देण्यात येत आहे की, बजावणीचा हुकूम का देऊ नये याचे कारण दाखविण्यासाठी दिनांक २८/०८/२०२६ रोजी सकाळी १०-३० वाजता या न्यायालयासमोर तुम्ही हजर व्हावे.

आज दिनांक २०/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, व स्तर अलिबाग**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे अबीटघर, तालुका-मुरुड, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत, जमिनीचे विद्यमान मालक यांस कडुन कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार रु. पै. | विद्यमान मालकांची नावे |
|---|---|---|---|
| १७/२ | ०-८१-०० पो.ख.०-३०-०० एकूण १-११-०० पैकी ०-२१-०० एवढे क्षेत्र | ०.६९ | ब्लॅन्सी लॉइड फलकाव लॉइड लॉरेन्स फलकाव |

वरील वर्णनाची जमीन मिळकत ही निर्वेध असल्याचा निर्वाळा त्या मिळकतीच्या विद्यमान मालक यांनी दिला असून गावचे गाव नमुना न. सातबारापत्रकी ही त्यांचे नावे मालक म्हणुन दाखल आहे. तरीही सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत वरील मिळकतीबाबत कुणाचाही विक्री, दान, गहाण, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारस हक्क, लिज, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट अगर कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबध असल्यास त्याबद्दलची लेखी हरकत, सबंधीतांनी खाली सही करणार यांचेकडे योग्य त्या कागदोपत्री पुरव्यासाहित द्यावी. विहित मुदतीत लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध आहेत असे गृहीत धरून सदरील व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचे अशील यांचेवर बंधनकारक राहणार नाही, याची सर्व लोकांनी नोंद घ्यावी.

दिनांक :- १४/०८/२०२६
अलिबाग

सही/-
**अॅड. मसीर अ.घोले**
१७. अलिबाग कमर्शियल कॉम्प्लेक्स,
चेंढरे, अलिबाग, ४०२ २०१.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेली शेती मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. लालचंद गंगाधर पाटील यांचेकडून खरेदी घेण्याचे ठरविले आहे. त्याकरीता खाली नमूद मिळकतीवरील मालकी हक्कांची तपासणी करणेची आहे. मिळकतीवरील त्यांचे मालकी हक्क, हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा सदर विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे गाण तर्फे श्रीगाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भूमापन व हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|
| १३ | ४-९१-०० मधील लालचंद गंगाधर पाटील यांच्या मालकीच्या ०१-३६-१८ पैकी ०१-११-१८ | ७.५३ पैकी २.०५ |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणा व्यक्ती, आर्थिक संस्था, बँका, भागीदारी संस्था, कंपनी इत्यादी यांचा गहाण, दान, बक्षिस फरोक्त, लिज, कुळ हक्क, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, ताबा, वहिवाट, दावा न्यायालयीन वाद, एफ.एस.आय.टी.डी.आर. वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती वरील विद्यमान मालकांचे मालकी हक्क निर्वेध आहेत असे समजून तसा दाखला देण्यात येईल आणि माझे अशिल वर नमूद मिळकतींचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- १४/०८/२०२६

**अॅड. रविंद्र वि. ओक**
'गुरूकृपा', अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार श्रीभुरामा हॉरिझोन यांनी मौजे मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या बिनशेती मिळकती, त्या मिळकतींचे मालक सुरेखा संभाजी देशमुख यांचेकडून विकसना करीता घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ चौरस मीटर | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ११ | १/ब/१ | ११६५-०० | २३-३० |
| ११ | १/ब/२ | १२८१-०० | २५-६२ |
| ११ | १/ब | २६४-०० | |

सबब सदर वर नमुद केलेल्या बिनशेती मिळकतींच्या विकसनाच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर वर नमुद केलेल्या मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील वर्णनाच्या मिळकतींचा विकसनाचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकाबरोबर पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १५/०८/२०२६

**अॅड.सी.बी.ओसवाल**
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर-निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१०२०१.

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की, मौजे वरवणे, ता.पेण, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल श्री.भालचंद्र लहु म्हात्रे, विवेक भास्कर दापोलकर व उमेश किशोर घरत यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक रेणुका प्रकाश भंडारी व हरिश्चंद्र हिरू गायकवाड यांच्याकडुन रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे.

| गाव | सर्व्हे नं./गट नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पै |
|---|---|---|---|
| वरवणे | ९२ | ०.८६.०० | ०.४३ |
| वरवणे | १७१ | ०.४०.०० | ०.१८ |
| वरवणे | २५१ | २.५५.०० | १.३५ |
| वरवणे | ८४ | २.६३.०० | १.४० |

वरील क्षेत्र हे आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिज, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत खाली सही करणार यांचे पत्त्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी. वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचे व्यवहार पूर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिपः सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

सही /-

ठिकाणः पेण
दि. १५/०८/२०२६

**अॅड हेमा ज. पाटील (घोडिंदे)**
पेण पोलीस स्टेशनजवळ तहसिल ऑफिस
आवारात, कोटआळी पेण, ता.पेण जि.रायगड -४०२१०७
मो. नं.९८२२०३०३८९

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, माझे अशिल १) श्री.नरेश बबन हजारे, २) श्री.दत्तात्रेय पंढरीनाथ रूठे, ३) श्री. विक्रम प्रदीप पाटील, ४) श्री. सागर संतोष बोराडे यांनी खाली नमुद केलेली शेतजमीन मिळकत जमीन मिळकतीचे मालक श्री. रिमेशबाबू कल्लारीकांन्डी कुन्नुंमब्रिथ, राहणार मौजे २१०१, ए आदी अल्लुरे, पोलिस स्टेशन जवळ, कांजुरमार्ग पुर्व, पो. भांडूप पुर्व मुंबई सदर्बन पिन कोड ४०००४२ यांच्या कडून कायम स्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| मौजे अंत्राट तर्फे वरेडी ता. कर्जत, जि. रायगड | १०९/२ | ०.७४.०० | ०.३३ |

वरील वर्णनाच्या कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक हितसंबंध असेल तर संबंधितांनी आपली हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतींशी कोणत्या इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही. असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल. याची नोंद घ्यावी याप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

ता. १३.०८.२०२६

**अॅड. यज्ञेश अनंत भागवत**
रा. फ्लॅट नं. १०१, पाल टॉवर, भिसेगाव,
ता. कर्जत जि. रायगड.
मो. नं. ९३०७८८५७११

## जाहीर नोटीस

सर्व लोकास या जाहीर नोटिशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी खालील वर्णनाची जमीन मिळकत, सामाईक मिळकतीचे मालक उस्मान रशीद सैय्यद वगैरे यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले असून तशी बोलणी चालू आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| मोरोंडे | ५ | क्षेत्र २-९८-१० पो.ख. ०-२८-२० एकूण ३-२६-३० | ३८.४७ |

यापैकी क्षेत्र २-२६-०० हे.आर. इतके क्षेत्र या जाहीर नोटीशिचा विषय आहे.

सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी दिलेला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकारार, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क, व हितसंबंध वा दुरान्वये संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात, कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार याजकडे हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध असून तिचे मार्केटेबल टायटल क्लिअर आहे, असे समजून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. १४/०८/२०२६

**अॅड. वैभव गिरीधर पाटील**
जिल्हा न्यायालय अलिबाग, रायगड
मु. सांबरी, पो. कुर्डुस, ता.अलिबाग,
जि. रायगड मो.नं. ८८०५५१८०६८

## जाहिर नोटिस

तमाम लोकांस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, विद्यमान जमिन मालक इरशाद अहमेद बब्बन खान यांचेसोबत ताबेकब्जातील व वहिवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिश्यातील खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन आमचे अशिलांनी त्यांचेकडुन कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरहु जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणेः-

**मौजे -चिंचवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र हे. आर. | आकारणी रु.- पै |
|---|---|---|---|
| २६ | १०/अ | ०.०५.०० पो.ख.०.००.०० एकुण क्षेत्र ०.०५.०० मिळकतीचे खरेदीखत | ०.०५ |

वरील वर्णनाच्या जमिनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस झाल्यापासुन ७ (सात) दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमीन निर्वेध व बोजारहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पुर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत,
दिनांक : १५/०८/२०२६

**अॅड. मोनाली रामदास हजारे**
एम.कॉम. एल. एल. बी.
पत्ताः दहिवली, ए. व्ही. एफ. रेसिडेन्सी,
ललानी रोड, कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड
मो.नं. ९२६०१०९२८२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक रीना संदीप पाटील व काशिनाथ चिंधू पाटील यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मौजे हेदवली तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| १८/९ | एकुण क्षेत्र ०-३३-०० हे आर पॉ | ०-३३ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही. किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही. असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक १५/०८/२०२६

खरेदीदारातर्फे वकील **अॅड. निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
पत्ता - दहिवली तर्फे नीड तालुका कर्जत
जिल्हा रायगड ४१०२०१

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने- नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **पाटील अँड शेख अकॅडमी** SSC, HSC, BA, B.COM, B.SC. उत्तीर्ण आणि अनुत्तीर्ण गृहींणीसाठी, मुलींसाठी, मुलांसाठी सुवर्णसंधी आमच्या टेक्निकल कोर्ससाठी प्रवेश घ्या, उत्तम पगार मिळवून यशस्वी व्हा. सिव्हिल/आर्किटेक्चरल ड्राफ्टसमनची आणि मेकॅनिकल ड्राफ्टसमनची नविन बॅच ११ऑगस्ट २०२६ पासुन सकाळी आणि संध्याकाळी सुरु होणार आहे. प्रवेश सुरू झाले ९७५७०९९९२३
- **नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी** स्टाफची आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, वेटर, हाऊसकिपर, इंडियन चायनीज कुक, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते ६ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल- ७५५९१८४६१२
- **जन्नावर हॉस्पिटल चेंढरे** अलिबागमध्ये कामासाठी मावशी, स्टाफ नर्ससाठी जागा आहे. संपर्क : ७७९८०३४५०९
- **ऑफिस स्टाफ आवश्यक** Tanna Consultancy शॉप नं. १ शारदा CHS, महावीर चौक, बेल्जियम वॅफल समोर, अलिबाग, जि. रायगड संपर्क : ९९२३७५०५४९, ९१०५७१७०३८ इच्छूक उमेदवारांनी संपर्क साधावा.
- **गाळा भाड्याने मिळेल.** ९४२३३७५१९८/८४११०१६४४४
- **डिलेव्हरीसाठी माणसे पाहिजेत.** फक्त अलिबाग परिसरातील गरजुनी १)पोयनाड, वडखळ, पेण, २) रेवदंडा मुरुड, श्रीवर्धन, ३) बाईक आमची लायसन्स पाहिजे. ४) कॉम्प्युटर ऑपरेटर सकाळी ९-०० ते १.०० व दुपारी ३.०० ते ७.०० ५) पार्ट/फुल टाईम चालेल. मो.नं.८८८८२२०२२१

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**




## राशीभविष्य

- **मेष :** अचानक खर्चाचा ताण वाढेल. महत्त्वाचे करार लांबणीवर टाकावे. कौटुंबिक प्रश्न सोडवता येतील.
- **वृषभ :** व्यवसायात उत्साह राहील. नव्या ओळखी लाभदायक ठरतील. अचानक धनलाभाचे योग आहेत.
- **मिथुन :** ग्रहमानाची अनुकूलता राहील. महत्त्वाचे निर्णय तातडीने घ्यावेत. धार्मिक कार्याचा आनंद घ्याल.
- **कर्क :** अपेक्षित घटना घडतील. नव्या योजना मार्गी लागतील. घरगुती व्यावसायिकांना दिलासा मिळेल.
- **सिंह :** आर्थिक बाबतीत फसवणूक संभवते. व्यवसायात उलाढाला साधारण राहील. जुनी येणी रखडतील.
- **कन्या :** अपेक्षित ध्येय गाठू शकाल. भावनेपेक्षा कर्तव्याला महत्त्व द्यावं. विवाहाच्या प्रयत्नात यश येईल.
- **तूळ :** थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. कौटुंबिक समारंभासाठी अनुकूलता राहील. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.
- **वृश्चिक :** अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवा. महत्त्वाची कामं रखडतील. दुसऱ्यांवर विसंबून राहणं टाळावं.
- **धनु :** महत्त्वाच्या योजनांना गती मिळेल. जवळच्या नातलगांच्या भेटी होतील. कलाकारांचा उत्साह वाढेल.
- **मकर :** खर्च वाढला तरी प्राप्ती तशीच राहील. महत्त्वाच्या घटना दिलासा देतील. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **कुंभ :** महत्त्वाचे निर्णय दूरदृष्टीनं घ्यावेत. मानसन्मानाचे योग आहेत. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **मीन :** कामासाठी धावपळ, दगदग होईल. सांधेदुखीचा त्रास संभवतो. विद्यार्थ्यांच्या कलांना वाव मिळेल.

## दिन विशेष
### १५ ऑगस्ट

**स्वातंत्र्य दिन: भारत, काँगो, उत्तर कोरिया, दक्षिण कोरिया**

**२०१४ :** बंगालमधील शारदा चिटफंड गैरव्यवहारप्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाचे ५६ ठिकाणी छापे.

**२०१५ :** सीमेवर तणावाची स्थिती. पाकिस्तानच्या कुरापती सुरू. सहा नागरिक ठार.

**२०१६ :** भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार अजित वाडेकर यांचे निधन.

## आरोग्यमंत्र
### आरोग्यदायी खिचडी...

आहारातला महत्त्वाचा आणि बहुतेक सगळ्यांच्या आवडीचा प्रकार म्हणजे खिचडी. वेगवेगळ्या खाद्यघटकांचा वापर करुन खिचडी रांधता येते. याविषयी...

✻ हिरव्या मूगडाळीचा वापर करून सिंधी खिचडी तयार केली जाते. यात हळद, हिंग आणि इतर मसाले घातले जातात. त्यामुळे हा परिपूर्ण आहार मानला जातो.

✻ मूगडाळ, तांदूळ आणि विविध भाज्यांचा वापर करून आरोग्यदायी खिचडी तयार करता येईल. यात रंगीबेरंगी भाज्या वापरा. फायबर, खनिजं, कर्बोदकं आणि विविध प्रकारची जीवनसत्त्व या खिचडीतून मिळतील.



✻ ओट्सचा वापर करून खिचडी बनवता येते. ओट्समध्ये फायबर, कर्बोदकं आणि प्रथिनं मुबलक प्रमाणात असतात.

✻ हातसडीच्या तांदळाची खिचडी हा सुद्धा चांगला पर्याय आहे. यात मॅग्नेशियम, सेलेनियम, फॉस्फरस आणि कॉपर असे घटक असतात तसंच बी ३ हे जीवनसत्त्व असतं.

✻ मक्याच्या खिचडीत फायबर आणि अँटिऑक्सिडंट्स असतात. यामुळे डोळ्यांचं आरोग्य चांगलं राहतं त्याचबरोबर रक्तदाब नियंत्रणात राहतो. मसाले आणि हिरव्या मिरच्या घातल्या तर हा पदार्थ चविष्ट लागतो. विशेषत: रुग्णासाठी ही खिचडी गुणकारी सिद्ध होते.

## सफर देशांची
### भौगोलिक वैविध्य जपणारा देश

'पॉडगॉरिका' ही या देशाची राजधानी आहे. 'मॉंटेनेग्रीन' ही इथली अधिकृत भाषा आहे. या देशात बऱ्याच पर्वतरांगा आहेत. तसंच इथला काही भाग सपाटही आहे. 'स्कॅडार' हा या देशातला सर्वात मोठा तलाव तर ड्रिना, लिम आणि तारा या प्रमुख नद्या आहेत. या देशात बराच काळ उन्हाळा असतो. इथे उन्हाळ्यात कोरडं वातावरण असतं. इथला हिवाळा सौम्य असतो.

जंगली डुकरं, अस्वलं, हरणं, कोल्हे, लांडगे, रानमांजरं असे बरेच प्राणी इथे आढळतात. काही प्रजातींचे मासे, गोगलगायी आणि कीटक फक्त मॉंटेनेग्रोमध्येच आढळतात. इथे विविध प्रकारची झाडंही आहेत. हा प्रदेश पंधाराव्या शतकापासून मॉंटेनेग्रो म्हणून ओळखला जातो. या देशात विविध प्रकारचे उद्योग आहेत. स्टीलनिर्मिती, अॅल्युमिनियमशी संबंधित उद्योग, शेतमालावर प्रक्रिया करणं आणि पर्यटन हे इथले प्रमुख उद्योग आहेत. बटाटे, आंबट फळं, धान्यं, ऑलिव्ह ही पिकं इथे घेतली जातात.

## ब्युटी टॉक
### लाभदायी चॉकलेट वॅक्स

हातापायांवरची लव काढून टाकण्यासाठी वॅक्सिंगचा पर्याय निवडला जातो. साखरेच्या वॅक्ससोबतच सध्या चॉकलेट वॅक्स हा प्रकारही प्रचलित आहे. चॉकलेट वॅक्सच्या लाभांविषयी...

✻ साखरेच्या वॅक्समध्ये लिंबू, मधासारखे घटक असतात. हे घटक त्वचेला तजेला देतात. पण चॉकलेट वॅक्समध्ये कोको, सोयाबिन ऑईल, बदामाचं तेल, ग्लिसरिन, विविध प्रकारची जीवनसत्त्वं, ऑलिव्ह ऑईल असे घटक असतात. त्यामुळे चॉकलेट वॅक्समुळे त्वचेला जास्त पोषण मिळतं.

✻ कोरडी आणि संवेदनशील त्वचा असणाऱ्यांनी चॉकलेट वॅक्स करून घ्यायला हवं.

✻ चॉकलेट वॅक्समध्ये एसेन्शियल ऑईल्स असतात. यामुळे वॅक्सिंगनंतर त्वचा छान तजेलदार दिसते.

(क्रमश:)

## पंचांग

**शनिवार, १५ ऑगस्ट २०२६**
**स्वातंत्र्य दिन**
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
श्रावण शु. ३, चंद्रराशी : सिंह,
नक्षत्र : उ. फाल्गुनी, योग : शिव, सिद्ध,
सूर्योदय ६.२२, सूर्यास्त ७.०४

## फॉरवर्ड्स

**साथ हमारें बैठ कऱ वक़्त भीं रोयां एक़ दिन...**

**बोला.. बन्दा तू ठीक हैं.. मैं हीं ख़राब चल रहां हूँ...!**

## वेगळ्या वाटा

आपण प्रत्येक क्षेत्रातले तज्ज्ञ असू शकत नाही. मात्र प्रशिक्षण घेतल्यानंतर आपण कौशल्यं विकसित करू शकतो. नोकरीच्या बाजारपेठेवर नजर टाकली तर ८४ टक्के कंपन्या नव्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देतात. त्यामुळे आपल्याकडे कौशल्यं नसतील तरी ती आत्मसात करता येतात. जवळपास ४२ टक्के अर्जदारांकडे नोकरीशी संबंधित कौशल्यं नसतात असं एक अहवाल सांगतो. त्यामुळे तरुणांनी नोकरीसाठी अर्ज करून किमान मुलाखत द्यावी असं तज्ज्ञ सांगतात. मुलखतीदरम्यान तुमच्यातला एखादा गुण कंपनीला दिसू शकतो आणि तुमची निवड होऊ शकते.

## करिअरवाटा
### जर्नालिझममधील शिक्षणसंधी...

सरकार नानाविध कार्यक्रमांमध्ये सहभाग नोंदवत असतं. कलागुणांच्या विकासाकडे सरकारचं जाणीवपूर्वक लक्ष असतं आणि या क्षेत्राचा विकास व्हावा यासाठी वेगवेगळे उपक्रमही राबवले जात असतात. याचाच भाग म्हणून सरकारकडून काही अभ्यासक्रम राबवले जातात. उज्ज्वल कारकिर्द घडवण्यास साह्यभूत ठरणाऱ्या या कोर्सेसविषयी जाणून घ्यायला हवं.



✻ सर्टिफिकेट कोर्स इन ऑटोमोटिव्ह जर्नालिझम : या अभ्यासक्रमातंर्गत उच्चार, प्रसार तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक मीडिया, टीव्ही पत्रकारिता, निवेदन, लेखन, अंतर्गत आणि बाह्यसजावटीचे ज्ञान, स्टुडिओमध्ये प्रशिक्षण, भेट आदींचं ज्ञान मिळेल. ✻ सर्टिफिकेट कोर्स इन टीव्ही जर्नालिझम : यात इलेक्ट्रॉनिक मीडिया, टीव्ही पत्रकारिता, टीव्हीवरील बातम्यांचं वाचन, बातम्यांचं संकलन, हवामानाच्या अंदाजाचं वाचन, ऑन कॅमेरा शिक्षण, मुलाखतींचं तंत्र, स्टुडिओला भेट यांचा समावेश असतो. ✻ सर्टिफिकेट कोर्स इन रेडिओ जॉकी अँड स्क्रिप्ट रायटिंग : यात रेडिओसंबंधीचं समग्र ज्ञान, कार्यक्रमातील वैविध्य, बातम्यांचं वाचन, रेडिओ स्पॉट्स आदींबाबत माहिती दिली जाते.

## खेचाखेची
### वाघ बकरी चहा

वाघ बकरी चहाची वैशिष्ट्ये:

एकट्याने बसून प्यायल्याने वाघ असल्याची फिलिंग येते...

.
.
.
.
.

आणि बायको समोर बसून प्यायल्याने बकरी असल्याची फिलिंग येते...

## वेगळं काही

इंग्लंडमधल्या नील कॅम्बेल या ४५ वर्षांच्या व्यक्तीने २८०.५५ किलोमीटर प्रतितास एवढ्या वेगाने सायकल चालवत २४ वर्षांपूर्वीचा विक्रम मोडला. हा विक्रम करण्यासाठी नील यांना धावपट्टीवर पोर्शे कारशी स्पर्धा करायची होती. त्यांना या गाडीला गाठायचं होतं. ही स्पर्धा उत्तर यॉर्कशायरच्या ३.२ किलोमीटर लांब 'एलविंग्टन एअरफील्ड' वर रंगली. या विक्रमासाठी नीलने वापरलेली सायकल खास अशा स्पर्धांसाठीच तयार करण्यात आली आहे. याआधी हा विक्रम नेदरलँडचा सायकलपटू फ्रेड रोम्पेलबर्गच्या नावे होता. त्याने १९९५ मध्ये २६८.७६ किलोमीटर प्रतितास एवढ्या वेगाने सायकल चालवली होती.

## स्टाईल युवर हेअर
### वेण्यांचे हटके प्रकार!

केस मोठे असतील तर तिपेडी अथवा पाचपेडी वेणी घालणं ही खूप जुनी स्टाईल आहे. पण आता ती नव्या स्टाईलनिशी कॅरी केली जात आहे. पाहू या याविषयीचे नवे ट्रेंड्स...

✻ बॉक्सर ब्रेड– हा प्रकार पंजाबी सलवार सूटवर खास दिसतोच याशिवाय वेस्टर्नवेअरवर देखील चांगला दिसतो. ✻ प्रिन्सेस ब्रेड– दाट केस असणाऱ्या युवतींसाठी ही स्टाईल परफेक्ट आहे. पार्टीसाठी ही स्टाईल करू शकता. ✻ मर्मेड ब्रेड– शेंड्याकडे निमुळत्या होत जाणाऱ्या वेणीला वरच्या बाजूने फुलवावं. छान लूक मिळून जातो. मध्यम लांबीच्या केसांसाठीही काही विशेष हेअरस्टाईल आहेत. ✻ वॉटरफॉल स्टाईल– सेलिब्रिटींमध्ये लोकप्रिय असलेली स्टाईल म्हणजे वॉटरफॉल स्टाईल. पातळ आणि जाड अशा दोन्ही केसांसाठी ही स्टाईल उपयुक्त आहे. ✻ हेडबँड स्टाईल– केसांची एक बट घेऊन त्याची वेणी घालून हेअरबेल्टसारखी दुसऱ्या बाजूला फिक्स करावी. ही हेअरस्टाईल आकर्षक दिसतेच शिवाय यंग लूक मिळवून देण्यासही मदत करते. ✻ शॉर्ट बॉक्स ब्रेड हेअरस्टाईल– आउटिंगला जाणार असाल तर पाश्चात्य धाटणीची ही हेअरस्टाईल जरूर कॅरी करा. कूल लूक मिळेल.



## सुडोकू १३९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | | | ६ | ८ | | | | |
| १ | | ९ | ३ | २ | | | | |
| | | | | | | १ | ६ | |
| ६ | | | | | ४ | ३ | ५ | |
| ३ | | | ७ | | ८ | | | २ |
| | ७ | ४ | ५ | | | | | ८ |
| | ५ | १ | | | | | | |
| | | | | ४ | ३ | ९ | | ५ |
| | | | | ५ | ६ | | | १ |

**टीप -**

✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्र ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.

✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.

✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १३८ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | ३ | १ | २ | ७ | ९ | ४ | ५ | ६ |
| ७ | ६ | ५ | ४ | ८ | ३ | १ | २ | ९ |
| ४ | ९ | २ | १ | ६ | ५ | ३ | ७ | ८ |
| ९ | ४ | ३ | ७ | १ | ६ | २ | ८ | ५ |
| ६ | १ | ८ | ५ | ३ | २ | ७ | ९ | ४ |
| ५ | २ | ७ | ९ | ४ | ८ | ६ | ३ | १ |
| १ | ८ | ६ | ३ | ९ | ७ | ५ | ४ | २ |
| ३ | ५ | ४ | ८ | २ | १ | ९ | ६ | ७ |
| २ | ७ | ९ | ६ | ५ | ४ | ८ | १ | ३ |

## शब्दकोडे क्रमांक १३९



**आडवे शब्द :–**

१) ओळखीचा
३) राजाचे निवासस्थान
७) रक्षण करणारा
१०) काढलेली सुट्टी
११) नष्ट झालेले मेलेले
१३) प्रतिदिनी
१६) बस्तान
१७) शरीरावरील माराची खूण
१८) उपवन
१९) काटकसर
२२) टरफल
२३) मनातील विचार मन
२४) फांदी तुटतानाचा आवाज
२६) मासिक भत्ता
२८) स्थिती, अवस्था
२९) कौसल्यापुत्र
३०) गोमाता
३१) शर्करा
३३) जय
३४) प्रजा, कुळावरील सरकारी कर
३७) फिकीर, गुणांची पारख
३९) मनाचा झालेला ग्रह
४०) एक शिकारी पक्षी
४२) सिंहासन
४३) ✻✻✻ राम––गोसावी, भटक्या मनुष्य
४४) अर्जुनाचा रथ चालविणारा श्रीकृष्ण
४६) आजच्या आधीचा दिवस
४७) जेवणातील रसरशीत तोंडी लावणे
४९) पती, यजमान
५०) मला
५१) वेळेचा कमीतकमी भाग
५२) नगरवासी, एक आडनाव ५५) मल्ल
५७) अनाथ
५८) दोन डोंगरामधील अरुंद रस्ता
५९) कविता, गीत
६०) बारा महिन्याचा काळ
६१) लटलटणे, धैर्य सुटणे
६२) तृण, चारा
६४) उत्तराधिकारी
६६) मत देण्याची क्रिया
६८) मुक्तता
६९) बारीकसारीक
७०) जाडसर पीठ

**उभे शब्द :–**

१) कमळ
२) पुष्कळ
३) भूपती
४) नंतर
५) वर्ष
६) वाईट सवय, खोड
७) मनावर ठेवला आवर
८) निमग्न
९) आपल्या कठीण प्रसंगास कोण मदत करतो ? रामदासस्वामीची एक विचारणा
१०) चांदी
१२) टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास
१३) पत्थर
१४) रोख रक्कम
१५) एक औषधी हळद प्रकार
१७) सिंह
१८) वाकलेला
२०) लक्ष्मी
२१) पोळ्या भाजण्याचे पात्र
२५) च्या साठी
२७) पृथ्वी
३२) वाळा
३३) वाटप
३५) योग्य, उचित
३६) दिवस
३७) मणका
३८) अर्धा शेर
४१) जोडीदार
४४) बाजीप्रभूंच्या रक्ताने पवित्र झालेली जागा
४५) दर्या, अर्णव
४६) वेळेचा अपव्यय
४७) रात्री चमकणारा किडा
४८) रंग
५०) अधिक महिना
५१) नष्ट होणारे
५३) ढगांचा आवाज
५४) भांडण, तंटा
५६) लोणी
६३) डोळ्यातील बुब्बुळावर येणारा कवडा
६४) चणचण, उणीव
६५) लोखंड
६६) अंत:करण
६७) दरवाजा

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# कलासक्त



## रंगबहार

# अब तुम्हारे हवाले वतन साथियो!

**शरद कोरडे**





१९६४ साली निर्माते चेतन आनंद यांचा एक चित्रपट प्रदर्शित झाला होता, त्याचे नाव होते 'हकीकत' हा चित्रपट भारत चीन यामध्ये १९६२ साली झालेल्या युद्धावर आधारित होता. चीनने भारताच्या लडाख सीमेवर आक्रमण केले होते. भारताला हे अनपेक्षित होते, त्यामुळे युद्धाची कोणतीही तयारी भारताने केलेली नव्हती. 'आम्ही प्रेमाने जग जिंकू' या तत्कालीन पंतप्रधान जवाहर नेहरू यांच्या विधानामुळे आपणावर अशी युद्धाची वेळ येईल हे कुणाही भारतीयांना वाटले नव्हते.

ऑक्टोबर २० पासून सुरू झालेले हे युद्ध नोव्हेंबर १९६२ पर्यंत एक महिना चालू होते. हे युद्ध भारताच्या अक्साई चीन या लडाखच्या सीमेवर व पूर्वोत्तर सीमांत भागांत म्हणजे आत्ताच्या अरुणाचल प्रदेशातील सीमेवर चालू होते. अनपेक्षित झालेल्या या आक्रमणामुळे भारताचे खूप नुकसान झाले. कारण अशा युद्धासाठी भारताची तयारी झाली नव्हती. अपुरे सैन्य दल, अपुरी हत्यारे, अपुरे रणगाडे, तोफा, मशीनगन्स यामुळे भारत पराभवाच्या छायेत होता. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारत चीन सीमावाद सुरू होता. अक्साईचीन व मॅकमोहन रेषे लगतच्या सीमा पक्क्या झाल्या नव्हत्या. तिबेट मधील उठावानंतर दलाई रामा यांना भारतात राजनैतिक संरक्षण दिले होते, त्यामुळे चीन चिडला होता. शिवाय चीनने ऑक्साई चीनमध्ये गुप्तपणे रस्ते बनविण्यास सुरुवात केली होती. २० ऑक्टोबरला लडाख व मॅकमोहन रेषेच्या दरम्यान मोठ्या प्रमाणात हल्ले केले चिनी सैनिकांनी तवांग सारख्या महत्त्वाच्या ठाण्यांवर हल्ले केले. २० नोव्हेंबरमध्ये चिनने युनोच्या मध्यस्थीमुळे एकतर्फी युद्ध विराम लागू केला. आपले सैन्य मागे घेतले पण अक्साई चीनवर आपले नियंत्रण ठेवले. या युद्धामध्ये भारताची अपरिमित हानी झाली. अनेक सैनिक मारले गेले. अपुऱ्या शस्त्रांमुळे, अपुऱ्या दारूगोळ्यांमुळे व अपुऱ्या सैनिकांमुळे भारतावर ही नामुष्की आली. या साऱ्या घटनांचा मागोवा घेत चेतन आनंद यांनी हा 'हकीकत' सिनेमा निर्माण केला. या सिनेमाची कथा पटकथा, दिग्दर्शन चेतन आनंद यांनीच केले होते. कैफी आझमी यांनी गीते लिहिली होती, तर मदन मोहन यांनी त्यांना संगीतसाज दिला होता. या चित्रपटात धर्मेंद्र, प्रिया राजवंश, विजय आनंद, संजय खान, भूपेंद्र सिंग, सुधीर, बलराज साहानी, अचला सचदेव, इंद्राणी मुखर्जी, शेख मुख्तार, शौकत आझमी, लेव्ही अहरोल व जयंत आदी कलाकारांनी भूमिका केल्या होत्या. इंडियन पीपल्स थिएटर असोसिएशनच्या अनेक वामपंथीय कलाकारांनी या चित्रपटात कामे केली होती व त्याचा कोणताही मोबदला त्यांनी घेतला नव्हता. त्यांत बलराज साहनी, कैफी आझमी, शौकत आझमी आदी कलाकारांचा समावेश होता. प्रत्यक्ष युद्धाच्या सीमेवर जाऊन तेथे चित्रीकरण केलेला हा पहिला बॉलिवूडमधील चित्रपट होता, त्यासाठी चेतन आनंद यांनी भारत सरकारची खास मदत घेतली होती व त्यावेळचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी त्यासाठी त्यांना खूप सहकार्य केले होते. भारतीय सैन्यानेही त्यासाठी खूप परिश्रम घेतले होते. लडाखच्या पहाडी भागांत तैनात असलेल्या सैनिकांना प्रथम चिनी सैनिक हळूहळू अतिक्रमण करत पुढे येत असल्याची खबर मिळते. ती ब्रिगेडर सिंग (जयंत) यांना कळते, ते मेजर रणजीत सिंग (बलराज साहनी) यांना आपल्या चौक्या सुरक्षित करण्यासाठी पाठविण्याचे आदेश देतात. इथूनच संघर्षाला सुरुवात होते. सैनिक पुढील आदेशाची वाट पाहत असतात. विवादित क्षेत्राचा चिनने दावा केलेला असतो. भारतीय सैन्याला प्रथम गोळी न चालवण्याचे आदेश दिलेले असतात. (जब तक उनकी तरफ से गोली नही चलती, हम गोली नही चलायेंगे). चिनी सैनिक भारतीय सैन्याला घेरण्यासाठी पुढे येत असतात, पूर्ण घेरेपर्यंत भारताकडून गोळीबार होत नाही. त्यानंतर चीनकडून गोळीबाराला सुरुवात होते. सैनिकांची संख्या व दारूगोळ्याचा तुटवडा यामुळे भारतीय सैनिक मागे जाऊ लागतात, पण थंडीचे दिवस व डोंगराळ भाग यामुळे परिस्थिती प्रतिकूल होते. सुरक्षित मागे जायला न मिळाल्याने व समोरचे सैनिक बंदुकीच्या टप्प्यात येऊनही त्यांच्यावर गोळी न मारण्याचे आदेश असल्याने भारतीय असंख्य सैनिक मारले गेले. अद्ययावत शस्त्रे नसल्याने अनेक सैनिक केवळ अवजड रायफली घेऊन लढत होते व बळी जात होते. चौफेर सीमारेषेवर चालू असलेल्या या युद्धात केवळ रेजांगला या एकमेव लढाईत भारताला यश मिळाले होते. ज्यांत १२० भारतीय जवान चीनच्या सुमारे दोन हजार जवानांची लढले होते. त्यात ११४ भारतीय सैनिक शहीद झाले होते, त्यांनी चीनच्या तेराशे सैनिकांना यमसदनास पाठविले होते. भारतीय मेजर शैतान सिंग हे या १३ कुमाव की अमीर कंपनीचे नेतृत्व करत होते.

युद्ध व शांती या काळात सैनिकांची मानसिकता यांचे चित्रण अतिशय यथार्थ व बेमालूमपणे या चित्रपटाने केले आहे. जवानांची संख्या, आपूर्ति, तोफखाने, हवाई सहायता नसलेले व शून्याखालील तापमान यामुळे बाहेरील शत्रूंपासून आपल्या चौकींचे रक्षण करीत असताना शहीद होणाऱ्या जवानांची असहाय स्थिती याचे सुरेख चित्रण चेतन आनंद यांनी केले होते.

हे युद्ध २० ऑक्टोबर १९६२ पासून नोव्हेंबर १९६२ पर्यंत एक महिना सुरू होते त्यानंतर चीनने २० नोव्हेंबर १९६२ ला एकतर्फी युद्धविराम लागू केला. आपले सैन्य मागे घेतले, पण लडाखमधील अक्साय : चीन या भागावर आपले नियंत्रण कायम ठेवले. ही लढाई थंडीच्या दिवसात सुमारे १४ हजार फूट उंचीवरील डोंगराळ भागात लढली गेली. त्यामुळे दोन्हीकडच्या सैनिकांना रसद पुरविणे अवघड झाले होते. कोणत्याही सामान वाहतुकीच्या सुविधा नव्हत्या, शिवाय हवाई दल व नौसेना यांचा उपयोग या युद्धात करण्यांत आला नव्हता. युद्धाच्या शेवटी चेन्नई भारताच्या ३८ हजार चौरस किलोमीटरच्या भूभागावर अवैध केला आजही अक्षय चीनचा हा भाग चीनच्या नियंत्रणात आहे. या युद्धात भारताचे सुमारे १३४३ सैनिक मारले गेले तर १६९६ सैनिक बेपत्ता झाले चीनचे सुमारे १३०० सैनिक मारले गेल्याचा दावा भारताने केला होता युद्धामध्ये शहीद झालेल्या सैनिकांच्या कुटुंबियांसाठी व त्यांच्या विधवा पत्नीच्या पुनर्वसनासाठी निधी गोळा करण्याचे काम स्वातंत्र्यसैनिक असलेल्या कवी प्रदीप यांनी केले.

भारताच्या युद्धातील पराभवाची मिमांसा करण्यासाठी युद्ध संपल्यावर त्वरित दोन सभासदांची एक चौकशी समिती नेमण्यात आली. त्यात कमांडेड ब्रिगेड पी.एस. भगत यांच्या नेतृत्वाखाली लेफ्टनंट जनरल हँडल्स बुक्स यांचा समावेश होता. त्यांनी दिलेला रिपोर्ट जाहीर न करता तो गुप्त ठेवण्यात आला. कारण या अहवालात पराभवाची सारे जबाबदारी त्यांनी तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहर नेहरू यांच्यावर ठेवली होती. इतकेच नव्हे तर त्या वेळचे राष्ट्रपती एस. राधाकृष्णन यांनीही सरकारवर गंभीर आरोप केले होते. चीनवर सहज विश्वास टाकणे, 'हिंदी चिनी भाई भाई' हा नारा देणे, चीनच्या सीमेवरील हालचालींवर व छोट्या-मोठे हल्ल्यांकडे दुर्लक्ष करणे आदी बाबींचा ठपका नेहरूंवर ठेवण्यात आला होता. याशिवाय युद्धापूर्वी तीन वर्षे अगोदर सीमेवरच्या हिंसक हालचाली लडाख, कोणाकाला या चौक्यांवर चीनने केलेल्या रक्तपात, या महत्त्वाच्या बाबींकडे दुर्लक्ष करण्यात आले होते. १९५७ पासून संरक्षण मंत्री असलेल्या कृष्णमेनन यांचे प्रमुख जनरल के. एस. थीमय्या व सेना प्रमुख जनरल थापर यांच्याशी वादविवाद होत होते, पण जाहीरपणे त्याला विरोध करणे शक्य नव्हते, काँग्रेसमध्येही कृष्णमेनन यांना पदावरून दूर करण्याचा आग्रह धरण्यात आला होता, शेवटी नेहरूंनी सात नोव्हेंबर १९६२ रोजी कृष्ण मेनन यांना पदावरून दूर केले. लेफ्टनंट जनरल शंकरराव थोरात हे भारतीय दलातील अत्यंत पराक्रमी दूरदर्शी ज्येष्ठ अधिकारी होते, त्यांनी दुसऱ्या महायुद्धातही भाग घेतला होता. थोरात यांचे चीनच्या हालचालींवर लक्ष होते. ऑक्टोबर १९५९ ला चिनी आक्रमणापासून संरक्षण करण्याची एक योजना त्यांनी आखली होती ती जनरल थिमय्या यांना त्यांनी पाठविली. त्यांनी ती योजना कृष्णमेनन यांना दिली, परंतु संरक्षण मंत्र्यांनी ही योजना फेटाळली.या बाबत त्यांनी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांना काहीही कल्पना दिली नाही. त्यामुळे पंतप्रधान जवाहर नेहरू यांनी जनतेची जाहीर माफी ही मागितली होती. ''जनरल थोरात यांचा हा अहवाल मी जर पाहिला असता तर मी युद्ध होऊ दिले नसते व असंख्य सैनिकांचे प्राण वाचले असते.'' असे त्यांनी शेवटी कबूल केले.

'हकीकत' या चित्रपटाच्या शेवटी युद्धभूमीवर शहीद झालेल्या असंख्य सैनिकांच्या प्रेतांवरून कॅमेरा फिरतो व तो युद्धाची दाहकता दाखवतो. त्याच वेळी 'कर चले हम फिदा जानो तन साथियो, अब तुम्हारे हवाले वतन साथियो' हे गाणे सुरू होते. चित्रपट संपताना हे गाणे सुरू झाले तरी खुर्चीतून एकही प्रेक्षक थिएटरच्या बाहेर पडत नाही. तो तसाच सुन्न होऊन समोरच्या सैनिकांच्या प्रेतांकडे असहायपणे पाहत राहतो. त्यामुळे 'हकीकत' हा एक दाहक, सुन्न करणारा अनुभव असतो जो खऱ्या देशभक्तांच्या पराक्रमाची गाथा सांगत राहतो.

# स्वातंत्र्य मिळाले...

## पण आपण खरंच स्वतंत्र झालो आहोत का?




**संतोष मंदा लक्ष्मण पाटील**

देशाने विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, उद्योग, शेती, संरक्षण, अंतराळ अशा अनेक क्षेत्रांत मोठी झेप घेतली आहे. जगाच्या पटलावर भारताची ताकद वाढली आहे. आपण चंद्रावर पोहोचलो, डिजिटल क्रांती केली, जगातील मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये स्थान निर्माण केले. पण या सगळ्या प्रगतीच्या गर्दीत एक प्रश्न मात्र आजही मनाला अस्वस्थ करतो १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला; पण आजचा भारतीय खरंच स्वतंत्र आहे का? हा प्रश्न देशाच्या स्वातंत्र्यावर नाही, तर स्वातंत्र्याच्या अर्थावर आहे. आज आपल्याला मतदानाचा अधिकार आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे. शिक्षणाचा अधिकार आहे. कायद्याने समानतेची हमी दिली आहे. संविधानाने प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला आहे. पण प्रत्यक्ष आयुष्यात प्रत्येक नागरिकाला ही स्वातंत्र्याची अनुभूती मिळते का? गरीब माणूस आजही दोन वेळच्या अन्नासाठी संघर्ष करत असेल, तर तो किती स्वतंत्र आहे? शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबला असेल, तर त्याचे स्वातंत्र्य कुठे आहे? एखाद्या विद्यार्थ्याला गुणवत्तेपेक्षा आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून दूर राहावे लागत असेल, तर त्याचे स्वातंत्र्य कुठे आहे? एखाद्या महिलेला समाजाच्या भीतीमुळे स्वतःचे निर्णय घेता येत नसतील, तर तिचे स्वातंत्र्य किती? एखाद्या सामान्य नागरिकाला आपले काम करून घेण्यासाठी भ्रष्टाचाराला सामोरे जावे लागत असेल, तर तो भ्रष्टाचाराच्या साखळीतून खरोखर स्वतंत्र आहे का? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सत्तेला प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य आपण खरोखर जपले आहे का?

स्वातंत्र्य म्हणजे फक्त परकीय सत्ता हाकलून देणे नव्हे. स्वातंत्र्य म्हणजे भीतीमुक्त समाज. स्वातंत्र्य म्हणजे प्रश्न विचारण्याची हिंमत. स्वातंत्र्य म्हणजे अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची ताकद. स्वातंत्र्य म्हणजे जात, धर्म, भाषा, प्रांत यापलिकडे माणसाला माणूस म्हणून स्वीकारणे. स्वातंत्र्य म्हणजे प्रत्येकाला समान संधी मिळणे.

आज आपण तंत्रज्ञानाच्या युगात जगत आहोत. हातातील मोबाईलने जग आपल्या मुठीत आले आहे. सोशल मीडियामुळे प्रत्येकाला व्यक्त होण्याचे व्यासपीठ मिळाले आहे. पण दुर्दैवाने याच माध्यमातून द्वेष, अफवा, ट्रोलिंग आणि समाजात फूट पाडणारी भाषा देखील वाढताना दिसते. आपण माहितीच्या महासागरात जगत असताना विवेक मात्र हरवत चालला आहे. आपण विकासाच्या शर्यतीत पुढे जात असताना माणसातला माणूस मागे पडत आहे. शेजाऱ्याच्या घरात दुःख असताना त्याची विचारपूस करण्यासाठी वेळ नाही; पण सोशल मीडियावर एखाद्या अनोळखी व्यक्तीच्या पोस्टवर प्रतिक्रिया देण्यासाठी वेळ आहे. समाजातील अन्याय दिसतो, पण आपण गप्प राहतो. कारण आपल्याला भीती वाटते, आपल्याला काय करायचे? हीच मानसिकता खऱ्या स्वातंत्र्यासाठी धोकादायक आहे. ज्यांनी १९४७ पूर्वी स्वातंत्र्यासाठी लढा दिला, त्यांच्याकडे आजच्यासारखी साधने नव्हती. ना सोशल मीडिया, ना आधुनिक तंत्रज्ञान, ना इतकी साधनसंपत्ती. पण त्यांच्याकडे एक गोष्ट होती देशासाठी काहीतरी करण्याची जिद्द. आज साधने आपल्याकडे भरपूर आहेत; पण समाजासाठी उभे राहण्याची इच्छाशक्ती कमी होत चालली आहे. आपण स्वातंत्र्याचा उत्सव मोठ्या दिमाखात साजरा करतो. तिरंगा फडकवतो, राष्ट्रगीत म्हणतो, देशभक्तीपर घोषणा देतो. हे आवश्यक आहे. पण स्वातंत्र्यदिन फक्त एका दिवसाचा उत्सव नसावा. १५ ऑगस्ट हा आत्मपरीक्षणाचा दिवस असायला हवा. आपण स्वतःला विचारायला हवे मी माझ्या देशासाठी काय करतोय? मी संविधानाचा आदर करतोय का? मी दुसऱ्याच्या स्वातंत्र्याचा आदर करतोय का? मी अन्याय पाहून गप्प बसतोय का? मी जात-धर्माच्या नावावर माणसांमध्ये भिंती उभ्या करतोय का? मी माझ्या मुलांना केवळ स्पर्धा शिकवतोय की माणुसकीही शिकवतोय का? देश स्वतंत्र झाला आहे; पण समाजाला अजूनही अनेक मानसिक गुलामगिरीच्या बेड्या तोडायच्या आहेत. जातीय अहंकाराची गुलामगिरी, अंधश्रद्धेची गुलामगिरी, भ्रष्टाचाराची गुलामगिरी, व्यसनांची गुलामगिरी, द्वेषाची गुलामगिरी, असमानतेची गुलामगिरी. आणि सर्वात मोठी मला काय त्याचे? या मानसिकतेची गुलामगिरी. खरे स्वातंत्र्य तेव्हाच पूर्ण होईल, जेव्हा देशातील शेवटच्या माणसालाही वाटेल की हा देश माझा आहे, या देशात माझा आवाज महत्त्वाचा आहे आणि मला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्यासाठी रक्त दिले.

**स्वातंत्र्य म्हणजे कोणाच्याही अनावश्यक बंधनाशिवाय, दबावाशिवाय किंवा नियंत्रणाशिवाय जगण्याची, विचार करण्याची आणि वागण्याची मुभा होय. यात परकीय वा इतर शक्तींच्या गुलामगिरीतून मुक्ती आणि स्वत:चे निर्णय घेण्याचा अधिकार सामाविष्ट आहे.**

**१५ ऑगस्ट १९४७... हा दिवस भारतीयांच्या इतिहासातील सुवर्णाक्षरांनी लिहिलेला दिवस. शेकडो वर्षांच्या परकीय सत्तेच्या जोखडातून भारत मुक्त झाला. असंख्य स्वातंत्र्यसैनिकांनी तुरुंगवास भोगला, लाठ्या-काठ्या खाल्ल्या, गोळ्या झेलल्या, संसार उद्ध्वस्त झाले, अनेकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, चंद्रशेखर आझाद, नेताजी सुभाषचंद्र बोस, महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, सरदार वल्लभभाई पटेल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अशा असंख्य ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांच्या संघर्षातून आपल्याला स्वातंत्र्य मिळाले. त्या काळातील प्रत्येक भारतीयाच्या मनात एकच स्वप्न होते आपला देश स्वतंत्र असावा, आपल्या माणसाला सन्मानाने जगता यावे आणि आपल्या भवितव्याचा निर्णय आपण स्वत: घ्यावा. आज ७९ वर्षे उलटून गेली आहेत.**

आता त्यांच्याप्रती खरी श्रद्धांजली म्हणजे फक्त त्यांच्या प्रतिमेला हार घालणे नव्हे. त्यांनी ज्या भारताचे स्वप्न पाहिले, तो भारत घडवण्याची जबाबदारी स्वीकारणे हीच खरी श्रद्धांजली आहे. म्हणून यंदा १५ ऑगस्टला तिरंगा हातात घेताना एक प्रश्न स्वतःला नक्की विचारा

भारत स्वतंत्र झाला... पण माझ्या मनातील, माझ्या समाजातील आणि माझ्या देशातील प्रत्येक माणूस खरोखर स्वतंत्र झाला आहे का? जर या प्रश्नाचे उत्तर अजूनही पूर्णपणे होय असेलच असे नाही, तर आपला स्वातंत्र्याचा प्रवास अजून संपलेला नाही. कारण परकीय सत्तेपासून मिळालेले स्वातंत्र्य ही सुरुवात होती; पण अन्याय, भीती, भेदभाव, भ्रष्टाचार आणि मानसिक गुलामगिरीपासून मिळणारे स्वातंत्र्य ही खरी मंजिल आहे.

**जय हिंद!**
**जय संविधान!**
**वंदे मातरम!**

# स्वातंत्र्याचे मोल



**अरविंद सं. मोरे**

मानवी मूल्य किंवा स्थिती दुसऱ्यांच्या शक्तीने प्रतिबंध न होता स्वमर्जी प्रमाणे वागण्याची क्षमता. स्वातंत्र्य म्हणजे स्वतंत्रतेची आणि स्वायत्ततेची गरज, निवड, सृजन, निर्मिती शोध घेण्याची क्षमता आणि स्वत:ला मुक्तपणे अभिव्यक्त करणे, पर्याय निवडण्याकरिता अप्रतिबंधित असल्याचा विश्वास, आयुष्य आणि अनुभव स्वच्छंदपणे जगण्याकरिता पुरेसे स्वविश्व आणि इच्छा म्हणजे स्वातंत्र्य होय.

स्वातंत्र्य म्हणजे कोणत्याही परक्या नियंत्रणातून, गुलामगिरीतून किंवा बंधनातून मुक्ती मिळविणे होय. यामध्ये व्यक्तीला किंवा समाजाला स्वत:चे निर्णय घेण्याचे, स्वत:चे विचार मोकळेपणाने मांडण्याचे आणि स्वत:च्या मर्जीने जगण्याचे अधिकार मिळतात. साध्या शब्दात सांगायचे तर, स्वत:च्या पायावर उभे राहून जगणे आणि योग्य ते स्वातंत्र्य उपभोगणे म्हणजे स्वातंत्र्य.

स्वातंत्र्याचे बरेच प्रकार आहेत. परंतु त्यात मुख्य दोन प्रकार आहेत. ते म्हणजे राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि व्यक्तिगत स्वातंत्र्य. राष्ट्रीय स्वातंत्र्य एका देशाने दुसऱ्या देशाच्या राजवटीतून किंवा गुलामगिरीतून मिळवलेले सार्वभौमत्व. जसे की, १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला ब्रिटिश राजवटीतून मिळाले. व्यक्तिगत स्वातंत्र्य प्रत्येक माणसाला स्वत:चे आयुष्य जगण्याचा, स्वत:चे मत मांडण्याचा आणि स्व:चे निर्णय घेण्याचा अधिकार असणे. स्वातंत्र्याचे महत्व काय तर माणसाला स्वत:ची ओळख निर्माण करता येणे होय. विचारांची देवाणघेवाण आणि विकास होणे होय. आपण व समाज मोकळा श्वास घेऊ शकतो म्हणजे स्वातंत्र्य होय.

व्यक्तिस्वातंत्र्य असण्याचा मुख्य अर्थ म्हणजे समाजात त्याला मान्यता असणे. एखाद्याचे विचार कितीही वेगळे असले, वागणे कितीही विक्षिप्त किंवा अप्रचलित असले तरी, आपल्याला थेट इजा पोचत नसले तर भावना दुखावण्याचा नावाखाली अशा वेगळेपणाला न अडवण्याची स्वतंत्रवादी संस्कृती समाजाने किती स्वीकारली आहे यावर त्या समाजातील स्वातंत्र्य खऱ्या अर्थाने अवलंबून असते.

आज आपण आपल्या देशात मुक्तपणे विहार करतो. एका राज्यातून दुसऱ्या राज्यात जाऊ शकतो. कारण काय तर आपण स्वातंत्र्य आहोत. आपला देश स्वातंत्र्य आहे. स्वातंत्र्याचे मोल काय आहे हे तेच सांगू शकतात ज्यांनी पारतंत्र्यात जन्म घेतला आणि ज्यांनी पारतंत्र्य बघितले आहे. आपल्याला जे स्वातंत्र्य मिळाले अर्थात ते सहजासहजी मिळाले नाही ह्यात काही दुमत तर नाहीच. ह्यासाठी बरीच आंदोलनं बऱ्याच जणांना आपल्या प्राणांची आहुती द्यावी लागली. फार हालअपेष्टा स्वतंत्रविरांना सोसाव्या लागल्यात हे सगळ्यांना माहीतच आहे.

आजच्या स्वातंत्र्य दिनी ज्यानी-ज्यानी आपल्या प्राणांची आहुती दिली, तुरुंगवास भोगला त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. त्यांना खऱ्या अर्थाने स्वातंत्र्याचे मोल माहित आहे. आज देश स्वातंत्र्य होऊन ७९ वर्ष झालीत आणि आपण आता ८० व्या वर्षात पदार्पण करीत आहोत. देशाच्या जडणघडणीत ८० वर्षाचा टप्पा हा खूप महत्वपूर्ण आहे. ह्या ७९ वर्षात आपण काय मिळविले आणि काय गमावले ह्याचा लेखाजोखा मांडण्याचा दिवस हा उत्सव व ह्यावर उहापोह करण्याचा दिन आहे. ह्या ७९ वर्षात आपल्या देशाने खूप प्रगती केली ही कौतुकास्पद बाब आहे. ज्या देशात असे म्हणतात सुईचे पण उत्पादन होत नव्हते तो देश आज प्रगतीपथावर आहे आणि आत्मनिर्भर होण्याच्या मार्गावर आहे. इतर देशाची तुलना केल्यास अजून बरेच काही करण्याचे बाकी आहे असे दिसून येते. आपण इंग्रजांच्या जोखडातून मुक्त झालो ही चांगली बाब आहे. परंतु अजून बराच पल्ला गाठायचा आहे. दोन-चार लोकं किंवा एखादा समूह प्रगत झाला म्हणजे देश प्रगत झाला असे होत नाही. राष्ट्राच्या शेवटच्या माणसाचा विकास झाला किंवा त्याच्या पर्यंत विकासधारा पोहचली म्हणजे देशाची प्रगती झाली किंवा देश स्वातंत्र्य झाला असे म्हणता येईल.

देश स्वातंत्र्य झाला तेव्हा लोकशाहीर अण्णाभाऊ साठे म्हणाले होते, ''यह आझादी झूठी है, देश की जनता भुखी है'' म्हणजेच काय तर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे म्हणतात देशात तेव्हा खूपच गरिबी होती. गरिबांपर्यंत प्रगती पोहचली नव्हती. बहुतांश लोकं आता १५ ऑगस्ट १९४७ नंतरच जन्मलेले आहेत. त्यांना आपण स्वातंत्र्यच आहोत आणि हे असंच असत हे त्यांना माहित आहे. पारतंत्र्य काय असतं हे त्यांनी बघितलेच नाही म्हणून कदाचित त्यांना त्यांचे मोल जाणवत नसेल.

मात्र महात्मा गांधी, भगत सिंग, सुभाषचंद्र बोस, सरदार वल्लभभाई पटेल, सुखदेव, आदी स्वातंत्र्यवीरांनी देश स्वातंत्र्यासाठी आंदोलनं उभी केली व आपल्या प्राणांची आहुती सुद्धा दिली व त्यामुळेच आपल्या भारत देशाला स्वातंत्र्य मिळू शकले. इंग्रज व्यापार करण्यासाठी आले आणि आपल्यात दुफळी तयार करून जवळपास दीडशे वर्षे राज्य केले. अगदी त्याच धर्तीवर आता १९९१ ला नवीन आर्थिक धोरण देशाने स्वीकारले. हा सुद्धा एक मुक्त व्यापाराचा भाग आहे. परकीय बँका भारतात येणार व्यवसाय करणार आणि अनमोल देशाची संपत्ती आपल्या ताब्यात घेणार ही सुद्धा मोठी धोक्याची घंटा आपल्या बहुमूल्य मिळालेल्या स्वातंत्र्यावर येणार ह्याची मोठी भीती वाटते. आपण वेळीच दखल घेण्याची आज गरज आहे.

देश स्वातंत्र्य झाला पण आपल्याला खरे स्वतंत्र हे उच्च-नीच्चते पासून, भेदभावापासून, जाती पाती पासून, महागाई पासून, बेरोजगारी पासून, भूकमारी पासून, भांडवलशाही पासून, भष्ट्राचारी राजकारण्यांपासून मिळाले आहे का ? ज्यांच्यासाठी स्वात्रंसेनानींनी आंदोलन केले होते आपल्या प्राणांची आहुती दिली होती ? तर ह्याचे उत्तर हे नक्कीच नकारार्थी आहे.

आपल्या भारत देशाला मोठ्या प्रमाणात तरुणाई लाभलेली आहे ही खरोखर अभिमानाची आणि भाग्याची बाब आहे. ही तरुणाई फक्त तरुणच नाही तर ती तंत्रज्ञानाने सक्षम आणि पारंगत सुद्धा आहे. ही खरी आपल्यासाठी जमेची बाब आहे. ह्या तरुणाईला त्यांच्या क्षमतेप्रमाणे काम दिले तर ते नक्कीच संपूर्ण विश्वात आपल्या देशाचे नावं रोशन करतील व आपल्या देशाचेच काय संपूर्ण जगावर आपला झेंडा सर्व क्षेत्रात मोठ्या अभिमानाने फडकवतील एव्हढी क्षमता आणि विश्वास आपल्या तरुणाईवर आहे. आपल्याला खरंच स्वातंत्र्य टिकवून ठेवायचे असेल व स्वाभिमानाने जगायचे असेल तर आपल्याला संविधानाची पक्की कास धारावी लागेल तरच आपण आपल्या देशाचे स्वातंत्र्य अबाधित राखू शकू. स्वातंत्र्य दिनाच्या सर्वांना खूप खूप शुभेच्छा !

## सैर धोकादायक विमानतळांची

विमान आकाशात भरारी घेत असताना आणि धावपट्टीवर उतरत असताना मनात थोडी धाकधूक असते. जगभरातल्या सुंदर, गजबजलेल्या विमानतळांबद्दल तुम्ही ऐकलं असेल. पण काही विमानतळ खूपच धोकादायक आहेत. इथे विमान उतरवताना पायलटचं कौशल्यं पणाला लागतं. चला तर मग, अशाच काही धोकादायक विमानतळांची माहिती घेऊ.

र कॅरेबियन बेटांवरच्या 'सबा आयलंड' येथील विमानतळाची धावपट्टी खूपच लहान आहे. फक्त १३०० फूट लांबीच्या धावपट्टीवर विमान उतरवावं लागतं. या धावपट्टीजवळच उतार आहे. या उताराच्या पुढे थेट समुद्र आहे. याच कारणामुळे हा विमानतळ खूप धोकादायक आहे.

र तिबेटमधला 'क्यामडो बामडा' विमानतळ जगातला सर्वात उंचीवरचा विमानतळ आहे. हा विमानतळ जवळपास १४ हजार फूट उंचीवर वसला आहे. या विमानतळावरच्या धावपट्टीची लांबी ३.५ मैल आहे. इथे विमान उतरवण्यासाठी पायलटला बरीच कसरत करावी लागते.

र अंटार्टिका खंड बर्फाने आच्छादलेला असतो. इथे 'आईस रन वे' आहे. या ङ्गरन वेङ्खवर नेहमी बर्फ पडलेला असतो. बर्फ पडलेल्या रन वेवर विमान उतरवणं किती



कठीण असेल याची आपण कल्पनाच करू शकतो. इथल्या बर्फात विमानाचं चाक रूतू नये याची काळजी पायलटला घ्यावी लागते. अंटार्टिकावर बरंच संशोधन सुरू असतं. त्यासाठी संशोधकांना घेऊन येणारं विमान या 'आईस रन वे'वर उतरतं.

**ॲडव्हेंचरस...**

र नेपाळमधला 'तेंझिंग-हिलरी' विमानतळ असाच अनोखा आहे. जगातलं सर्वात उंच असं 'माउंट एव्हरेस्ट' शिखर सर करण्यासाठी बरेच गिर्यारोहक नेपाळमध्ये येतात. हे गिर्यारोहक याच विमानतळावर उतरतात. हा विमानतळ त्यांच्या स्वागतासाठी सज्ज असतो. या भागात जोरदार वारे वाहत असतात. तसंच भरपूर धुकंही असतं. यामुळे हा विमानतळ बराच धोकादायक ठरतो.

र जिब्राल्टरच्या विमानतळाबद्दल ऐकल्यावर तुम्हाला धक्काच बसेल. या विमानतळावर सतत वर्दळ असते. हा विमानतळ इथल्या मुख्य रस्त्याच्या मध्यभागी आहे. विमानाचं उड्डाण होत असताना तसंच विमान उतरत असताना रस्त्यावरची वाहतूक थांबवली जाते. असं असूनही आजवर इथे मोठा अपघात झालेला नाही. रस्त्याच्या मध्यभागी असणारा हा विमानतळ अनोखाच म्हटला पाहिजे.

## हिरवाईने नटले वाळवंट!

निसर्गाने मानवाला दिलेली सर्वात मोठी आणि मोलाची देणगी म्हणजे 'झाडे'. झाडे आपल्या परिसंस्थेचा कणा आहेत, जी पृथ्वीवर समतोल राखण्याचे अतिशय महत्त्वाचे काम करतात. परंतु मानवी उपद्व्यापामुळे आणि निसर्गाच्या अनिर्बंध वापरामुळे अनेकदा गंभीर पर्यावरणीय संकटे ओढवतात. याचे एक ज्वलंत उदाहरण म्हणजे कझाकिस्तान आणि उझबेकिस्तानच्या सीमेवर असलेला 'अराल समुद्र'. १९६०च्या दशकापासून शेतीच्या विकासासाठी, विशेषतः पाण्याचा प्रचंड उपसा करणाऱ्या कापूस पिकासाठी या समुद्राच्या पाण्याचा अनिर्बंध वापर करण्यात आला. या अयोग्य धोरणामुळे एके काळी भरभराट होणारा तो समुद्र हळूहळू एका भयंकर वाळवंटात बदलला. पाण्याचा अपघाती ऱ्हास झाल्यामुळे अनेक जलचर नष्ट झाले, स्थानिक कोळ्यांचा रोजगार बुडाला आणि उघड्या पडलेल्या क्षारयुक्त व विषारी पागोळ्यामुळे संपूर्ण भागात आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला.



या भयानक समस्येवर मात करण्यासाठी जेव्हा मानवाने आणि पर्यावरणतज्ज्ञांनी पुढाकार घेतला, तेव्हा उपचाराचा एकच प्रभावी मार्ग समोर आला आणि तो म्हणजे 'वृक्षारोपण'. अराल समुद्राच्या या भीषण वाळवंटीकरणात युरोपीय युनियनने मध्यस्थी करून त्या भागात तब्बल २७,००० झाडे लावली. या झाडांनी खऱ्या अर्थाने चमत्कार घडवला. झाडांच्या खोलवर गेलेल्या मुळांनी सैल माती घट्ट धरून ठेवली, ज्यामुळे धूळ आणि मातीची धूप थांबली. या झाडांनी सेंद्रिय आम्ल सोडले, ज्यामुळे मातीचा 'पीएच' पुन्हा संतुलित झाला आणि शेतीमधील विषारी अवशेष नष्ट झाले. झाडांच्या बाष्पोत्सर्जन प्रक्रियेमुळे स्थानिक हवेत आर्द्रता वाढली, ज्यामुळे टप्प्याटप्प्याने कोरडा लरीळप ओलावा मिळवू लागला आणि तेथे एक नवीन सूक्ष्म हवामान तयार झाले. आशिया खंडातच नाही तर दुसरीकडे चीननेही गोबी वाळवंट रोखण्यासाठी 'द ग्रेट ग्रीन वॉल' हा जगातील सर्वात मोठा पर्यावरणीय प्रकल्प राबवला. चीनने कोट्यवधी झाडे लावून लाखो हेक्टर नापीक जमीन व वाळवंट पुन्हा हिरवेगार केले.

**वाचा तर खरं**

या सर्व घटनांमधून आपल्याला झाडांचे अफाट महत्त्व समजते. झाडे ही केवळ सावली देणारे किंवा फळे देणारे वनस्पती नाही तर ती वसुंधरेचे आरोग्य सुधारणारे 'पर्यावरणीय जादूगार' आहेत. आपण दैनंदिन जीवनात अनेकदा झाडांकडे दुर्लक्ष करतो, त्यांची कत्तल करतो आणि निसर्गाचा समतोल बिघडवतो. परंतु, आता वेळ आली आहे की आपण डोळे उघडून झाडांचे महत्त्व समजून घेतले पाहिजे. प्रत्येक नागरिकाने केवळ झाडे लावण्याची नव्हे, तर ती जगवण्याची जबाबदारी घेतली पाहिजे. जर आपण आज झाडे जपली, तरच उद्याची पृथ्वी हिरवीगार, सुंदर आणि मानवी जीवनासाठी सुरक्षित राहू शकेल. म्हणूनच झाडे वाचवणे आणि त्यांचे संगोपन करणे हाच आपल्या अस्तित्वाचा एकमेव मार्ग आहे.

## 'थ्रीडी प्रिंटिंग'मुळे वन्यजीवन सुकर

मानवाच्या शरीराचे जखमी किंवा गमावलेले अवयव कृत्रिमरीत्या तयार करून बसवण्याचे 'प्रोस्थेटिक्स' तंत्रज्ञान आजच्या काळात वेगाने प्रगत होत आहे. या अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाचा लाभ आता केवळ मानवापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर संशोधक आणि वन्यजीव प्रेमी जखमी वन्यजीवांच्या उपचारासाठीही याचा यशस्वी वापर करत आहेत. विशेषतः पक्ष्यांच्या दुखापतग्रस्त चोची आणि पाय यांच्यावर मात करण्यासाठी आता '३डी प्रिंटिंग' तंत्रज्ञानाचा आधार घेतला जात आहे. 'ब्युटी' नावाच्या एका जखमी बाल्ड ईगल (गरुड) ला कृत्रिम चोच बसवल्याची थरारक आणि प्रेरणादायी घटना याचे उत्तम उदाहरण आहे. वन्यजीव संरक्षणाच्या क्षेत्रात या नवीन तंत्रज्ञानाचा प्रवेश म्हणजे वन्यजीव वैद्यकशास्त्राचे एक नवे आणि आशादायक पर्व मानले जात आहे.

**चमत्कार**



थ्रीडी प्रिंटिंग तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्राण्यांच्या शरीराच्या आकाराशी अगदी तंतोतंत जुळणारे कृत्रिम अवयव तयार करणे आता शक्य झाले आहे. अपघात, शिकार किंवा इतर कारणांमुळे ज्या वन्यजीवांचे अवयव निकामी झाले आहेत, त्यांना या तंत्रज्ञानामुळे पुन्हा एकदा नैसर्गिक जीवन जगण्याची नवी संधी मिळत आहे. उदाहरणार्थ, चोच तुटल्यामुळे स्वतःहून अन्न खाणे अशक्य झालेल्या पक्ष्यांना ३डी प्रिंटेड चोची बसवल्यामुळे ते पुन्हा स्वावलंबी बनतात. पारंपारिक उपचारांच्या मर्यादा ओलांडून हे तंत्रज्ञान वन्यजीवांच्या पुनर्वसनासाठी एक वरदान ठरले आहे. जगभरातील प्राणीप्रेमी, पशुवैद्यक आणि तंत्रज्ञ एकत्र येऊन या दिशेने नवनवीन प्रयोग करत आहेत, ज्यामुळे अनेक धोक्यात आलेल्या किंवा दुखापत झालेल्या वन्यजीवांचे प्राण वाचवणे शक्य होत आहे. वन्यजीव वैद्यकशास्त्रातील ही प्रगती मानवी बुद्धिमत्ता आणि तंत्रज्ञानाचा निसर्गाच्या रक्षणासाठी कसा वापर होऊ शकतो, याचे उत्तम उदाहरण आहे. भविष्यात या तंत्रज्ञानाचा विस्तार करून आणखी मोठ्या प्रमाणावर प्राण्यांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्याचे शास्त्रज्ञांचे मनसुबे आहेत. ३डी प्रिंटिंगमुळे केवळ पक्षीच नव्हे, तर इतर दुर्मिळ प्राण्यांच्या शरीराचे कृत्रिम अवयव बनवणे सोपे होईल. मानवाच्या अनिर्बंध हस्तक्षेपांमुळे निसर्गाला आणि वन्यजीवांना होणाऱ्या नुकसानाची भरपाई करण्याचा हा एक प्रामाणिक आणि प्रभावी प्रयत्न आहे. पर्यावरण आणि जैवविविधतेचा समतोल राखण्यासाठी अशा नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर करणे ही काळाची गरज बनली असून, यामुळे जखमी वन्यजीवांच्या चेहऱ्यावर आणि जगण्यात पुन्हा एकदा आनंदाची नवी किरणे परतू लागली आहेत.

## नौदलाविषयी थोडंसं



लष्कर, हवाई दलाप्रमाणेच नौदलही आपल्या संरक्षणासाठी सज्ज असतं. समुद्रमार्गे येणाऱ्या शत्रुला रोखण्याचं काम नौदलाकडे असतं. शत्रूदेशाची प्रमुख बंदरं तसंच नौदलाचे तळ उद्ध्वस्त करण्याची जबाबदारीही नौदलाकडे असते. आपलं भारतीय नौदलही खूप सक्षम आहे. १९७१ मध्ये भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्ध झालं होतं. या युद्धात भारतीय नौदलाने खूप मोठी कामगिरी पार पाडली होती. भारताने या युद्धात विजय मिळवला होता. या विजयाची आठवण म्हणून चार डिसेंबर हा दिवस नौदल दिन म्हणून साजरा केला जातो. भारतीय नौदल जगातलं सातव्या क्रमांकाचं सर्वात मोठं नौदल आहे. आपल्या नौदलाची गणना जगातल्या दहा सक्षम नौदलांमध्ये होते. केरळमध्ये इंडियन नेव्हल अकादमी असून ही आशिया खंडातली पहिल्या क्रमांकाची नौदल अकादमी आहे.

**जनरल नॉलेज**

भारताच्या नौदलाचा इतिहास खूप जुना आहे. मारकॉस किंवा मरीन कमांडोज हे नौदलाचे अत्यंत कुशल अधिकारी समजले जातात. या कमांडोंना सर्वात आव्हानात्मक मोहिमांवर पाठवलं जातं. हे कमांडो वेशांतर करून सर्वसामान्य नागरिकांमध्ये मिसळतात आणि आपली मोहीम फत्ते करून येतात. ङ्गशं नो वरुण:ङ्ख हे आपल्या नौसेनेचं घोषवाक्य आहे. आपलं नौदल सुसज्ज आहे. नौदलाकडे अत्यंत शक्तिशाली युद्धनौका, विनाशिका आणि पाणबुड्या आहेत. २५० पेक्षा अधिक लढाऊ विमानंही आहेत. नौदलात ६७ हजार अधिकारी कार्यरत आहेत.

## कुत्रे वाहनामागे का धावतात?



रस्त्यावर शांत बसलेला कुत्रा अचानक एखाद्या चालत्या बाईक किंवा कारच्या मागे धावताना तुम्ही बघितले असेल. तो फक्त धावतच नाही तर जोरात भुंकतो. पण हे का घडते याचा कधी विचार केला आहे का? कुत्र्याची वास घेण्याची क्षमता माणसांपेक्षा खूप शक्तिशाली असते. ते दुरूनही वास घेऊ शकतात. वाहन दुसऱ्या ठिकाणाहून येते तेव्हा तिथे असणाऱ्या कुत्र्यांचा वास टायरला चिकटतो. वाहन नवीन परिसरात पोहोचताच स्थानिक कुत्रे टायरवरील वेगळ्या जागेचा वास बरोबर ओळखतात. त्यांच्यासाठी हा बाहेरील कुत्र्याने त्यांच्या परिसरात प्रवेश केल्याचा इशारा असतो. म्हणूनच ते लगेच सावध होतात आणि वाहनाचा पाठलाग करू लागतात. असे करुन जणू ते आपल्या सीमेचे रक्षण करत असतात. कुत्रे सहसा वाहनांच्या टायरवर लघवी करतात. हा योगायोग नाही तर हीदेखील त्यांची विशेष भाषा असते. इथे कोणी येऊ नये, हे सांगण्याचा त्यांचा हा प्रयन असतो. कुत्रे अत्यंत संवेदनशील असतात. एखाद्या वाहनाने त्यांच्या साथीदाराला दुखापत केली असेल किंवा त्याला अपघातात मारले असेल तर ते अशा वाहनाला ओळखू शकतात. पुढच्या वेळी ते वाहन दिसते तेव्हा ते कदाचित बदला घेण्यासाठी किंवा रागाच्या भरातही त्या वाहनाचा पाठलाग करतात. कुत्रे सहसा स्थिर वस्तूंकडे दुर्लक्ष करतात, परंतु वेगाने चालणारी किंवा धावणारी कोणतीही गोष्ट त्यांच्यासाठी आव्हान वाटते. शिकारी स्वभावामुळे ते वेगाने चालणाऱ्या वस्तूंचा पाठलाग करू लागतात. म्हणूनच ते चालणाऱ्या माणसांना त्रास देत नाहीत पण दुचाकी किंवा कारचा आवाज आणि वेग त्यामुळे सावध होऊन स्वत:च्या रक्षणाला सिद्ध होतात.

**माहिती असावे**

## काय आहे 'एचएस कोड'

खादीया कापडाबद्दल तुम्ही ऐकलं असेल. खादीचे कुर्ते, साड्या, ड्रेस, शर्ट मोठ्या प्रमाणावर वापरले जातात. खादी म्हणजे भारताची शान. केंद्रिय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने या खादीला 'एचएस कोड' दिला आहे. एचएस कोड म्हणजे नेमकं काय? जाणून घेऊ.

एचएस कोड म्हणजे 'हॉर्मोनाइज्ड सिस्टीम कोड'. हा आंतरराष्ट्रीय कोड आहे. खादीची मागणी, विक्री, खरेदी, निर्मिती आणि प्रसिद्धी वाढवण्यासाठी तसंच जगभरात नवी ओळख निर्माण करण्यासाठी सरकारने हा कोड दिला आहे. एचएस कोड म्हणजे सहा आकडी क्रमांक. 'वर्ल्ड कस्टम ऑर्गनायजेशन' म्हणजे डब्ल्यूसीओकडून अशा प्रकारच्या कोडची निर्मिती केली जाते.

उत्पादनाला परदेशात किती मागणी आहे, उत्पादनाचा किती वापर होतो हे एचएस कोडमुळे कळू शकतं. आज २०० पेक्षा जास्त देश आंतरराष्ट्रीय व्यापारसाठी तसंच जास्तीत जास्त माहिती मिळवण्यासाठी या डाटाचा वापर करतात. सरकारी आणि खाजगी कंपन्या तसंच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संस्थांकडून एचएस कोडचा वापर केला जातो.




## किनारा हरवलेला समुद्र

जगात समुद्र म्हटलं की आपल्या डोळ्यांसमोर किनारा, लाटा, वाळू आणि समुद्रकिनाऱ्यावरची गर्दी उभी राहते. पण कल्पना करा, असा एक समुद्र आहे ज्याला एकही किनारा नाही! तरीही तो जगातील सर्वात वैशिष्ट्यपूर्ण समुद्रांपैकी एक मानला जातो. हा आहे अटलांटिक महासागरातील 'सारगासो समुद्र'. या समुद्राची सीमा जमीन ठरवत नाही, तर महासागरातील प्रचंड समुद्री प्रवाह ठरवतात. गल्फ स्ट्रीम, नॉर्थ अटलांटिक करंट, कॅनरी करंट आणि नॉर्थ इक्वेटोरियल करंट हे चार शक्तिशाली प्रवाह मिळून या समुद्राभोवती नैसर्गिक वर्तुळ तयार करतात. त्यामुळे हा समुद्र पूर्णपणे पाण्याने वेढलेला असून त्याचा कोणत्याही खंडाशी थेट किनारा जोडलेला नाही. एखाद्या चित्रपटातील गूढ बेटाप्रमाणे हा समुद्र वाटतो. जहाज अनेक दिवस प्रवास करत राहिले तरी दूरवर जमीन दिसत नाही. वरून पाहिल्यास हा समुद्र शांत आणि निळाशार दिसतो; पण त्याच्या पृष्ठभागावर तरंगणाऱ्या सोनेरी-तपकिरी रंगाच्या 'सारगॅसम' नावाच्या समुद्री शेवाळामुळे त्याचे रूप आणखी वेगळे भासते. या शेवाळाचे मोठमोठे तरंगते थर जणू समुद्रात तरंगणारी बेटेच तयार करतात. त्यामुळे हा समुद्र केवळ भौगोलिकदृष्ट्या नव्हे, तर दृश्यदृष्ट्याही पृथ्वीवरील सर्वात अनोख्या ठिकाणांपैकी एक मानला जातो.




पहिल्या नजरेत हा समुद्र रिकामा वाटतो, पण त्याच्या या तरंगत्या शेवाळात जीवसृष्टीची अक्षरशः गजबजलेली दुनिया दडलेली आहे. असंख्य लहान मासे, खेकडे, कोळंबी, विविध सूक्ष्म सागरी जीव आणि लहान समुद्री कासवे यांना हे शेवाळ सुरक्षित आश्रय देते. अनेक सागरी प्राण्यांसाठी हा समुद्र म्हणजे बालपण घालवण्याची नैसर्गिक शाळाच आहे. जगातील दोन प्रसिद्ध जातींचे मासे, युरोपियन ईल आणि अमेरिकन ईल, आपल्या जीवनाची सुरुवात याच समुद्रात करतात. त्यांची पिल्ले हजारो किलोमीटरचा अविश्वसनीय प्रवास करून युरोप आणि उत्तर अमेरिकेतील नद्यांमध्ये पोहोचतात, तिथे मोठी होतात आणि काही वर्षांनी पुन्हा याच समुद्रात परत येऊन प्रजनन करतात. विशेष म्हणजे एवढ्या विशाल महासागरात त्यांना नेमका हाच भाग कसा सापडतो, हे कोडे आजही शास्त्रज्ञ पूर्णपणे उलगडू शकलेले नाहीत. म्हणूनच सारगासो समुद्राला समुद्रातील सर्वात रहस्यमय ठिकाणांपैकी एक मानले जाते. अनेक संशोधक आजही या समुद्रातील जीवसृष्टी, त्यांचे स्थलांतर आणि समुद्री प्रवाह यांचा सातत्याने अभ्यास करत आहेत. त्यामुळे हा समुद्र विज्ञानासाठी एखाद्या जिवंत प्रयोगशाळेपेक्षा कमी नाही.

**अजब-गजब**

सारगासो समुद्राचे महत्त्व केवळ सागरी जीवांपुरते मर्यादित नाही. पृथ्वीच्या हवामानावरही त्याचा मोठा प्रभाव पडतो. हा समुद्र वातावरणातील उष्णता आणि कार्बन डायऑक्साइड मोठ्या प्रमाणावर शोषून घेतो. त्यामुळे जागतिक तापमानाचा समतोल राखण्यास आणि अटलांटिक महासागरातील पाण्याच्या हालचाली नियंत्रित करण्यास त्याची मदत होते. मात्र, या सुंदर आणि गूढ समुद्रावरही आता प्रदूषणाचे सावट आले आहे. समुद्री प्रवाहांमुळे प्लास्टिकचा कचरा, मासेमारीची जाळी आणि सूक्ष्म प्लास्टिकचे कण येथे मोठ्या प्रमाणात जमा होत आहेत. त्याचबरोबर हवामान बदलामुळे समुद्राचे पाणी अधिक उष्ण, अधिक आम्लीय आणि ऑक्सिजनच्या दृष्टीने गरीब होत असल्याचे संशोधनातून दिसून आले आहे. याचा परिणाम तेथील नाजूक परिसंस्थेवर होत आहे. पृथ्वीवर असा किनाऱ्याशिवायचा समुद्र फक्त एकच आहे आणि म्हणूनच त्याचे संरक्षण करणे ही संपूर्ण जगाची जबाबदारी आहे. नकाशावर तो फक्त निळ्या रंगाचा एक भाग दिसत असला, तरी प्रत्यक्षात तो असंख्य जीवांचे घर, हवामानाचा महत्त्वाचा आधार आणि निसर्गाने जपलेला एक अद्भुत चमत्कार आहे. एखाद्या साहसपटातील रहस्यमय जगासारखा भासणारा हा समुद्र आपल्याला निसर्गात अजून किती अनोखी रहस्ये दडलेली आहेत, याची जाणीव करून देतो.

### दोस्त हे मस्त

#### असे हे पक्षी



पक्ष्यांचं जगही अनोखं असतं. आता घुबडाचंच बघा. मागे बघण्यासाठी घुबडाला अंग हलवावं लागत नाही. फक्त मान वळवून तो मागे बघू शकतो. हमिंगबर्ड मागच्या दिशेनेही उडू शकतो. गिधाड सर्वात उंच उडणारा पक्षी आहे. हा पक्षी जवळपास ११,२०० मीटर उंचीवरून उडू शकतो. वूड डकचे पंख रंगीत असतात. नर वूड डकच्या अंगावर पांढरे ठिपके असतात. तसंच त्यांचे डोळे लाल असतात. मादी वूड डकचे डोळे पांढरे आणि शरीर करड्या रंगाचं असतं.

### खादाडी

#### मस्त मोजरेला टोस्ट

संध्याकाळी मोजरेला टोस्ट बनवून खाता येईल. यासाठी एक क्रस्ट ब्रेड, तीन चमचे बटर, एक चमचा ठेचलेला लसूण, अर्धा चमचा मिरपूड, कांद्याची चिरलेली पात, मोजरेला चीज आणि मीठ हे साहित्य घ्या. ब्रेडचे एक इंच आकाराचे तुकडे करून घ्या. यानंतर ब्रेडची एक बाजू भाजून घ्या. न भाजलेल्या भागवर बटर लावा आणि त्यावर मोजरेला चीज क्यूब किंवा स्लाईस ठेवा. त्यावर मिरपूड, मीठ आणि थोडी कांद्याची पात घाला. आता चीज वितळेपर्यंत मायक्रोवेव्हमध्ये ब्रेड बेक करून घ्या. सॉससोबत गरमागरम खा.



### स्टडी टिप्स

#### उगाच पाठांतर करू नका

तुम्ही एकाच विषयाचं सतत पाठांतर करता का, महत्त्वाचे मुद्दे अधोरेखित करता का, यामुळे अभ्यास चांगला होतो, बऱ्याच गोष्टी आपल्या लक्षात राहतात असं तुम्हाला वाटतं का? प्रत्यक्षात अभ्यासाची ही पद्धत चुकीची आहे. अशा पद्धतीने अभ्यास करून काहीच साध्य होत नाही. उलट वेळ वाया जातो. अभ्यास नीट लक्षातही रहात नाही. त्यामुळे सतत एकाच विषयाचा अभ्यास करत बसू नका. विविध विषयांना वेळ वाटून द्या.



### योगा टाइम

#### दृष्टी सुधारा

मुलांनो, मोबाईल आणि कॉम्प्युटरमुळे कमी वयात चष्मा लागतो. लहानग्या मुलांनाही आता चष्मा लागू लागला आहे. दृष्टी सुधारण्यासाठी तुम्ही योगासनं करू शकता. सर्वात आधी मांडी घालून बसा. हळूहळू श्वास घेत रहा. डोळे वर, खाली, डावीकडे आणि उजवीकडे फिरवा. मान सरळ ठेवा. मग मानही सगळ्या बाजूंनी फिरवा. या आसनामुळे डोळ्यांना आराम मिळेल.



# उरणच्या वृतिकाची आंतरराष्ट्रीय भरारी!

■ अवघ्या दहाव्या वर्षी मलेशियात पटकावले रौप्यपदक

■ भारताचा तिरंगा परदेशात अभिमानाने फडकवला



| चौल | प्रतिनिधी |

अवघ्या दहाव्या वर्षी समुद्राच्या लाटांवर स्वार होत उरणच्या नागावची कन्या वृतिका संदीप म्हात्रे हिने आंतरराष्ट्रीय क्रीडा क्षेत्रात भारताचे नाव उज्वल केले आहे. मलेशियातील लंगकावी येथे दि. ४ ते ८ ऑगस्टदरम्यान झालेल्या टेक्नो २९३ आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत वृतिकाने दमदार कामगिरी करत रौप्यपदक पटकावले. आशियातील विविध देशांतील अनुभवी खेळाडूंशी दोन हात करत मिळवलेले हे तिचे पहिले आंतरराष्ट्रीय पदक ठरले आहे. वृतिका ही यॉटिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र आणि यॉटिंग असोसिएशन ऑफ इंडिया यांची सदस्य असून, ती करंजा, उरण येथील नेव्हल चिल्ड्रन्स स्कूलमध्ये इयत्ता पाचवी बमध्ये शिक्षण घेत आहे. लहानपणापासूनच समुद्राशी नाते जोडलेल्या वृतिकाने आपल्या जिद्द, मेहनत, आत्मविश्वास आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर आंतरराष्ट्रीय स्तरावर झेप घेतली. लेशियातील लंगकावी येथील नॅशनल सेलिंग सेंटरमध्ये ही आशियाई अजिंक्यपद स्पर्धा पार पडली. आशियातील विविध देशांतील युवा विंडसर्फिंगपटूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला. या कठीण आंतरराष्ट्रीय स्पर्धेत यू-१३ मुलींच्या गटात वृतिकाने आपल्या कौशल्याची छाप पाडत रौप्यपदक मिळवले. वृतिकाच्या या यशामागे तिचे वडील संदीप हिरा म्हात्रे यांचे मोलाचे योगदान आहे. स्वतः नौदलात कार्यरत असलेल्या संदीप म्हात्रे यांनी वृतिकेच्या प्रशिक्षणासाठी सातत्याने मेहनत घेतली. तिची आई अनिता म्हात्रे या ओएनजीसीमध्ये कार्यरत आहेत. आई-वडिलांचे प्रोत्साहन, प्रशिक्षक संदीप म्हात्रे मार्गदर्शन आणि वृतिकेची प्रचंड मेहनत यामुळेच हे यश शक्य झाले आहे.

### रायगडचे नाव सातासमुद्रापार

उरणच्या या चिमुकल्या खेळाडूने आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करत रायगडच्या क्रीडा क्षेत्राचा नावलौकिक वाढवला आहे. वृतिकेच्या या कामगिरीमुळे रायगड जिल्ह्यातील युवा खेळाडूंना नवी प्रेरणा मिळाली आहे. टेक्नो २९३ हा विशेषतः युवा खेळाडूंसाठी लोकप्रिय असलेला विंडसर्फिंगचा प्रकार असून, वाऱ्याचा वेग व दिशा, समुद्राच्या लाटा, शरीराचा समतोल आणि योग्य डावपेच यांच्या जोरावर खेळाडूला शर्यत पूर्ण करावी लागते.

"आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करून पदक मिळवता आले, याचा मला खूप आनंद आहे. मलेशियातील स्पर्धेचा अनुभव माझ्यासाठी खूप महत्त्वाचा होता. प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि आई-वडिलांचे प्रोत्साहन यामुळे मला आत्मविश्वास मिळाला. भविष्यात आणखी चांगली कामगिरी करून भारतासाठी सुवर्णपदक जिंकण्याचे माझे स्वप्न आहे.
- वृतिका म्हात्रे"

"वृतिकाने मिळवलेले हे पदक आमच्यासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. लहान वयात तिने आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करून रौप्यपदक मिळवले, याचा आनंद शब्दांत व्यक्त करणे कठीण आहे. तिच्या मेहनतीला योग्य दिशा देत तिला भविष्यात आणखी मोठ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी तयार करण्याचा आमचा प्रयत्न राहील. तिच्या या यशामुळे तिच्या पुढील वाटचालीला नवी ऊर्जा मिळाली आहे.
- संदीप म्हात्रे, वृतिकाचे वडील"

## निवडक

### ५३ वर्षांपासून फारुख इंजिनियर यांना पद्मश्रीची प्रतीक्षा



**नवी दिल्ली :** माजी भारतीय यष्टीरक्षक फारुख इंजिनियर यांना पद्मश्री मिळण्याची प्रतीक्षा ५३ वर्षांनंतरही संपलेली नाही.८८ वर्षीय इंजिनियर यांच्या मते, १९७३ मध्ये त्यांना वर्तमानपत्रांद्वारे कळले होते की सरकारने त्यांना पद्मश्रीसाठी निवडले आहे. त्यावेळी ते इंग्लंडमध्ये भारतीय संघासोबत खेळत होते.संघ व्यवस्थापक हेमू अधिकारी यांनीही त्यांना याची माहिती दिली होती. परंतु यानंतर त्यांना सरकारकडून कोणतीही अधिकृत सूचना मिळाली नाही. ना पदक मिळाले, ना प्रमाणपत्र. पद्म पुरस्कारांच्या वेबसाइटवर इंजिनियर यांचे नाव १९७३ च्या पद्मश्री सन्मान प्राप्तकर्त्यांमध्ये नोंदवले आहे. मात्र, यानंतर पुरस्कार त्यांच्यापर्यंत का पोहोचला नाही, याची स्थिती स्पष्ट नाही. आता या प्रकरणी बीसीसीआय सरकारला पत्र लिहिण्याची तयारी करत आहे. इंजिनियर इंग्लंडमध्ये राहतात, पण म्हणतात की भारत त्यांच्या हृदयात आहे. त्यांचे म्हणणे आहे की त्यांना पद्मश्री त्यांच्या घरातील ट्रॉफी कॅबिनेटमध्ये ठेवायची आहे आणि राष्ट्रपती भवनात जाऊन राष्ट्रपतींच्या हस्ते सन्मान स्वीकारायचा आहे.ते म्हणाले की मँचेस्टरच्या ओल्ड ट्रॅफर्ड मैदानावर त्यांच्या आणि क्लाइव्ह लॉयडच्या नावावर स्टँड्स आहेत, पण राष्ट्रपती भवनात पद्मश्री स्वीकारणे त्यांच्यासाठी त्याहूनही मोठा सन्मान असेल.इंजिनिअरने नुकतेच आयसीसीचे अध्यक्ष जय शहा यांच्याकडेही या प्रकरणात मदत मागितली होती. त्यांनी सांगितले की, गेल्या महिन्यात जय शहा यांनी त्यांना मदत करण्याचे आश्वासन दिले होते. यापूर्वी त्यांनी माजी केंद्रीय मंत्री अरुण जेटली यांच्याकडेही या प्रकरणात मदत मागितली होती.

### सिंकफिल्ड चषक बुद्धिबळ स्पर्धा
### प्रज्ञानंद तिसऱ्या फेरीत पराभूत



**सेंट लुईस :** भारताचा ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदला सिंकफिल्ड चषक बुद्धिबळ स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीत जर्मनीच्या व्हिन्सेंट केमरविरुद्ध पराभवाचा सामना करावा लागला. ग्रँड चेस टूरचा भाग असलेल्या या स्पर्धेतील युवा खेळाडूंमधील लढतीत प्रज्ञानंदने कडवी झुंज दिली, परंतु अखेर त्याला पराभव स्वीकारावा लागला. गेल्या काही काळापासून उत्कृष्ट फॉर्ममध्ये असलेल्या प्रज्ञानंदला गेल्या वर्षभरात स्वतःची ओळख निर्माण करणाऱ्या केमरने पराभूत केले. या पराभवामुळे प्रज्ञानंद तीन फेऱ्यांनंतर १.५ गुणांवरच राहिला आहे. ४,७५,००० अमेरिकन डॉलर बक्षीस रक्कम असलेल्या या स्पर्धेत आणखी सहा फेऱ्या शिल्लक असताना प्रज्ञानंद संयुक्तपणे चौथ्या स्थानावर घसरला आहे. दिवसातील सर्वात मोठा विजय फिलिपिन्सच्या वेस्टली सो याने मिळवला. सध्या अमेरिकेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वेस्टली सो याने अमेरिकेच्याच कारुआनाला पराभूत केले. सलग दुसऱ्या विजया सह वेस्टली सो २.५ गुणांसह स्पर्धेत एकमेव आघाडीवर राहिला आहे. त्याच्यापाठोपाठ अर्मेनियातून अमेरिकेत आलेला लेव्हॉन अरोनियन आणि फ्रान्सचा मॅक्सिम वाशिये लाग्राव्ह हे खेळाडू आहेत. आता पुढील फेरीत भारतीय चात्यांना प्रज्ञानंदकडून चमकदार कामगिरी अपेक्षित आहे.

### वुमन्स टी २० आशिया कपसाठी श्रीलंकन संघाची घोषणा



**मुंबई :** वुमन्स टी २० आशिया कप २०२६ स्पर्धेला २८ ऑगस्टपासून सुरूवात होणार आहे. या स्पर्धेत एकूण आठ संघ खेळणार असून श्रीलंकेने आपल्या संघाची घोषणा केली आहे. श्रीलंकन संघ गट ब मध्ये असून पहिला सामना २९ ऑगस्टला होणार आहे. हा सामना यजमान युएई संघाविरुद्ध होणार आहे. श्रीलंकेचा संघ या स्पर्धेत गतविजेता म्हणून उतरत आहे. त्यांनी मागच्या पर्वात भारतीय संघाला पराभूत करून आशिया कप जेतेपद पटकावलं होतं. कर्णधार चमारी अटापट्टू ही श्रीलंकन संघाची ताकद आहे. अष्टपैलू खेळाडू असल्याने फलंदाजी गोलंदाजीतही योगदान देते. तिच्यात सामना एकहाती फिरवण्याची ताकद आहे. संघात इनोका रणवीरा, सुगंधिका कुमारी आणि कविशा दिलहारी या जागतिक दर्जाच्या फिरकीपटू आहेत. आशियाई देशात फिरकीचं महत्त्व असल्याने संघाची ताकद वाढली आहे. त्यात देवमी विहंगा या नव्या लेग स्पिनरची भर पडली आहे. कविशा दिलहारी आणि हर्षिता समरविक्रमा या अष्टपैलू खेळाडू असून संघाला मधल्या फळीत स्थैर्य देण्यास सक्षम आहेत.

# क्रिकेटविश्व हादरलं!; क्रिकेटपटू अटकेत

**खेळाडूंच्या वादात कोचचा मृत्यू**

**पिण्याच्या पाण्यावरून वाद**



| श्रीलंका | वृत्तसंस्था |

भारत आणि श्रीलंका यांच्यातील कसोटी मालिकेआधी श्रीलंकेत धक्कादायक घटना घडली आहे. क्रिकेटच्या मैदानातू एक एक दुःखद बातमी समोर आली आहे. श्रीलंकेत क्रिकेट सामन्यादरम्यान खेळाडूंमध्ये झालेल्या वादानंतर ६२ वर्षीय क्रिकेट प्रशिक्षक सुमित फर्नांडो यांचे निधन झाले. ही घटना कोलंबोमध्ये घडली, जिथे क्रिकेट सामन्यादरम्यान हाणामारी झाली. त्यानंतर प्रशिक्षक सुमित फर्नांडो यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले.

ही घटना कोलंबो येथील ब्लूमफील्ड क्रिकेट अँड ॲथलेटिक क्लबमध्ये घडली. ८ ऑगस्ट रोजी, पिण्याच्या पाण्यावरून दोन खेळाडूंमध्ये वाद झाला. पोलिसांच्या माहितीनुसार, खेळाडू पाणी पिण्यासाठी नळाजवळ गेले, पण नळातून पाणी येत नव्हते. त्यानंतर, प्रशिक्षक आणि खेळाडूंमधील परिस्थिती चिघळली आणि त्यांच्यात वाद झाला.दरम्यान, दोन खेळाडूंमध्ये भांडण झाले, ज्या दरम्यान कथित १७ वर्षीय मुलाने प्रशिक्षक फर्नांडो यांच्यावर हल्ला केला. त्यानंतर फर्नांडो यांना कोलंबो येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या मृत्यूचे नेमके कारण उघड करण्यात आलेले नाही, परंतु तपासात असे समोर आले आहे की प्रशिक्षक फर्नांडो यांना बऱ्याच काळापासून हृदयाचा त्रास होता.

### फर्नांडो हे कुसल मेंडिसचे प्रशिक्षक

सुमित फर्नांडो हे मोराटुवा येथील प्रिन्स ऑफ वेल्स कॉलेजमध्ये माजी क्रिकेट प्रशिक्षक होते. त्यांनी सध्याचा श्रीलंकेचे एकदिवसीय कर्णधार कुसल मेंडिस यांना त्यांच्या शालेय जीवनात प्रशिक्षण दिले होते. त्यांनी शालेय स्तरावर इतर अनेक प्रतिभावान क्रिकेटपटूंनाही प्रशिक्षण दिले. नंतर फर्नांडो यांनी ब्लूमफील्ड क्रिकेट अँड ॲथलेटिक क्लबचे क्युरेटर म्हणून काम पाहिले. सुमित फर्नांडो यांच्यावर गुरुवारी अंत्यसंस्कार करण्यात आले. पोलीस या घटनेचा तपास करत असून, यात सहभागी असलेल्या खेळाडूंची चौकशी करत आहेत.

### श्रीलंकेच्या कोचची हत्या

क्रिकेटच्या मैदानावर झालेल्या हाणामारीनंतर ६२ वर्षीय प्रशिक्षक सुमित फर्नांडो यांचे निधन झाले आहे. या प्रकरणी पोलिसांनी एका १७ वर्षीय शालेय क्रिकेटपटूला अटक केली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, ८ ऑगस्ट रोजी दोन खेळाडूंमध्ये पिण्याच्या पाण्यावरून वाद झाला, ज्याचे रूपांतर नंतर हाणामारीत झाले. यादरम्यान सुमित फर्नांडो जखमी झाले आणि त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान मंगळवारी त्यांचे निधन झाले. या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या १७ वर्षीय खेळाडूला मंगळवारी कोलंबो न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला १७ ऑगस्टपर्यंत बालसुधारगृहाच्या कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

# दिनेश लाड यांना रोटरीचा पुरस्कार प्रदान



| पनवेल | प्रतिनिधी |

भारतीय क्रिकेटला रोहित शर्मा, शार्दूल ठाकूर यांसारखे आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडवणारे प्रख्यात क्रिकेट प्रशिक्षक दिनेश लाड यांना रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१च्या वतीने व्होकेशनल एक्सलन्स अवॉर्ड २०२६ प्रदान करून गौरविण्यात आले. रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१चे प्रांतपाल नितीन ढमाले आणि पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी पीडीजी रोटेरियन डॉ. शैलेश पालेकर यांनी दिनेश लाड यांची प्रकट मुलाखत घेतली. या मुलाखतीत लाड यांनी आपल्या संघर्षमय जीवनप्रवासासह क्रिकेट क्षेत्रातील अनेक प्रेरणादायी अनुभव सांगितले. लाड यांनी सांगितले की, त्यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात कोलगेट कंपनीत नोकरी करून केली. त्यानंतर रेल्वेत खलाशी आणि नंतर लिपिक म्हणून काम केले. पुढे माजी भारतीय क्रिकेटपटू प्रवीण आमरे यांच्या माध्यमातून शाळेत क्रिकेट प्रशिक्षक म्हणून कारकिर्दीची सुरुवात झाली.

गुरुवर्य रमाकांत आचरेकर यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना ते म्हणाले, 'आचरेकर सरांनी मला पांढरा ड्रेस आणि शूज दिले. ते फक्त माझे गुरू नव्हते, तर माझे सर्वस्व आहेत. १९९० मध्ये आचरेकर सरांना हा सन्मान मिळाला होता आणि त्यानंतर तब्बल ३२ वर्षांनी मला हा गौरव मिळाल्याचा आनंद असल्याचे त्यांनी सांगितले. यानंतर प्रांतपाल नितीन ढमाले आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दिनेश लाड यांना व्होकेशनल एक्सलन्स अवॉर्ड २०२६ प्रदान करण्यात आला. याप्रसंगी रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१चे पीडीजी डॉ. गिरीश गुणे, डॉ. दीपक पुरोहित, डॉ. हळदीपुरकर, मंजू फडके, डीजीएन विवेक दीक्षित, नितीन मुळे, उज्वल केले, जिग्नेश पंड्या, सर्व असिस्टंट गव्हर्नर, विविध रोटरी क्लबचे अध्यक्ष आणि मोठ्या संख्येने रोटेरियन्स उपस्थित होते.

### स्टीव्ह स्मिथचा वर्ल्ड रेकॉर्ड!

**नवी दिल्ली :** बांगलादेशचा संघ सध्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर आहे. २ कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिला कसोटी सामना डार्विनमध्ये सुरु आहे. या सामन्यात स्टीव्ह स्मिथ एकटा लढला. स्मिथने ७१ धावांची खेळी करुन संघाची धावसंख्या १५० धावांच्या पार पोहोचवली.

फलंदाजीत दमदार कामगिरी केल्यानंतर आता क्षेत्ररक्षण करतानाही त्याने मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या कसोटीतील पहिल्या डावात क्षेत्ररक्षण करताना त्याने स्लीपमध्ये ३ भन्नाट झेल घेतले.

यादरम्यान लिटन दासचा झेल घेताच त्याने कसोटी क्रिकेटमधील सर्वात मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. स्टीव्ह स्मिथ हा कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक झेल घेणाऱ्या क्षेत्ररक्षकांच्या यादीत संयुक्तरित्या अव्वल स्थानी पोहोचला आहे. या रेकॉर्डमध्ये त्याने दिग्गज खेळाडू जो रुटच्या रेकॉर्डची बरोबरी केली आहे.

**आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त रेड रन स्पर्धा**

### स्वागत पाटील अन् करिष्मा म्हात्रे प्रथम



| रायगड | प्रतिनिधी |

जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग यांचे मार्फत रायगड जिल्ह्यामध्ये आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये अलिबाग समुद्र किनारा येथे जिल्हास्तरीय रेड रन स्पर्धा घेण्यात आली, सदरची स्पर्धा हि ५ किलोमीटर अंतराची असून, त्यामध्ये प्रथम नोंदणी करणाऱ्या १७ ते २५ वयोगटातील १६ मुली व २५ मुले यांनी भाग घेतला.

सदर स्पर्धेस जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांनी हिरवा झेंडा दाखवून प्रथम मुलांची व त्यानंतर मुलींच्या स्पर्धेची सुरुवात करण्यात आली. सदर स्पर्धेमध्ये मुलांमध्ये प्रथम क्रमांक स्वागत समिर पाटील याचा आला असून मुलीमध्ये करिष्मा प्रकाश म्हात्रे प्रथम आली असून त्यांस अनुक्रमे रक्कम रु. २५०० तर द्वितीय क्रमांक मुलामध्ये अक्षय राजा लेंडी याचा आला असून मुलींमध्ये मुग्धा नरेश पाटील ही आली त्यांस अनुक्रमे रक्कम २०००, तर तृतीय क्रमांक मुलांमध्ये यश दत्ताराम म्हात्रे याचा आला असून मुलींमध्ये करिष्मा यशवंत हिरवे ही तिसरी आली असून त्यांस अनुक्रमे रक्कम रु. १५०० इतके बक्षीस, प्रमाणपत्र, मेडल आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. सहभागी झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांना जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग यांच्यामार्फत सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.

# भारताची आशिया चषकातून माघार

**ब्राझीलविरुद्ध होणाऱ्या फुटबॉल लढतीला प्राधान्य**



| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

पाच वेळच्या जागतिक विजेत्या ब्राझीलविरुद्धच्या आंतरराष्ट्रीय मैत्रीपूर्ण सामन्याला प्राधान्य देण्यासाठी भारतीय फुटबॉल संघाने पहिल्यावहिल्या फिफा आसियान कप (आशिया चषक) स्पर्धेतून माघार घेतली आहे. अखिल भारतीय फुटबॉल महासंघाचे उपम हासचिव एम. सत्यनारायणन यांनी गुरुवारी ही माहिती दिली. दोन्ही स्पर्धांच्या तारखांमध्ये अडचण निर्माण झाल्यामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

फिफाच्या निमंत्रणाचा स्वीकार करून भारताचा अ-गटात इंडोनेशिया, मलेशिया आणि सिंगापूरसोबत समावेश करण्यात आला होता. २१ सप्टेंबर ते ६ ऑक्टोबर या कालावधीत ही स्पर्धा होणार आहे. मात्र ३ ऑक्टोबर रोजी कोलकाताच्या सॉल्ट लेक स्टेडियमवर भारताचा ब्राझीलविरुद्ध सामना निश्चित झाला आहे. एआयएफएफने सुरुवातीला या स्पर्धेसाठी दुसरा किंवा विकास संघ पाठवण्याचा विचार केला होता, परंतु अखेर संपूर्ण स्पर्धेतून माघार घेऊन या कालावधीत मैत्रीपूर्ण सामने खेळण्याचा निर्णय घेण्यात आला.

याशिवाय २०२६ च्या फिफा विश्वचषक स्पर्धेत खेळलेल्या केप व्हर्डे आणि इराणसारख्या संघांविरुद्ध मैत्रीपूर्ण सामने खेळण्याची चाचपणीही भारत करत असल्याचे समजते, मात्र एआयएफएफने याला अद्याप अधिकृत दुजोरा दिलेला नाही. २०२७च्या एएफसी आशिया चषकासाठी पात्र ठरू न शकलेल्या भारतीय संघाला गेल्या काही वर्षांत मजबूत प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध नियमित खेळण्याची संधी मिळालेली नाही.

एकूणच भारतीय फुटबॉल सध्या संघर्ष करत असून यामध्ये एआयएफएफच्या भोंगळ कारभाराचेही योगदान आहे. इंडियन सुपर लीग (आयएसएल) बंद पडल्यामुळे भारतातील फुटबॉल पूर्णच ठप्प पडले होते. मात्र आता आयएसएलची गाडी हळूहळू रुळावर येत आहे.

**अफगाणिस्तानचा आयर्लंडवर दणदणीत विजय | मालिकेत ३-0 अशी आघाडी**

# अटल-जादराननं गाजवलं मैदान



| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

अफगाणिस्तानने आयर्लंडविरुद्ध सुरू असलेल्या पाच एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेत ३-० अशी आघाडी घेतली आहे. मालकेतील चौथा सामना १२ ऑगस्ट रोजी खेळला गेला. या सामन्यात अफगाणिस्तानने प्रथम फलंदाजी करत ३४३ धावांचा डोंगर उभा केला. प्रत्युत्तरात आयर्लंडने ३०१ धावांवर सर्वबाद झाला. अफगाणिस्तानने हा सामना ४२ धावांनी जिंकला आणि मालिकाही आपल्या खिशात घातली. मालिकेतील अंतिम सामना १५ ऑगस्ट रोजी खेळला जाईल.

नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतलेल्या अफगाणिस्तानची सुरुवात खराब झाली. सलामीवीर रहमानुल्ला गुरबाज १२ धावांवर बाद झाला. त्यानंतर इब्राहिम जादरान आणि सेदिकुल्ला अटल यांनी डाव सावरला आणि आयरिश गोलंदाजांवर दबाव आणला. दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी २२० चेंडूंमध्ये २३१ धावांची विक्रमी भागीदारी केली. ही अफगाणिस्तानची दुसऱ्या विकेटसाठीची सर्वोच्च भागीदारी आहे. तसेच, एकदिवसीय सामन्यांमध्ये अफगाणिस्तान आणि आयर्लंड यांच्यातील ही दुसऱ्या विकेटसाठीची सर्वोच्च भागीदारी ठरली आहे.

इब्राहिम जादरानने उत्कृष्ट फलंदाजी करत ११ चौकार आणि एका षटकारासह त्याने ११८ चेंडूंमध्ये १०७ धावा केल्या. सेदिकुल्ला अटलने त्याहूनही अधिक आक्रमक फलंदाजी करत १२० चेंडूंमध्ये १४३ धावा केल्या. त्याच्या या तुफानी खेळीत १७ चौकार आणि चार षटकाराचा समावेश होता. अटल आणि जादरान यांच्यातील ही भागीदारी ५० षटकांच्या फॉरमॅटमध्ये कोणत्याही विकेटसाठी अफगाणिस्तानची तिसरी सर्वोच्च भागीदारी आहे. इतकेच नव्हे तर, अफगाणिस्तानच्या एकदिवसीय इतिहासात एकाच सामन्यात दोन फलंदाजांनी शतके झळकावण्याची ही केवळ चौथी वेळ आहे.

अटल आणि जादरान बाद झाल्यानंतर अफगाणिस्तानच्या डावाची गती थोडी मंदावली. दरविश रसूलीने १४ चेंडूंमध्ये २४ धावा केल्या, तर अझमतुल्ला उमरझाई १२ चेंडूंमध्ये १५ धावा करून बाद झाला. कर्णधार रहमत शाह केवळ २ धावाच करू शकला. रशीद खानने १० चेंडूंमध्ये ११ धावा केल्या, तर हशमतुल्ला शाहिदी ७ धावा करून नाबाद राहिला. गझनफरला खाते उघडता आले नाही. अफगाणिस्तानने शेवटच्या दोन षटकांमध्ये तीन विकेट गमावले, ज्यामुळे संघाला ३५० धावांचा टप्पा ओलांडता आला नाही.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)